# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१६/ २०१६** **दिनांक २२.१२.२०१६**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक २२.१२.२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ४८१७/ २०१६, दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दिनांक २२.१२.२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे,अध्यक्ष
०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य
०४. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य
०५. मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य
०६. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
०७. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
०८. मा.सौ. अनिताताई विजयराव जगताप, सदस्या

मा.श्री.कुंदनकुमार सोनवणे,
प्र.कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग यांनी ई-मेलद्वारे कळविले आहे.

तसेच मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर- सदस्य यांनी फॅक्सद्वारे पुढीलप्रमाणे कळविले आहे. संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२२.१२.२०१६ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही (मा.डॉ.मनिषा शामसुंदर कायंदे- सदस्या, मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर- सदस्य व मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर- सदस्य) सदस्य हजर राहणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्री महोदयांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. याबाबत अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहण्यास स्वारस्य नाही.

तसेच मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर- सदस्य यांनी फॅक्स पत्राद्वारे, संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२२.१२.२०१६ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाही. शिवसेनेला उपाध्यक्ष पद देण्याच्या दृष्टीकोनातून कोणतीही कार्यवाही होत नसल्याने आम्हाला या बैठकीस हजर राहण्यास स्वारस्य नाही, याची कृपया नोंद घ्यावी, असे कळविले. याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ३०.११.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.९०५** दिनांक ३०.११.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र.८५१-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.मोहन एकनाथ उपासनी, बडतर्फ वरिष्ठ लिपीक, प्रशासन शाखा यांचेवरील आरोप मा.न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, राहाता यांचसमोर सिद्ध झालेला असून, त्यांना तिन महिने साधा कारावास व एक हजार रुपये दंडाची शिक्षा झालेली आहे. तसेच श्री.उपासनी यांना कामावर हजर करुन घेणेबाबतचा प्रस्ताव यापुर्वीच्या समितीमध्ये तीन वेळा अमान्य झालेला असून याबाबत पुन्हा फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात येऊ नये, असा निर्णय पारीत झालेला आहे. या सर्व बाबींचा विचार करता श्री.मोहन एकनाथ उपासनी, बडतर्फ वरिष्ठ लिपीक, प्रशासन शाखा यांना सेवेत घेणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**(२) निर्णय क्र.८७०-**

उपरोक्त प्रस्तावावर सांगोपांग चर्चा होऊन, मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक १४.११.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ९०७ अन्वये ठरविणेत आलेले मान्यवर तसेच शासनामधील सर्व प्रकारचे वर्ग अ अधिकारी व समिती सदस्यांनी सुचविलेले मान्यवर यांचा मोफत दर्शन/ आरतीच्या यादीमध्ये समावेश करणेत यावा, असे ठरले.

तसेच विशिष्ट स्वरुपाची देणगी देणाऱ्या साईभक्तांस तहयात विनापास/ मोफत दर्शन/ आरतीसाठी प्रवेश देण्यात यावा, यासाठी मुल्य निश्चित करणेत येऊन, गोल्डन कार्डसारखी योजना राबविणेत यावी. याबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, अशा सुचना केल्या.

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी/ मुख्यलेखाधिकारी/ संरक्षण विभागप्रमुख)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**उपरोक्त प्रस्तावावर सांगोपांग चर्चा होऊन, मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक १४.११.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ९०७ अन्वये श्रींचे दर्शन/ आरतीसाठी खालील मान्यवरांना मोफत सोडण्यात यावे**.

१) शिर्डीतील ग्रामस्थांची आरती व्यवस्था मोफत केली जाते, ती यापुढेही सुरु ठेवावी. ग्रामस्थांची ओळख पटण्यासाठी त्यांचे आधारकार्ड / निवडणूक ओळखपत्र गृहीत धरण्यात यावे.

२) श्री साईबाबा संस्थानच्या विविध विभागाच्या दैंनदिन कार्यालयीन कामाकरीता येणा-या व्यक्ती तसेच उत्सव काळात येणारे मानकरी व संस्थान निमंत्रीत कलाकार.

३) श्री साईबाबा संस्थानला रु.२५०००/-किंवा त्यापेक्षा अधिक देणगी देणा-या (वस्तुरुप किंवा रोख स्वरुपात) देणगीदार भक्तांची आरतीची व्यवस्था देणगी दिलेल्या दिवशी वा त्यांचे विनंतीनुसार इतर दिवशी एकदाच मोफत करण्यात यावी.

४) श्री.के.व्ही. रमणी, अध्यक्ष व कार्यकारी विश्वस्त शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे रु.११० कोटी मात्रचे देणगीतून साईआश्रम प्रकल्प साकारलेला आहे. त्यामुळे श्री.रमणी व त्यांच्या कुटुंबीयांचे साईप्रती योगदान लक्षात घेऊन त्यांना कायमस्वरुपी भेट देणे अगत्याचे ठरेल व साई दर्शनापेक्षा कुठलाही आनंद त्यांना भावणार नाही. म्हणुन संस्थान तर्फे श्री.के.व्ही.रमणी व त्यांच्या कुटूंबीयांना तहयात मोफत निवास व दर्शन/आरती व्यवस्था करणेत यावी.

५) भारतीय गणराज्याचे मा.राष्ट्रपती, भारतीय गणराज्याचे मा.उपराष्ट्रपती, भारतीय गणराज्याचे मा.पंतप्रधान, भारतीय गणराज्याचे मा.उपपंतप्रधान, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल, भारतीय गणराज्याचे भुतपुर्व मा.राष्ट्रपती व मा.उपराष्ट्रपती, भारतीय गणराज्याचे भुतपुर्व पंतप्रधान भारतीय गणराज्याचे मुख्य न्यायाधिश, लोकसभा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्रीमंडळातील सर्व मंत्री, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, सर्व राज्याचे राज्यपाल, सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, सर्वोच्च न्यायालयाचे सर्व न्यायाधिश, महाराष्ट्र राज्यांच्या मंत्रीमंडळातील सर्व मंत्री महाराष्ट्र राज्य विधान सभा अध्यक्ष व उपाअध्यक्ष, महाराष्ट्र राज्याच्या उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायाधिश, महाराष्ट्र राज्याच्या उच्च न्यायालयांचे सर्वन्यायाधिश आदि अतिमहत्वाच्या व्यक्तींची दर्शन/आरती व्यवस्था निशुल्क राहील.

६) याच प्रमाणे शिर्डी विधानसभा व लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी, अध्यक्ष शिर्डी नगरपंचायत तसेच देशाच्या कानाकोप-यातून येणारे साधुसंत यांचीही आरतीसाठी निशुल्क व्यवस्था करणेत यावी.

७) उत्सव, जोडून येणा-या सुट्टया, राष्ट्रीय सण, जास्त गर्दीचा कालावधी आदि वेळी दर्शन/आरती पासेस बंद राहतील. याबाबतचा निर्णय घेण्यात अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना राहील.

याव्यतिरिक्त दर्शन/आरतीसाठी विनाशुल्क व्यवस्था कोणत्या व्यक्तींची करावी, याबाबत प्रसंगानुरुप निर्णय घेण्याचा अधिकार पुर्णपणे त्रिसदस्यीय समितीचे अध्यक्ष, सदस्य व कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचेकडे राहील, असे ठरले होते.

आता, संस्थानचे कामकाज पहाण्यासाठी महाराष्ट्र शासनाने व्यवस्थापन समितीची नियुक्ती केलेली असल्यामुळे, पुर्वीच्या निर्णयातील अ.नं.१ ते ७ मध्ये नमुद केलेल्या मान्यवरांबरोबरच मा.सदस्यांनी सुचविलेल्या मान्यवरांचा उपरोक्त यादीमध्ये समावेश करणेत यावा. तसेच याबाबत प्रसंगानुरुप निर्णय घेण्याचा अधिकार, कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचेकडे राहील, असे ठरले.

**तसेच विशिष्ट स्वरुपाची देणगी देणाऱ्या साईभक्तांस विनापास/ मोफत दर्शन/ आरतीसाठी प्रवेश देण्यात यावा, यासाठी मुल्य निश्चित करणेत येऊन, गोल्डन कार्डसारखी योजना राबविणेत यावी. याबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, अशा सुचना केल्या.**

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी/ मुख्यलेखाधिकारी/ संरक्षण विभागप्रमुख)

---

**(३) निर्णय क्र.८९२-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसर आकर्षक दिसणेसाठी तसेच साईभक्तांच्या सोयीसाठी मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नुतणीकरण करणेत यावे, असे ठरले. यासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच सदरहू फ्लोअरींग नुतणीकरण करणेचे काम रात्रीच्या वेळेसच जास्त करणेत यावे, अशा सुचना दिल्या. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृहासमोर तयार केलेल्या ०४ प्रकारच्या फ्लोअरींगच्या नमुन्यांनी समितीने पाहणी केली व सदरहू पाहणीअंती मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे कामासाठी प्रामुख्याने ग्रेनाईटचा वापर करणेत यावा. उन्हाळयात उष्णतेने साईभक्तांच्या तळपायांना त्रास होऊ नये, याकरीता फ्लोअरींगमध्ये काही भागात व्हाईट इंजि. आर्टीफीशियल टाईल्सचे पाथवे करणेत यावे, असे ठरले. तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू फ्लोअरींग नुतणीकरण करणेचे काम रात्रीच्या वेळेसच जास्त करणेत यावे, अशा सुचना दिल्या.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०२** **संस्थानतर्फे प्रकाशित करावयाच्या प्रस्तावित साईसेवा मासिकाची नाव नोंदणी करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** साई सेवाकार्याची माहिती देशभरातील व विदेशातील भक्त-भाविकांना व्हावी आणि त्याव्दारे साईसेवेस प्रेरणा मिळावी या दृष्टीने 'साईसेवा' अथवा तत्सम अर्थाच्या नावाचे मासिक सुरु करण्याचा संस्थानचा मानस आहे. हे प्रस्तावित मासिक सुरु करण्यासाठी प्रथम रजिस्ट्रार फॉर न्यूज पेपर ऑफ इंडिया यांच्याकडे चीफ मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेटस ऑफिस, एस्प्लनेड, मुंबई यांच्यामार्फत नावनोंदणीसाठी विहित नमुन्यातील अर्ज सादर करावा लागेल. पडताळणी होऊन नाव मिळण्यासाठी पर्यायी किमान चार नावे द्यावी लागतील. त्याकरीता प्रथम क्रमांकावर साईसेवा हे नाव नमूद करुन, तत्सम अर्थाची साईसेवादर्पण, श्री साईसेवा, श्री साईसतसेवा, साईस्वानंदसेवा, साईसत्यसेवा, साईसेवाव्रत, साईअर्पणसेवा, साईतन्मयसेवा ही या व्यतिरिक्त सुचलेली अन्य पर्यायी नावे पुढील क्रमांकांवर अनुक्रमे नमुद करावी लागतील.

सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानतर्फे प्रकाशित करावयाच्या प्रस्तावित साईसेवा मासिकाची नाव नोंदणी करणेसाठी रजिस्ट्रार फॉर न्यूज पेपर ऑफ इंडिया यांच्याकडे चीफ मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेटस ऑफिस, एस्प्लनेड, मुंबई यांच्यामार्फत खालील पाच नावे कळविणेत यावी, असे ठरले.**

**(१) साईसेवा, (२) श्री साईसेवा, (३) साईसेवाव्रत, (४) साईनित्यसेवा (५) साईअर्पणसेवा.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.०३** **संस्थान प्रकाशित साईलीला मराठी व हिंदी-इंग्रजी नियतकालिकांकरीता संपादकीय मंडळ गठीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांच्या महासमाधीनंतर त्यांच्या प्रेरणेने व त्यांचा प्रत्यक्ष सहवास लाभलेल्या त्यांच्या भक्तांच्या पुढाकाराने चैत्र शके १८४५ (सन १९२३) मध्ये श्री साईलीला हे मराठी भाषेतील मासिक मुंबईतून सुरु करण्यात आले. त्यांचा उद्देश नमूद करताना म्हटले आहे की, या मासिक पुस्तकाचा उद्देश त्याच्या नावावरुन व्यक्त होत आहे. शिर्डीचे श्री साईमहाराजांचे भक्त असंख्य असून, ठिकठिकाणी पसरले आहेत. त्यांना निरनिराळया वेळी निरनिराळया त-हेचे अनुभव महाराजांनी दिले आहेत. इतकेच नव्हे, तर महाराजांनी आपल्या देहावसनानंतरसुध्दा अनुभव देण्याचे चालू ठेविले आहे. किंबहुना ज्यांना महाराजांच्या देहाचे प्रत्यक्ष दर्शन घडले नाही, त्यांनासुध्दा अनुभव येत आहेत. थोडक्यात म्हणावयाचे म्हणजे महाराजांचे अनुभव अश्रुतपुर्व, अतर्क्य आणि अनेक आहेत.

श्री साईलीला मासिकांच्या संपादकपदाची जबाबदारी संस्थानच्या त्यावेळच्या विश्वस्त मंडळातील एक विश्वस्त श्री.लक्ष्मण गणेश महाजनी यांच्याकडे, तर प्रकाशकपदाची जबाबदारी दुसरे एक विश्वस्त श्रीरामचंद्र आत्माराम तर्खड यांच्याकडे होती. कालांतराने संपादक-प्रकाशक पद हे संस्थानच्या व्यवस्थापन समितीचे मा. प्रमुख/ संस्थानच्या प्रशासनाचे मा. प्रमुख यांनी भूषविण्यात ठरविण्यात आले.

प्रारंभीच्या काळात या मासिकाच्या बाबांचे प्रत्यक्ष सान्निध्य लाभलेले कृपावंत साईभक्त सर्वश्री काकासाहेब दिक्षीत, बाळासाहेब देव, अण्णासाहेब दाभोलकर, दासगणू महाराज, बाबासाहेब तर्खड,काकासाहेब महाजनी, रघवीर भास्कर पुरंदरे आदींनी अनुभव वैचारिक, शिर्डी अहवाल आदी स्वरुपातील लेखन करुन संपादन-प्रकाशकामी सहाय्य केले.

श्री साईबाबांच्या लीलांचा अनुभव महाराष्ट्राबरोबरच देशभर प्रांतोप्रांती, विदेशांतही येऊ लागल्याने साईभक्तांच्या संख्येत दिवसागणिक वाढ होऊ लागली. म्हणून या भक्तांकरिता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय भाषेतही श्री साईलीला मासिक प्रकाशित करण्याचा विचार पुढे येऊन श्री साईलीलाची इंग्रजी-हिंदी अशी संयुक्त आवृत्ती १९७३ पासून प्रकाशित करण्यास सुरुवात झाली.

नियतकालिकात मुद्रण क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानानुसार सदर नियतकालिकांच्यास्वरुपात व प्रकाशन कालावधीत वेळोवेळी बदल होत राहिले आहेत.

सध्याच्या मराठी स्वतंत्र व इंग्रजी-हिंदी संयुक्त या अनुक्रमे साईलीला व श्री साईलीला या व्दैमासिक नियतकालिकांच्या संपादन-प्रकाशनांचे कामकाज नीटनेटके, सुरळीत व गतिमान व्हावे, त्याची व्याप्ती वाढावी या दृष्टीने संपादन- प्रकाशनांचे मार्गदर्शक, सहाय्यक समिती गठित करण्याची आवश्यकता वाटू लागली आहे. या समितीत प्रमुख मार्गदर्शक म्हणून संस्थानच्या व्यवस्थापन समितीचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून संस्थानच्या

व्यवस्थापन समितीचे मा.अध्यक्ष, सदस्य म्हणून मा.विश्वस्त, प्रशासनाचे प्रमुख मा.कार्यकारी अधिकारी यांचा समावेश असावा. त्याचबरोबर मागील बरीच वर्ष सदर व्दैमासिक नियतकालिकांच्या संपादन-प्रकाशनकामी ज्यांनी निरपेक्ष भावनेने, प्रसंगी पदरमोड करुन मोलाचे सहकार्य केले त्यांची नावे संस्थानचे जनसंपर्क अधिकारी, सहा संपादक, श्री साईलीला व प्र.अधीक्षक, प्रकाशने विभाग यांनी सादर केलेली आहेत.

| अ.नं. | तपशिल | भाषा | अ.नं. | तपशिल | भाषा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती मुग्धा सुधीर दिवाडकर, मुंबई | मराठी | ०७ | श्री. मदन गोपाल गोयल, राजस्थान | हिंदी |
| ०२ | सौ. मयुरी महेश कदम, मुंबई | मराठी | ०८ | श्री.विजय कुमार श्रीवास्तव, उत्तरप्रदेश | हिंदी |
| ०३ | सौ.शमीला फाटक, बंगळुरु | मराठी | ०९ | श्री. विश्वनाथ नायर, नवी मुंबई | इंग्रजी |
| ०४ | श्री. दिलीप पवार (पवार काका) | मराठी | १० | कु. शमशाद अली बेग, नवी मुंबई | इंग्रजी |
| ०५ | श्री. रघुनाथ रेड्डी, तिरुपती, आंध्राप्रदेश | इंग्रजी/ तेलगू | ११ | श्री विनय घासवाला, गुजरात | हिंदी |
| ०६ | डॉ.सुबोध अग्रवाल, डेरहाडून, उत्तराखंड | हिंदी/ इंग्रजी | | | |

उपरोक्त साईसेवाव्रतींना त्यांच्या आजवराच्या व पुढील सहकार्याबद्दल समिती सदस्य म्हणून सन्मानित करण्यात यावे.

संस्थान नियतकालिक इतर भाषांत प्रसिध्द करण्याच्या दृष्टीने संस्थानला विविध भाषांतील पुस्तके प्रकाशने सहाय्य केलेल्या ज्या त्या भाषेतील मान्यवरांची नावे खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | भाषा | अ.नं. | तपशिल | भाषा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती टी. शैलेजा, हैद्राबाद | तेलगू | ०६ | डॉ.सिता लक्ष्मी, म्हैसुर | कन्नड / मल्याळम |
| ०२ | श्री. सत्य खडगेराया, कटक, ओडिशा | ओडिया | ०७ | श्री.नागराजन, मंबई | तामिळ |
| ०३ | श्री. अविजीत गुहा, कोलकत्ता | बंगाली/आसामी | ०८ | श्री.साईमणी, हैद्राबाद | तामिळ |
| ०४ | श्री. गुणजीतसिंग वालीया, अमृतसर, पंजाब | पंजाबी | ०९ | श्री.भुषणलाल कोठीदार, जम्मु-तावी | उर्दू |
| ०५ | श्रीमती. हिनाबेन मेहता, बंगलोर | गुजराती | १० | श्री.जयनायक, गोवा- पणजी, गोवा | कोंकणी |

वरील साईभक्त-अनुवादकांचा भाषिक जाणकारांचा प्रस्तावित संपादक समितीत सदस्य म्हणून समावेश व्हावा, असे वाटते.

श्री साईलीला मराठी व हिंदी-इंग्रजी या नियतकालिकांच्या प्रकाशनकामी मागील ब-याच वर्षापासून सहाय्य करीत असलेल्या साईसेवाव्रतींना वर्षभराची आठवण म्हणून सदर व्दैमासिक नियतकालिकांचे सहाय्यक संपादक यांच्याकडून संस्थानची दैनंदिनी दरवर्षी दिले जाते. या व्यतिरिक्त त्यांना कोणतही लाभ दिला जात नाही. ते देत असलेल्या निरपेक्ष साईसेवेबद्दल ते जेंव्हा दर्शनासाठी शिर्डी येथे येतील तेव्हा त्यांच्याकरीता दर्शनाची, निवासाची, प्रसाद भोजन याचबरोबर संपादन-प्रकाशन सहाय्यकामी ते जेंव्हा केंव्हा संस्थानच्या मुंबई कार्यालयात येतील तेव्हा त्यांच्याकरिता आसन, चहापान आदी व्यवस्था संस्थाकडून व्हावी. तसेच व्दैमासिकात प्रसिध्द होणा-या लेखसाहित्याबद्दल ज्या त्या लेखक-कवीला प्रतिपृष्ठ साधारण रुपये. ३००/- मानधन देण्यात यावे असे सुचवावेसे वाटते.

सबब सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान प्रकाशित साईलीला मराठी व हिंदी-इंग्रजी नियतकालिकांकरीता संपादकीय मंडळ गठीत करणेसाठी जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, जास्तीत जास्त इच्छुक संपादकांचे अर्ज मागविणेत यावेत, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.०४** **श्री साईबाबांच्या जीवनचरित्रावर आधारित श्री साईबाबांच्या जीवनावरील विविध प्रसंग कॅनव्हासवर चित्रीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं.१७ ठ. मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताविक:-** श्री.सुनिल शेगांवकर, पुणे हे साईबाबांच्या जीवनावरील विविध प्रसंग कॅनव्हासवर चित्रीत करतात. यापुर्वी सन-२००६ मध्ये त्यांची ०९ चित्रे मंदिर परिसरात लावण्यात आलेली आहे.

श्री. शेगांवकर, पुणे यांनी दि.१५.०७.२०१६ रोजी कॅनव्हास फोटोंचा पाठविलेला प्रस्ताव पुर्व मान्यता घेऊन फाईल करण्यात आलेला आहे. असा मागिल वृत्तांत आहे.

**प्रस्ताव:-** श्री. शेगांवकर, पुणे यांनी मागिल प्रस्ताव फेरसादर केलेला आहे. सन २००६ मध्ये बांधकाम विभागामार्फत ०९ कॅनव्हॉसवरील चित्रे रुपये. ०१ लाख अदा करुन खरेदी केलेली आहे.

श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-२०१८ मध्ये असल्याने भविष्यात मंदिर परिसरात भव्यदिव्य वास्तू उभ्या राहाणार आहेत तसेच प्रसादालय, भक्तनिवास अशा ब-याचशा वास्तुमध्ये लावणेकामी श्री साईबाबांच्या जीवनावर सुमारे शंभर चित्रे त्यात प्रसंगचित्रे, व्यक्तीचित्रे व बाबांच्या विविध मुद्रा असणार असून सदरचा तपशिल खालील प्रमाणे आहेत.

| अं.नं. | तपशिल | आकार | नग संख्या | प्रती नग दर | एकूण रक्कम रुपये. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | कॅनव्हास प्रकारातील फोटो | ६ "X ९" | ७२ | ३,००,००० | २,१६, ००, ०००/- |

संस्थानने उक्त फोटो खरेदी करणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेत मान्यता घेऊन कार्यादेश देण्याची विनंती श्री. सुनिल शेगांवकर,पुणे यांनी केलेली आहे.

**मा.व्यवस्थापन समिती निर्णयः-** संस्थानने प्रकाशित होणा-या प्रकाशनांची वाढती संख्या विचारात घेऊन मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४.०५.२००८ चे सभेत "इतर कुठल्याही अन्य खाजगी प्रकाशनांचे हक्क स्वीकारण्यात येऊ नयेत" असा निर्णय झालेला आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** श्री साईबाबांच्या जीवनाचरित्रावर आधारीत विविध प्रसंग कॅनव्हासवर चित्रीत करणेबाबत संस्थानचा प्रस्ताव किंवा मागणी नाही. श्री. शेगांवकर, पुणे यांनी हा प्रस्ताव स्वत: दिलेला असून ते व्यावसायिक चित्रकार आहेत. शिर्डीतील खाजगी दुकानात त्यांच्या चित्रांची विक्री केली जाते.

एक व्यक्तीच्या एकाधिकारात विना निविदा अशी खरेदी करणे शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमावलीच्या विरोधात आहे.

**अ)** आज रोजी रु.२ कोटी १६ लाख रक्कमेची चित्रे खरेदी करावयाची असल्यास विहित पध्दतीने ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यात येऊन खरेदी करता येतील.

**ब)** राष्ट्रीयस्तरावर नामांकित चित्रकारांची श्री साईबाबांच्याजीवनावरील कॅनव्हासवर प्रसंगचित्रे, व्यक्तीचित्रे व विविध मुद्रा यावर चित्रकला स्पर्धा आयोजीत करुन विजेता स्पर्धकास नाममात्र बक्षीस / मानधन देऊन चित्रे खरेदी करुन सर्व हक्क (कॉपीराईट) विकत घेता येईल. (यापुर्वी सन १९९८ मध्ये मंदिर परिसर पुर्नविकास योजनेचे आर्कीटेक्ट यांची स्पर्धा घेऊन आराखडा निवडून मंजूर करुन मंदिर परिसरात बांधकाम केल्याचा दाखला आहे.)

सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री.सुनिल शेगावकर, मुंबई यांनी कॅनव्हासवर चित्रीत केलेली साईबाबांच्या जीवनचरित्रावरील प्रसंग चित्रे अप्रतीम आहेत, परंतु एकाच चित्रकाराकडून चित्रे खरेदी करणे योग्य होणार नाही. याकरीता प्रस्तावातील ब मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.०५** **साईसृष्टी प्रकल्प उभारणीकामी येणाऱ्या सविस्तर अंदाजपत्रकाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** खालीलप्रमाणे आहे.

अ) कलम १७ (समितीची कर्तव्ये व अधिकार)- पोटकलम (२) खंड (ठ)- समिती श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील;

ब) समितीकडून कलम २१ (विश्वस्त निधीचा विनियोग) -

१. पोटकलम(१) खंड(ङ) - श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे;

२. पोटकलम(१)खंड(झ)-विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे;

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :

१. दिनांक ०५/१२/२०१० निर्णय क्र. १००४(०४)
२. दिनांक २६/०३/२०११ निर्णय क्र. २०१
३. दिनांक २८/१२/२०१५ निर्णय क्र. ६५३
४. दिनांक ३१/०८/२०१६ निर्णय क्र. ६३५

प्रस्तावना: श्री साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डीत येणा-या साईभक्तांना गर्दीचे प्रमाणात अनेक सोयीसुविधा मंदिर परिसरात पुरविण्यात आलेल्या असुन आणखी वाढीव सुविधा पुरविणेसाठी दर्शनरांग व अनुषंगिक व्यवस्था निर्माण करणे प्रस्तावीत आहे. सध्या समाधीचे दर्शन घेवून बाहेर पडणा-या साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी मंदिर परिसरात असते. या गर्दीत दर्शन घेवू इच्छिणा-या भक्तांची भर पडतच असते. यासाठी मंदिर परिसरातील भक्तांची गर्दी अन्यत्र वळविणे आवश्यक आहे. शिर्डीत येणा-या साईभक्तांसाठी नविन आकर्षण केंद्र निर्माण करणे व भक्तांना विरंगुळा मिळणेबरोबरच श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व शिकवण याबाबत माहीती देणेचे दृष्टीने संस्थानमार्फत साईगार्डन थिमपार्क लेजरशो करणे प्रस्तावीत आहे. तसेच श्री साई सच्चरित ग्रंथातील प्रसंगावर आधारीत चलचित्र स्वरूपातील देखावे लाईट व साऊंड इफेक्टसह सादर करणेसाठी 'साईसृष्टी' प्रकल्प प्रस्तावीत आहे. या कामांमध्ये सिव्हील वर्क, इंटेरियर व लॅन्डस्केपिंग वर्क, मुर्त्या, ग्रंथालय, योगा, म्युझियम, उपहारगृह, स्वच्छतागृह, इटेलिजंट लाईटींग व इलेक्ट्रीकल कामे इत्यादी कामांचा समावेश आहे. याबाबत मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक २८/१२/२०१५ रोजीचे सभेत सदरहु समितीचे निर्णय क्रमांक ६५३ अन्वये खालीलप्रमाणे ठरले आहे.

*".. यावर सविस्तर चर्चा होवून असे ठरले की प्रस्तावीत प्रकल्पात प्रामुख्याने श्री साई सच्चरीत ग्रंथातील प्रसंगावर आधारीत देखावे तसेच मुर्त्या उभारणे अशा कलात्मक स्वरुपाच्या कामांचा समावेश असल्यामुळे तत्कालीन व्यवस्थापन समितीने या प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून चित्रपट सृष्टीतील आघाडीचे व सुप्रसिद्ध कला नेपथ्यकार श्री.नितिन देसाई यांची नेमणूक केलेली आहे. तरी आता प्रस्तावीत प्रकल्प साईगार्डनमधील जागेत करणेसाठी श्री.नितिन देसाई यांचेकडून आराखडा व अंदाजपत्रक तयार करून त्यमुसार येणा-या अनुषंगिक खर्चास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी."*

सदरचा प्रकल्प साईगार्डन प्रकल्पाचे उर्वरीत जागेत करणेबाबत ठरले आहे. परंतु मौजे निमगाव को-हाळे येथिल गट नं १९८, १९९, २०० व २०१ मधील सदरहु क्षेत्र हरित क्षेत्रातून (Green zone) वगळून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे विविध सार्वजनिक/निमसार्वजनिक उपक्रमांचे वापरासाठी रहिवास क्षेत्रात समाविष्ट करणेसाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असुन, त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही.

त्यानंतर मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३१/०८/२०१६ रोजी झालेल्या सभेतील नि.क्र.६३५ खालीलप्रमाणे आहे.

" श्री साई सृष्टी प्रकल्पासाठीचे सल्लागार व कला, नेपथ्यकार श्री.नितिन देसाई, मुंबई हे उपस्थित होते. त्यांनी सभेस श्री साईसृष्टीचे सादरीकरण दाखविले व पुढीलप्रमाणे माहिती दिली.

बाबांच्या समाधी शताब्दी निमित्ताने साईसृष्टी बनविणेत येणार असून या प्रकल्पाचे कार्यक्रम व्यवस्थापन ते स्वत: विनामुल्य करणार आहेत. यामध्ये बाबांची भव्य अशी १०० फुट उंचीची बाबांची मुर्ती राहील व बाजुला वेगवेगळया ५२ गॅलऱ्यांमध्ये साईसच्चरीत्र अध्यायामधील ५२ प्रकारचे हालते देखावे राहतील. त्यामुळे साईभक्तांना दृश्यस्वरुपात बाबांचे चरित्र समजणार आहे. तसेच बाबांच्या जीवनावर ५२ भागांची छोटया पडद्यावरील मालिकाही निर्माण करण्याचा माणस आहे. साईसृष्टीमध्ये मोठे स्टेज राहील व त्यावर वर्षभर वेगवेगळया नामांकित कलाकारांचे लाईव्ह कार्यक्रम राहतील. सर्व साईसृष्टी पहाण्यासाठी भक्तांना कमीत कमी २ तास व जास्तीत जास्त २ दिवसही वेळ लागेल. बाबा भिक्षा मागत असत, या संकल्पनेमधून देशाच्या काना-कोपऱ्यातून समाधी शताब्दी निमित्ताने बाबांचा रथ शिर्डीसाठी निघेल. समाधी शताब्दी निमित्ताने समाधी शताब्दीसाठी ब्रँड ॲम्बसेडर नेमण्यात येईल, इ.

यावर सविस्तर चर्चा होऊन समितीने असे ठरले की, श्री साईबाबांच्या महासमाधी शताब्दी वर्षाचे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव, २०१७-२०१८, असे संबोधण्यात यावे व या नावाचा लोगो तयार करणेत यावा, त्या लोगोवर पृथ्वी व मंदिरामधील बाबांचा (मुर्तीचा) फोटो व त्यावर चोहोबाजुंने चांदण्यांच्या स्वरुपात उठावदार प्रकाश टाकणेत यावा.

समाधी शताब्दी वर्षाची जागतिक पातळीवर प्रसिध्दी देण्यासाठी ब्रॅण्ड ॲम्बीसिडर म्हणून जेष्ठ सिने अभिनेता अमिताभ बच्चन यांना विचारणा करण्यात यावी, ते साईबाबांचे भक्तही आहेत. तसेच दक्षिण भारतीय सिने अभिनेते रजनीकांत, नागार्जुन, बाहुबली फेम प्रभास हे व इतर साईभक्त सिनेअभिनेते कि जे विनामुल्य सेवा देतील त्यांना विचारना करण्यात यावी.

बाबांच्या समाधी शताब्दी निमित्ताने साईसृष्टी स्मारक कायमस्वरुपीचे बनविणेत यावे. त्यामध्ये श्री.नितिन देसाई यांनी नमुद केलेप्रमाणेबाबांची १०० फुटी मुर्ती, विविध देखावे व लहान मुलांसाठी टेलीस्कोप गॅलरीव्दारे स्टार्स पहाण्याची व्यवस्थाही ठेवण्यात यावी. बाबांनी आयुष्यभर गोरगरीब तसेच रोग्यांची सेवा केलेली होती. त्यामुळे सदरहू साईसृष्टीमध्ये बाबांनी लोकांच्या केलेल्या सेवेच्या बाबतीतीलदेखावे ठेवावेत. तसेच बाबांच्या जीवनावर ५२ भागांची सिरीयल तयार करणेसाठी मोठया देणगीदार साईभक्तांची प्रायोजक म्हणून नेमणूक करणेसाठी संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच सदरहू साईसृष्टी उभारणीकामी येणाऱ्या अंदाजे रु.३६.०९ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

प्रस्ताव : उपरोक्तप्रमाणे ब्रॅण्ड ॲम्बीसिडर व इतर अनुषंगिक बाबींबाबत शताब्दीकक्षामार्फत स्वतंत्रपणे कार्यवाही करणेत येत आहे तसेच श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव-२०१७-२०१८ साठी लोगो तयार करणेत आला असुन त्याचे अनावरण दि.११/१२/२०१६ रोजी करण्यात आले आहे.

साईसृष्टी प्रकल्पाचे सल्लागार श्री.नितिन देसाई यांनी ढोबळमानाने सादर केलेल्या खालीलप्रमाणे रु.३६.०९ कोटी अंदाजपत्रकीय खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३१/०८/२०१६ रोजीचे सभेत मान्यता देण्यात आली आहे.

| अ.नं. | तपशिल | अंदाजे खर्चाची रक्कम रु. |
|---|---|---|
| ०१ | सिव्हील वर्क –आर.सी.सी., बांधकाम, पलॅस्टर, दरवाजे, खिडक्या, रेलिंग,वॉल पॅनेल्स, फॉल्स सिलींग, पोर्टल पॅनेल्स, रुफींग पॅनेल्स इ. | ६,०३,३०,०३०/- |
| ०२ | इंटेरियर वर्क - पॅनेल्स, रेलिंग,स्टेज, स्टॅच्युज, टेक्श्चर्ड वॉल्स इ. | १५,६१,२८,७००/- |
| ०३ | लॅन्डस्केपिंग वर्क - ॲनिमल स्टॅच्युज,पेव्हींग टाईल्स,लॉन्स, ट्रीज,पार्कींग इ. | ४,४०,००,०००/- |
| ०४ | मिसेलिनियस वर्क- ग्रंथालय, योगा, म्युझियम, उपहारगृह, स्वच्छतागृह, कंपाउंड वॉल, इंटेलिजंट लाईटींग व इलेक्ट्रीकल कामे तसेच सुरक्षाव्यवस्था इ. | ५,०६,३५,४००- |
| | एकूण रु. | ३१,१०,९४,१३०/- |
| | कॉन्टींजन्सीज – १० % | ३,११,०९,४१३/- |
| | कन्सल्टन्सी चार्जेस - ६ % | १,८६,६५,६४८/- |
| | अंदाजे एकूण खर्च रु | ३६,०८,६९,१९१/- |

तथापि सदरहु अंदाजपत्रक सादर करतांना त्यांनी १५% कॉन्टींजंसीज व २०% सल्लागार फी समाविष्ट केली आहे. या प्रकल्पाचे काम कलात्मक स्वरुपाचे आहे. त्यामुळे सदरहु प्रकल्पाचे सविस्तर बांधकाम आराखडे व प्रचलित जिल्हादरसुचीनुसार अंदाजपत्रके तसेच बाबांची १०० फुटी मुर्ती, विविध देखावे व लहान मुलांसाठी टेलीस्कोप गॅलरीव्दारे स्टार्स पहाण्याची व्यवस्था तसेच बाबांच्या जीवनावर ५२ भागांची सिरीयल आदि बाबींचे

संकल्पनांसह प्रचलित दराने सविस्तर अंदाजपत्रके व विषयांकीत प्रकल्पासाठी त्यांचे सेवेचा Scope of work सल्लागार श्री.नितिन देसाई यांनी सादर करणे आवश्यक आहे.

यापुर्वी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०३/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२०१ अन्वये Scope of work मध्ये प्रामुख्याने, विषयांकीत प्रकल्पाचे डिझाईन व ड्रॉईंग्ज तयार करणे, प्रकल्पाचे विविध बाबींसाठी निविदा तयार करून देणे, निविदेप्रमाणे कार्यादेश बहाल करणेस सहाय्य करणे, प्रकल्प उभारणीची सुरुवात करून ती अंतिम होईपर्यंत, विविध बाबींची अंमलबजावणी करणे, कामाचे दैनंदिन पर्यवेक्षण करणे, प्रकल्प खर्चाचे पृथ्थकरण करून खर्चाचे प्रमाणपत्र देणे, काही विशेष बाबी, जसे मुर्त्या तयार करणे, साउंड इफेक्ट्स, लाईटींग आदी कामासाठी एजन्सीज नेमणे, प्रकल्प उभारणीसाठी संस्थान व ठेकेदार यांचेत समन्वय साधून प्रकल्प पुर्णत्वास नेणे आदि बाबींचा समावेश असावा. सदरहु सल्लासेवा आर्कीटेक्ट, स्ट्रक्चरल इंजिनियर व प्रकल्प व्यवस्थापन सेवेसह सर्वसमावेशक असावा व त्यासाठी संस्थानचे तांत्रिक मनुष्यबळ वापरू नये. श्री. नितीन देसाई, मुंबई किंवा त्यांच्या अखत्यारीतील ते नामनिर्देशित करतील त्या संस्थेस प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून सेवा पुरविणेसाठी एकूण प्रकल्प खर्चाच्या ०६ टक्के अधिक सेवाकर अतिरिक्त याप्रमाणे सल्लागार शुल्क आदा करावे असे ठरलेले आहे.

तरी सल्लागार यांचेकडून उपरोक्तप्रमाणे अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतर या प्रकल्पासाठी सल्लागार यांचे सेवेचा Scope of work, सल्लागार शुल्क, प्रत्यक्ष खर्चाची रक्कम आदि बाबी अंतिम करून सल्लागार यांचे समवेत करारनामा करून त्यानुसार पुढील कार्यवाही करणे उचित राहील असे मत आहे. तरी सदरहु प्रस्तावाबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईसृष्टी प्रकल्प उभारणीकामीच्या अंदाजपत्रकीय खर्चामधील कॉन्टींजंसीज व सल्लागार फी या रकमा वगळणेत येऊन, उर्वरित खर्चास मान्यता देण्यात आली.**

**याचवेळी अशीही चर्चा करणेत आली की, श्रींच्या समाधी शताब्दी महोत्सव वर्षापुर्वी साईसृष्टी प्रकल्पाचे काम पुर्ण होणे आवश्यक असल्यामुळे तात्काळ ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी. साईसृष्टी प्रकल्पाची थीम बाबांनी केलेल्या सेवेची ठेवण्यात येऊन, लेझर शो, भारतीतील सर्व संतांच्या वस्तुंचे संग्रहालय, मुलांसाठी दुर्बीनचे सहाय्याने तारे दाखविणे यासह १ मुख्य व इतर ५३ दालणे बनविणेत यावी. तसेच सर्व समिती सदस्यांसमोर साईसृष्टी प्रकल्पाचे सादरीकरण दाखविणेत येऊन, ते अंतीम करणेत यावे, याबाबत साईसृष्टी प्रकल्पाचे सल्लागार श्री.नितिन देसाई, मुंबई यांना कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **वॉटर हायड्रँट यंत्रणेकरीता मंदिर परिसर, जुने प्रसादालय परिसर व साईप्रसादालय येथे पाण्याच्या टाक्या तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-2004 मधील तरतुद:-**

अधिनियमाचे कलम-२१ (१) मधील पोटकलम (क)अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे". अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** संस्थानचे मंदिर परिसर, जुने प्रसादालय परिसर व श्री साईप्रसादालयात वॉटर हायड्रंट यंत्रणेकरीता वापरणेत येत असलेल्या टाक्यांमधुन सदर परिसरातील इमारतींच्या दैनंदिन वापरासाठी पाण्याचा पुरवठा केला जातो. सदर पाण्याचे टाक्यांचा इतर कारणांसाठी वापर केला जात असल्यामुळे या परिसरात आगीची मोठी घटना घडल्यास व त्यावेळी संबंधित टाकीमध्ये पाणी कमी प्रमाणात शिल्लक असल्यास सदर यंत्रणा निष्क्रीय ठरु नये म्हणुन वॉटर हायड्रंट यंत्रणेसाठी स्वतंत्र पाण्याची टाकी करणेबाबत फायर ॲण्ड सेफ्टी विभागाने कळविले आहे. याकामी संस्थानचे समाधी मंदिर परिसर, जुने प्रसादालय परिसर व श्री साईप्रसादालय या ठिकाणी प्रत्येकी ७.५ मी. लांबी X ७.५ मी.रुंदी व ४ मी. उंचीचे २,२५,०००/- लिटर क्षमतेच्या तिन स्वतंत्र पाण्याच्या टाक्या बनविणेस तसेच विद्युत मोटार, जॉकी पंप व डिझेल इंजिन बसविणेसाठी प्रत्येक ठिकाणी ६मी.X ५मी. साईजचे मजबूत कॉंक्रीटीकरण ओटा तयार करणेबाबत फायर ॲण्ड सेफ्टी विभागाने कळविले आहे.

**प्रस्ताव:-** संस्थानचे जुने प्रसादालय परिसरातील सध्याच्या इमारती काढून त्याठिकाणी नियोजीत दर्शन रांग प्रकल्प उभारणे प्रस्तावित आहे. या प्रकल्पाचे कामात नियोजीत दर्शन रांग परिसरास व इमारतींसाठी अत्याधुनिक फायर फायटींग व्यवस्था, पाण्याच्या टाक्या तसेच फायर टेंडर पार्किंगची व्यवस्था करणेत येणार आहे. फायर ॲण्ड सेफ्टी विभागाने कळविलेप्रमाणे समाधी मंदिर परिसरात फायर फायटींग व्यवस्थेसाठी २,२५,००० ली. क्षमतेची पाण्याची टाकी करणे अपेक्षित आहे. तथापी दर्शन रांग प्रकल्पांतर्गत मंदिर परिसरातील स्कायवॉक इ. बांधकाम नियोजीत आहे. त्यामुळे या परिसरात फायर फायटींगसाठी आवश्यक पाण्याच्या टाकीचे बांधकाम आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे यांचे सल्ल्याने करणे योग्य हाईल.

श्री साईप्रसादालयाचे परिसरात २,२५,००० ली. क्षमतेची पाण्याची टाकी बनविणेस फायर ॲण्ड सेफ्टी विभागाने कळविले आहे. सदरची टाकी बनविणेसाठी गॅस प्लांटचे दक्षिण बाजूस असलेल्या मोकळया जागेत सदरची टाकी बनविता येईल.

उपरोक्त दोन्ही परिसरात प्रत्येकी २,२५,०००/- लिटर क्षमतेचा पाण्याचा टाक्या बनविणेसाठी खालील दोन पर्यायांचा विचार करता येईल.

अ) फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचे मागणी प्रमाणे समाधी मंदिर परिसराकरीता सध्याचे केशव मंदिराचे जागेत व श्री साई प्रसादालयाकरीता गॅस प्लाँटचे जवळील जागेत प्रत्येकी एक अशा २,२५,००० ली. क्षमतेच्या दोन R.C.C पाण्याच्या टाक्या जमिनिचेवर (Above Ground) बनविणेकरीता अंदाजे रु.५०,००,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. याकामी संस्थानचे साईआश्रम प्रकल्पाचे स्ट्रक्चरल कंन्सल्टंट श्री आरआर. कुलकर्णी, पुणे यांचेकडून स्ट्रक्चरल डिझाईनसह विस्तृत नकाशे व अंदाजपत्रक तयार करुन घेता येईल. कायम स्वरुपी R.C.C. पाण्याची टाकी बनविल्याने त्याचे दुरुस्ती देखभालीसाठी वारंवार खर्च लागणार नाही. परंतू समाधी मंदिर पूर्नविकास प्रकल्पामंधे फायर फायटींग करीता स्वतंत्र यंत्रणा उभाणेत येणार असल्याने सदर टाकीचा पाणीसाठा अतिरिक्त होईल.

ब) अथवा, RHINO कंपणीमार्फत बनविण्यात येणा-या Corrugated profile Zincalume Steel Water Storage Tank विकत घेऊन उपरोक्त दोन्ही परिसरांत वापरता येईल. प्रत्येकी २,२५,००० लिटर क्षमतेच्या दोन टॅंक विकत घेणेकामी अंदाजे रक्कम रु. ३० लक्ष मात्र खर्च येईल. RHINO Tanks ची एका दिवसात जागेवर उभारणी होते. तसेच आवश्यकता नसल्यास सदरच्या टाक्या एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी स्थलांतरीत करता येतात. सदरच्या टाक्यांची १० वर्ष वॉरंटी दिली जाते व त्यांचे आयुष्य ५० वर्षापेक्षा अधिक असते, असा त्यांचे उत्पादक कंपनीचा दावा आहे.

उपरोक्त दोन्ही पर्यायांबाबत स्ट्रक्चरल कन्सलटंट श्री.आर.आर. कुलकर्णी, पुणे यांचेकडून दि.१२/११/२०१६ रोजीचे ई-मेलव्दारे अभिप्राय मागविणेत आला होता. त्यावर त्यांनी खालील प्रमाणे अभिप्राय कळविलेला आहे.

**“RHINO Tanks” बद्दल:**

1. या प्रकारच्या टाक्यांची उभारणी तातडीने करता येते तसेच या टाक्यांना अग्निशम विभागही मान्यता देते.
2. तसेच पारंपारीक R.C.C. टाकीपेक्षा यांच्या उभारणीसाठी कमी खर्च येतो.

उपरोक्त टाकयाची उभारणी करणेमागील मुख्य अडचणी खालीलप्रमाणे आहे.

3. सदर टाक्या जमिनीवर अथवा जमिनीपासून काही उंचीवर उभारव्या लागतात. या टाक्या भुमीगत उभारता येत नाहीत.
4. या टाक्यांना प्लंबींग कनेक्शन करणेसाठी तसेच भविष्यात यांची देखभाल दुरुस्ती सुधारणा करणेसाठी कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधीमार्फतच काम करावे लागते.

उपरोक्त बाबींचा विचार करता ROINO Tanks ऐवजी पारंपारीक पध्दतीने RCC Water tank करावे असे मत आहे.

पर्याय क्र. अ प्रमाणे कार्यवाही करावयाची झाल्यास याकामी प्रथम स्ट्रक्चरल कंन्सल्टंट श्री आर.आर. कुलकर्णी, पुणे यांचेकडून विस्तृत अंदाजपत्रक तयार करुन येणा-या खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करता येईल. स्ट्रक्चरल कन्सल्टंट श्री.आर.आर. कुलकर्णी यांनी यापुर्वी संस्थानचे साई आश्रम प्रकलपासाठी आर्किटेक्ट यांचेमार्फत स्ट्रकचरल कन्सल्टंटची सेवा दिलेली आहे.

तरी फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचे मागणीनुसार वरीलप्रमाणे २,२५,००० ली क्षमतेच्या दोन पाण्याच्या टाक्या बनविणेसाठी खालीलप्रमाणेनिर्णय होणेस विनंती.

1. कायमस्वरुपी R.C.C. पाण्याची टाकी बनवायाची असल्यास रुपये ५० लक्ष मात्र खर्च येईल तसेच RHINO टॅंक उभारावयाची असल्यास रु.३० लक्ष मात्र खर्च येईल. तरी उपरोक्त पैकी एका पर्याची निवड होऊन येणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.
2. कायमस्वरुपी R.C.C. पाण्याची टाकी उभारावयाची झाल्यास श्री.आर.आर. कुलकर्णी,पुणे यांचेकडून स्ट्रकचरल कन्सलटंट म्हणून सेवा घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, वॉटर हायड्रँट यंत्रणेकरीता R.C.C. पाण्याची टाकी बनविणेकामी मोठया प्रमाणात खर्च करणेऐवजी संस्थान तलावामधून स्वतंत्र पाईपलाईनद्वारे पाणी संस्थान परिसरामधील विहीरींमध्ये सोडणेत यावे व आवश्यक त्या वेळी फायर पंपसेटद्वारे सदरहू पाण्याचा वापर करणेत यावा.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७** **साईभक्तांसाठी दर्शनरांग व्यवस्थापन (Time base) कार्यप्रणालीसाठी ॲल्युमिनियम पार्टीशनमध्ये केबीन तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये “मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे” या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *“भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे ”* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** दि.०९/१०/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७४६ खालीलप्रमाणे संमत करण्यात आलेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणालीसाठी काऊंटर व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."*

**प्रस्तावना:-** शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणा-या भक्तांचे संख्येत दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत आहे. साईभक्तांचे दर्शन सहज व सुलभ व्हावे यासाठी तिरुपती देवस्थानचे धर्तीवर Time base दर्शन प्रणाली सुरु करणेकामी संगणक विभागामार्फत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. सदर कार्यप्रणालीसाठी काऊंटर तयार करणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी दि.०९/१०/२०१६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.७४६ अन्वये रक्कम रु.११,१३,४८९/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार इकडील विभागामार्फत कोटेशन प्रक्रिया पूर्ण करुन निम्नतम दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देण्यात येऊन,दि.११/११/२०१६ रोजी कामास प्रत्यक्ष सुरुवात केली आहे. सदर कार्यप्रणालीचे जुने प्रसादालय येथे ॲल्युमिनिअम पार्टीशनमध्ये केबीन तयार करणेचे काम सुरु असून काऊंटर समोरील कलर कोटेड पत्र्याचे शेड उभारणीचे काम सुरु आहे.

दि.१८/११/२०१६ रोजी मा. उप कार्यकारी अधिकारी यांनी त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया लि. बांधकाम विभाग, संगणक विभाग यांचे प्रतिनिधी समवेत जुने प्रसादालय येथील कामाची पाहणी केली. सदर पाहणी दरम्यान जुने प्रसादालयाचे काऊंटरचे पश्चिम बाजूस सर्व्हरसाठी ८'X१२' या साईजच्या तीन बंदीस्त कॅबीन तयार करुन मिळणेबाबत त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीमचे प्रतिनिधी यांनी मागणी केली. त्यानुसार सदर ठिकाणी तिन नवीन ॲल्युमिनीअम केबीन्स बांधकाम विभागामार्फत तयार करणेबाबत मा. उपकार्यकारी अधिकारी यांनी सूचना केली आहे. याबाबतची मागणी माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दि.१९/११/२०१६ रोजीच्या ई- मेलद्वारे इकडील विभागास कळविली आहे.

**प्रस्ताव:-** वर नमूद स्थळ निरिक्षण मध्ये देण्यात आलेल्या निर्देशान्वये ८ फुट X १२ फुट या साईजच्या ॲल्युमिनीअम सेक्शनचे पार्टीशन मध्ये तीन केबीन मंजूर दरात तयार करणेसाठी व त्यापैकी दोन केबिनचे छताकरीता फॉल्स सिलींग तयार करणेसाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| Sr.No. | Description | Qty. | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| A)<br>1. | **Alluminium Partition**<br>Providing & fixing in position powder coating alluminium partition.<br>1) 4x3.66x2.44 m² – 35.72m²<br>2) 1x7.32x2.44 = 17.86m²<br>3) 1x2.44x2.44 = 5.95 m²<br>Less Door = 4x0.90x2.10 = -7.56<br>-------------------<br>51.97 m² | 51.97 | m² | 1883.00 | 97,859.51 |
| 2. | Providing & fixing single shuttered Alu. Powder coating door.<br>4x0.90x2.10 = 7.56m² | 7.56 | m² | 2259.60 | 17,082.58 |
| 3. | Providing & fixing Tubular door closer | 4 | Nos. | 1400.00 | 5,600.00 |
| | | | | **Total –(A)** | **1,20,542.00** |
| B)<br>1. | **False Ceiling**<br>Providing and fixing false ceiling of 15 mm thk. Acoustic tubular Armstrong / Everest/ Ams (0.60x0.60m) boards of approved make, shape & size as per drawings including powder G.I. wall angel of 20mm x 20 mmx 0.60 x 0.6mm size, G.I grid runner of size 15mm x 38 mm at 600 mm center to center both ways & suspended using G.I. 3mm wire including fixing using butterfly clips & fasteners. | 18.82 | m² | 895.00 | 16,843.90 |
| | | | | **Total –(B)** | **16,844.00** |
| | | | | **Total Amount (A+B) Rs.** | **1,37,386.00** |

उपरोक्तप्रमाणे सर्व्हरसाठी ॲल्युमिनीअम पार्टीशनमध्ये केबीन तयार करणेकामी रु.१,२०,५४२/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम मारुती ग्लास इचींग & ॲल्युमिनीअम, श्रीरामपूर यांचेकडून इकडील जा.नं.४२४८/२०१६ दि.१२/११/२०१६ रोजीचे कार्यादेशातील मंजूर दरात करुन घेता येईल. तसेच सर्व्हर केबीनचे छतासाठी फॉल्स सीलींग करणेसाठी रु.१६,८४४/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम कोटेशन मागवून करता येईल. वर नमूद मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयान्वये काऊंटर व इतर अनुषंगिक कामे करणेसाठी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आलेली आहे.

तरी वरीलप्रमाणे येणारे एकुण रु.१,३७,३८६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती. तसेच वरीलपैकी जुने प्रसादालय येथील सर्व्हरसाठी ॲल्युमिनीअम पार्टीशनमध्ये केबीन तयार करणेचे काम मारुती ग्लास इंचिंग ॲण्ड ॲल्युमिनीअम, श्रीरामपूर यांचेकडून मंजूर दरात करुन घेणेस व फॉल सिलिंगचे काम विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९११ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८ संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील जमिनीचे भोवती कुंपन करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** कलम २१ (१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल. त्यामधील पोट कलम (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन. व पोट कलम (झ) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-**

१. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २३/०५/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ३०५ खालील प्रमाणे झालेला आहे.

*".. संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील जमिनीचे भोवती आर.सी.सी. प्रिकास्ट कुंपन करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२६,९५,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली.*

*तत्पुर्वी, उपरोक्त कामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले."*

२. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १६/०२/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ७७ (०८) खालील प्रमाणे झालेला आहे.

*"..यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील जमिनीचे भोवती कुंपन करणेकामी तिस-यांदा ई-निविदांची मागणी करुनही दोनच निविदा प्राप्त झालेल्या आहेत व त्यामध्ये मे. आर. एल. भुतडा, कोपरगांव यांचे रु३६,०९,३७३.९९ मात्र निम्नतम दर आहेत. परंतु मा. उच्च न्यायालयाने सदरहू कामासाठी रु.२६,९५,०००/- मात्रचे खर्चास मंजूरी दिलेली असून प्राप्त झालेले दर रु.९,१४,३७३.९९ मात्र जादा आहेत. त्यामुळे प्रस्तावितकामी जादा येणा-या खर्चास मा. उच्च न्यायालयाची परवानगी घ्यावी अथवा पुन्हा ई-निविदांची मागणी करावी याबाबत मार्गदर्शन घेणेकामी त्रीसदस्य समितीसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."*

३. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १४/०६/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ३३० खालील प्रमाणे झालेला आहे.

*"..यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी तिस-यांदा निविदा प्रक्रीया राबविणेत आलेली असल्यामुळे प्राप्त दर स्किारणेत येऊन, मंजूर रकमेपेक्षा जादा येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत मा. औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी सिव्हील अर्ज दाखल करणेत यावा, असे ठरले."*

**मा.उच्च न्यायालय परवानगी:-** मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने– CIVIL APPLICATION NO.5062 OF 2015 IN PUBLIC INTEREST LITIGATION NO.18 OF 2011 अन्वये खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

१. The permission is sought to spend an amount of Rs.26,95,000/- for construction of compound wall in respect of three properties as indicated by resolution No.305 passed by the applicant.

२. Considering the resolution and the need shown, the applicant is allowed to construct the compound wall as prayed vide prayer clause "B". However the same be done at a competitive rate by E– tender process. The civil application is disposed of.

**प्रस्तावना:-** मा. व्यवस्थापन समितीचे व मा. उच्च न्यायालयाचे उपरोक्त मान्यतेनुसार मौजे को-हाळे येथील गट नं.९७ पैकी व मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १२४/११ व १२४/१२ आणि सर्व्हे नं. २०७/२ मध्ये संरक्षणाचे दृष्टीने कुंपन करणेसाठी प्रथम दि.३०/०६/२०१५ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन दि.०५/०८/२०१५ अखेर ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. विहीत मुदतीत दोन ठेकेदारांनी ई-निविदा सादर केल्या होत्या. फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्या असल्याने, प्राप्त निविदांचे तांत्रीक लिफाफे संबंधित ठेकेदार यांना परत करणेत येऊन याकामी फेर निविदा (व्दितीय मागणी) मागविणेस इकडील दि.२४/०९/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार याकामी ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन दि.१३/१०/२०१५ पर्यंत निविदा अपलोड करणेची मुदत देणेत आली होती. सदरचे विहीत मुदतीत एकही निविदा अपलोड झालेली नसल्याने, सदरकामी तिस-यांदा ई-निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविणेस दि.३०/१०/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देणेत आली आहे. याकामी दैनिक सार्वमत या वृत्तपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन सदर ई-निविदा अपलोड करणेची मुदत दि.०५/१२/२०१५ अखेर देणेत आली होती.

विषयांकीत कामासाठी तिस-यांदा ई – निविदा मागवून प्राप्त झालेल्या ई – निविदा मधील पात्र ठेकेदार यांचे लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) मा.उपसमितीचे सभेपुढे उघडून त्यावर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यानुसार सदर निविदेचा लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) दि.०४/०२/२०१६ रोजीचे उपसमितीचे सभेपुढे उघडणेत आला असून, त्यांचे दरांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Bidder Name | Estimated Rate | Quoted Percentage | Rate | Remark |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Magbul Badashah Shaikh | 2689548.4308 | 35.33 | 3639765.89 | |
| 2. | M/s. R. L. Bhutada | 2689548.4308 | 34.2 | 3609373.99 | Lowest |

विषयांकीत कामासाठी सन २०१३ चे बाजारभावानुसार रु.२६,९५,०००/- मात्र रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यात ६' उंचीचे प्रिकास्ट कंम्पाउंड करीता रु.९७४/- प्रती चौ. मी. दर गृहीत धरण्यात आला होता. आता, जिल्हा दरसूची २०१५-१६ मध्ये याकामाचा दर रु.१२५०/- प्रती चौ. मी. दिलेला आहे. त्यानुसार अंदाजपत्रकातील दरापेक्षा सध्याचे जिल्हादरसूची (DSR) मधील दर २८.३४% अधिक नुसार रु.३४,५८,७६३/- इतकी रक्कम होते.

वरील प्रमाणे प्राप्त झालेले दराबाबत मा. त्रिसदस्य समितीचे दि.१६/०२/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र.७७ (०८) नुसार सदरहू कामासाठी मा. उच्च न्यायालयाने रु.२६,९५,०००/- मात्रचे खर्चास मंजूरी दिलेली असून प्राप्त झालेले दर रु.९,१४,३७३.९९ मात्र जादा आहेत. त्यामुळे प्रस्तावितकामी जादा येणा-या खर्चास मा. उच्च न्यायालयाची परवानगी घ्यावी अथवा पुन्हा ई-निविदांची मागणी करावी याबाबत मार्गदर्शन घेणेकामी मा. त्रीसदस्य समितीसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा असे ठरले आहे.

याबाबतचा प्रस्ताव तत्कालीन मा. त्रिसदस्य समितीचे दि.१४/०६/२०१६ रोजीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.३३० अन्वये, *"..यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी तिस-यांदा निविदा प्रक्रीया राबविणेत आलेली असल्यामुळे प्राप्त दर स्किारणेत येऊन, मंजूर रकमेपेक्षा जादा येणाऱ्या खर्चास संस्थान वकिलामार्फत मा. औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी सिव्हील अर्ज दाखल करणेत यावा, असे ठरले."*

आता, मा. व्यवस्थापन समितीची नेमणूक झालेली आहे. त्यामुळे उच्च न्यायालयाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेची आवश्यकता नाही. ठेकेदार मे.आर.एल. भुतडा, कोपरगांव यांनी त्यांचे दि.०९/०९/२०१६ रोजीचे पत्रान्वये, कळविले आहे की, विषयांकीत कामासाठी तिस-यांदा ई-निविदा प्रक्रीया राबविणेत आली होती. त्यानुसार सदरची ई-निविदा डीसेंबर, २०१५ मध्ये अपलोड केली असून आमचे निम्नतम दर असल्याने आम्हाला काम देण्यात यावे.

याकामी फेर निविदा मागवून काम करुन घ्यावे अथवा निम्नतम दराचे ठेकेदार मे. आर. एल. भुतडा, कोपरगांव यांना कार्यारंभ आदेश देणेत यावा याबाबतनिर्णय होणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर मा मुख्यलेखाधिकारी यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

*"..बांधकाम विभागाने प्रस्तावित केल्यानुसार सध्याचे DSR नुसार कामाची अंदाजीत किंमत रु.३४,५८,७६३/- आहे. व निविदेतील निम्तम दर रु.३६,०९,३७३/- असा आहे. म्हणजेच नव्याने निविदा मागविल्यास Estimate Cost असणार आहे त्यापेक्षा L1 निविदाधारकाचे दर ४.३६% (पूर्वी ३४%) ने जास्त आहेत. त्यामुळे निविदाधारक तयार असल्यास आवश्यक ती सुरक्षा अनामत रक्कम घेऊन त्यांना कार्यारंभ आदेश देण्यास हरकत नसावी."*

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व कोऱ्हाळे येथील जमिनी भोवती कुंपन करणेचे काम उत्पादक कंपन्यांकडून करुन घेण्यात यावे, असे समितीचे मत झाले. याकरीता सदरहू फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षानिमित्त शासनामार्फत गठीत करण्यात आलेल्या कृती आराखडा उपसमितीच्या दि.०६.१०.२०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि. १८ ऑक्टोबर २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यामार्फत दि.०१ऑक्टोबर २०१७ ते १८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) या कालावधीमध्ये श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. महासमाधी शतक महोत्सवी वर्षानिमित्त शिर्डीमध्ये येणा-या साईभक्तांना विविध सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासनामार्फत कृती आराखडा समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीला सादर करावयाचा प्रारुप कृती आराखडा अंतिम करण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या उपसमितीची व्दितीय बैठक दि.०६ ऑक्टोबर, २०१६ रोजी सकाळी ११:०० वाजता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य सचिव समिती कक्ष, मंत्रालय, मुंबई येथे पार पडली. सदरहु बैठकीचे इतिवृत्त इकडील विभागास प्राप्त झाले असून सदर इतिवृत्तात खालीलप्रमाणे कार्यवाही नमूद आहे. सोबत इतिवृत्त अवलोकनार्थ जोडले आहे.

सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

१) श्री. स्वाधिन क्षत्रिय, मा. मुख्य सचिव
२) श्री. सुरेश काशीनाथ हावरे, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
३) श्री. प्रताप सखाहारी भोसले, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
४) श्री. दिनेश कुमार जैन, अ.मु.स. (वित्त), मंत्रालय, मुंबई
५) श्री. एन. जे. जमादार, प्रधान सचिव व विधी परामर्शी (विधी व न्याय), मंत्रालय, मुंबई
६) श्री. एकनाथ डवले, विभागीय आयुक्त, नाशिक
७) श्री. अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर
८) श्री. बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
९) श्री.सी.आर. गजभिये, मुख्य अभियंता तथा वि.कार्य. अधिकारी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) श्री. संदिप आहेर, उपकार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
११) श्री. भालचंद्र दाते, प्रकल्प सल्लागार, टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. मुंबई
१२) श्री. नितीन चंद्रकांत देसाई(कला दिग्दर्शक/सल्लागार), मुंबई
१३) श्री. यशवंत डांगे मुख्य अधिकारी, शिर्डी नगरपंचायत शिर्डी

बैठकीचे प्रास्ताविक श्री. एन. जे. जमादार, सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग, यांनी केले. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाच्या पूर्व तयारीकरीता संस्थानमार्फत तयार करण्यात आलेल्या प्रारुप कृती आराखड्याचे सादरीकरण उप समितीच्या दि.२६/०५/२०१६ रोजीच्या बैठकीत करण्यात आले होते. सदर सादरीकरणाअंती प्रारुप कृती आराखड्यामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. सदर निर्णयानुसार मा. विभागीय आयुक्त, नाशिक व जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री साईबाबा संस्थान आणि राज्य शासनाचे विविध विभाग यांनी अंमलबजावणी करावयाच्या प्रस्तावांची विभागणी प्रथम प्राधान्य गट व व्दितीय प्राधान्य अशी करण्यात आली आहे. प्रारुप कृती आराखड्यामध्ये समावेश असलेल्या प्रकल्पांचे सादरीकरण जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी सादर केले.

मा. मुख्य सचिव यांनी दिलेल्या निदेशाप्रमाणे सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ. नं. | बैठकीत घेतलेले निर्णय | निर्णयाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा/ अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण होण्यास अपेक्षित कालावधी |
|---|---|---|---|
| १ | साईबाबा मल्टिमिडीया थीम पार्क अंतर्गत लेझर शो आणि सिव्हील वर्क करणे प्रस्तावित आहे. सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी राज्य शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या पाच सदस्यांची समिती नेमली आहे. सदर समितीने अहवाल सादर करणे अपेक्षित आहे मात्र याकरीता समितीला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या स्थापत्य व विद्युत सल्लागारांची आवश्यकता असल्याने माहिती व तंत्रज्ञान विभागाव्दारे अहवाल प्राप्त करुन घेऊन समितीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या स्थापत्य व विद्युत सल्लागाराच्या समावेशास मान्यता देण्याची विनंती मा. उच्च न्यायालयास करण्यात यावी. | प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई | तात्काळ |
| २ | श्री साईबाबा संस्थानने सादर केलेल्या प्राथमिक कृती आराखडयाची छाननी करण्यात आली असून आवश्यक प्रस्तावांचा प्राथम्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. यास्तव प्रारुप कृती आराखडा अंतिम करण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या प्रारुप कृती आराखडा समितीची बैठक आयोजीत करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर बैठकीपुर्वी संबंधीत विभागांच्या प्रधान सचिव स्तरावरील अधिका-यांची संयुक्त बैठक मा. मुख्य सचिव यांच्या दालनात आयोजित करण्यात यावी. | प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई | तात्काळ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | प्रारुप कृती आराखडयामधील अंदाजपत्रकात विशेषतः शिर्डी नगरपंचायत, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्यामार्फत अंमलबजावणी करावयाच्या रस्ते विकास प्रकल्पांची तपासणी विधी व न्याय विभागाने सचिव, रस्ते, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांचेमार्फत करुन घेण्यात यावी. | सचिव, (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग आणि प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई | तात्काळ |
| ४ | प्रथम प्राधान्य गटातील एकूण रु. ६१७.५१ कोटी इतक्या रकमेच्या प्रस्तावांची अंमलबजावणी श्री साईबाबा संस्थान व महाराष्ट्र शासन यांच्या निधीतून करण्यात यावी. व्दितीय प्राधान्य गटातील एकूण रु.२५६८.६६ कोटी रकमेच्या प्रस्तावांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडून निधी मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा. निधी मिळण्याकरीता एकत्रित व सविस्तर प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात यावा. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | तात्काळ |
| ५ | केंद्र शासनास सादर करावयाचा दिर्घ मुदतींचा प्रस्ताव श्री साईबाबा संस्थान, राज्य शासन व केंद्र सरकार असा वेगवेगळा न करता एकत्रित स्वरुपात करण्यात यावा. कृती आराखडा तसेच शताब्दी महोत्सवाबाबतची माहिती सहज तथा सुलभतेने समजावी याकरीता दृकश्राव्य स्वरुपात दहा मिनिटांची बहुभाषीय चलचित्र (फिल्म) तयार करण्यात यावी. | विभागीय आयुक्त, नाशिक आणि कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | |

उपरोक्त इतिवृत्तावरील कार्यवाहीचा तपशिल खालीलप्रमाणेः-

अ. क्र. ०१ बाबतची कार्यवाहीः- श्री साईबाबा मल्टीमिडीया थिम पार्क अंतर्गत लेझर शो आणि सिव्हील वर्कचे कामाबाबत मुल्यमापन करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभागाच्या ०५ सदस्यांची समिती नेमलेली होती. सदरच्या समितीला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या स्थापत्य व विद्युत सल्लागाराची आवश्यकता असल्याने मा. उच्च न्यायालयाचे दि.२५/१०/२०१६ रोजीचे आदेशाने या समितीत श्री. एस. आर. शिंदे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पश्चिम विभाग, औरंगाबाद तसेच श्री सय्यद मुनिर पाशा, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम(विद्युत), औरंगाबाद यांची समितीत नेमणूक करणेत आलेली आहे.

या प्रकरणी मा. उच्च न्यायालयात दि.२५/११/२०१६ रोजी हि तारीख नेमलेली असून उपरोक्त समितीने या तारखेस अहवाल जमा करणेबाबत न्यायालयाने आदेश केलेला आहे.

अ. क्र. ०२ बाबतची कार्यवाहीः- याबाबतची कार्यवाही इतिवृत्तात नमूद केलेप्रमाणे प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडून होणे अपेक्षित आहे.

अ. क्र. ०३ बाबतची कार्यवाहीः- अवर सचिव, सार्वजिनक बांधकाम विभाग,मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रारुप कृती आराखड्यात समावेश करण्यात आलेल्या शिर्डी नगरपंचायत, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्यामार्फत अंमलबजावणी करावयाच्या रस्ते विकास प्रकल्पांचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. याबाबत पुढील कार्यवाही सचिव (रस्ते) सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत होणे अपेक्षित आहे.

अ. क्र. ०४ बाबतची कार्यवाहीः- प्रथम प्राधान्य गटातील संस्थानमार्फत करावयाच्या प्रथम प्राधान्य गटातील रु.३००.०४ कोटी मात्रची कामे संस्थान निधीतून तर शासनाच्या इतर विभागाचे रु.३१७.४७ कोटी मात्रची कामे महाराष्ट्र शासन यांच्या निधीतून करणेस मान्यता दिलेली आहे. तथापी याबाबतची कार्यवाही मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समिती सभेचे अंतिम निर्णयान्वये कार्यवाही करता येईल.

तसेच इतिवृत्तात नमूद केलेप्रमाणे व्दितीय प्राधान्य गटातील रु.२५६८.६६ कोटी रकमेच्या प्रस्तावाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडून निधी मिळण्यासाठी प्रस्ताव तयार करणेची कार्यवाही टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स, मुंबई यांचेमार्फत करणेत येत आहे सदरचा प्रस्ताव मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांच्या मार्गदर्शनाखाली अंतिम करुन शासनाकडे सादर करणेत येईल.

अ. क्र. ०५ बाबतची कार्यवाहीः- शताब्दी कृती आराखडा तसेच महोत्सवाबाबतची माहिती सहज किंवा सुलभतेने समजावी या करीता दृकश्राव्य स्वरुपात १० मिनिटांची बहुभाषीय चलचित्र (फिल्म) तयार करणेसाठी येणा-या खर्चास मान्यतेसाठीचा स्वतंत्र प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत येत आहे. याकामी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कार्यवाही करुन बहुभाषीय चलचित्र (फिल्म) तयार करणेत येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे कृती आराखडा उप-समितीच्या दि.०६/१०/२०१६ रोजीच्या बैठकिचे इतिवृत्त व त्यावरील कार्यवाहीचा अहवाल आपले माहितीस्तव तथा निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षानिमित्त शासनामार्फत गठीत करण्यात आलेल्या कृती आराखडा उपसमितीच्या दि.०६.१०.२०१६ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्ताचे अवलोकन करणेत येऊन, त्यांची नोंद घेण्यात आली.**

**तसेच यापुढे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षानिमित्त होणाऱ्या बैठकांसाठी सर्व समिती सदस्यांना आमंत्रित करणेबाबत शासनास कळविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०** **मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल करुन मागे घेतलेल्या २४ सिव्हील ॲप्लीकेशनची वकील फी बील मिळणेबाबत ॲडव्होकेट श्री.संजय चौकीदार यांची मागणी.**

**प्रस्ताव-** श्री राजेंद्र भाऊसाहेब गोंदकर, व इतर, यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद, यांचेसमोर पी.आय.एल. नं.१८/२०११, महाराष्ट्र शासन व संस्थान (प्रतिवादी नं.२), श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे तत्कालीन, मा. विश्वस्त (प्रतिवादी नं. १८) यांचे विरुध्द् दाखल करण्यात आले होते.

प्रस्तुत पी. आय. एल. १८/ मध्ये मा.उच्च न्यायालयाने, दि.१३/३/२०१२, रोजी खालील प्रमाणे आदेश केलेला आहे.

We direct the State Government to constitute a new “the Shree Sai Baba Sansthan Management Committee” within a period of 15 days from today. On failure of the State Government to constitute the said Committee within the stipulated time frame of 15 days in accordance with the provisions of Section 5 of the Act of 2004, we direct that, until the State Government constitutes a new Committee, the affairs of the “Shree Sai Baba Sansthan Trust, Shirdi” shall be supervised, monitored and looked after by a committee consisting of :

(A) The Principal District Judge, Ahmednagar.

(B) The Collector, Ahmednagar.

(C) The Chief Executive Officer of Shree Sai Baba Sansthan Trust Shirdi.

The Principal District judge, Ahmednagar shall be the Chairman of the Committee and rest of two officers shall be the Members of the Committee. The Management Committee shall hold meetings as per the agenda prescribed and as per the requisition issued by the Principal District Judge, Ahmednagar.

In case the State Government fails to constitute a new Committee within the stipulated period of 15 days from today, “the Shree Sai baba Sansthan Management Committee” constituted on 23rd August 2004 is injuncted from functioning as such and discharging its duties.

The existing Committee and the Committee constituted by this Court is directed not to take any major financial decision in respect of management of the affairs of the Sansthan without intimating this Court.

तसेच, प्रस्तुत पी. आय.एल.नं.१८/२०११, मधील सिव्हील अर्ज क्र. १२०५६/२०१२, मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१६/१०/२०१६, रोजी खालील प्रमाणे आदेश केलेला आहे.

क्लॉज नं. 6) We direct that, without prior permission of this Court, the Committee,

(a) shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the Respondent No.2trust;

(b) shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2trust;

(c) shall not take any major financial decision of whatsoever nature;

(d) shall not take steps to recruit staff, employees in regular vacancies;

(e) shall not convert precious metals in any form nor melt it in any form.

प्रस्तुत निकालास अनुसरुन, मा.त्रिसदस्य समितीचे निर्णयास अनुसरुन मोठया रक्कमांचे खर्चास/ कामास, मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणे कामी, ॲड संजय आर. चौकीदार यांचे मार्फत खालील प्रमाणे सिव्हील ॲप्लीकेशन , मा.उच्च न्यायालय मुंबई, खंउपीठ औरंगाबाद, यांचेकडे दाखल केले होते.

महाराष्ट्र शासनाने, दि. २७/८/२०१६, रोजीचे आदेशाने संस्थानचा कारभार पहाणेसाठी नव्याने मा. व्यवस्थापन समितीचे सदस्यांची नियुक्ती केली आहे, मा.उच्च न्यायालयाने दि.१३/३/२०१२, रोजीचे आदेशाने गठीत केलेली, मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, यांचेकडे दाखल केले होते.

महाराष्ट्र शासनाने, दि.२७/८/२०१६, रोजीचे आदेशाने संस्थानचा कारभार पहाणेसाठी नव्याने, मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांची नियुक्ती केली आहे, मा. उच्च न्यायालयाने, दि.१३/३/२०१२, रोजीचे आदेशाने गठीत केलेली, मा. त्रिसदस्य समिती संपुष्टात आलेली असल्याने, मा. उच्च न्यायालयात खर्चास / कामास परवानगी मिळणेकामी दाखल केलेले सदर सिव्हील ॲप्लीकेशन्स् , मा. कोर्टातुन मागे घेणेस, मा. व्यवस्थापन समितीने, दि.१६/८/२०१६, रोजीचे, सभेत निर्णय क्र.५६६, अन्वये, मंजुरी दिलेली आहे, सदर निर्णयास अनुसरुन, ॲड श्री एस. आर. चौकीदार, यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले सिव्हील ॲप्लीकेशन्स, दि.८/९/२०१६ व दि.१५/९/२०१६, रोजी मागे (withdraw) घेतले आहे.

खालील तक्त्यातील २४ सिव्हील ॲप्लीकेशन्स् मध्ये, ॲड श्री चौकीदार, यांनी प्रत्येकी ड्राफ्टींग फी रु.२,५००/- मे. कोर्टातील हेअरींगसाठी ५,०००/-, टायपींग, कोर्ट फी, स्टेनो व इतर क्लेरीकल चार्जेस, इतर

खर्चाकामी रु.२,५००/-, असे एकुण रु.१०,०००/- प्रमाणे प्रत्येक सिव्हील अर्जाची वकील फी ची मागणी केलेली आहे.

| क्र. | सिव्हील अर्जाचा तपशील | सिव्हील अर्ज नं. | मागे घेतल्याची तारीख |
|---|---|---|---|
| १) | मंदिर परिसरातील फलोअरिंगचे नुतनीकरण करणे कामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत. | ७८९६/२०१३ | |
| २) | श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील दुस-या टप्प्यामध्ये २०० खोल्यांचे नुतनीकरण करणेस मान्यता मिळणेबाबत. | १३२८२/२०१३ | |
| ३) | श्री साईबाबा मल्टीमिडीया थिमपार्क प्रकल्पाअंतर्गत लेजर शो प्रकल्पाकरीता आवश्यक सिव्हील वर्क करणेचे कामासाठी नव्याने निविदा काढणेस मान्यता मिळणेबाबत. | १५६९६/२०१३ | |
| ४) | साईआश्रमसाठी एसएसएस पाईप खरेदीस झालेल्या वाढीव खर्चाची माहिती उच्च न्यायालयास देणेबाबत. | १७७४/२०१४ | |
| ५) | मा. उपकार्यकारी अधिकारी यांचेकरीता निवासस्थानाचे बांधकाम करणेस मा. उच्च न्यायालयास देणेबाबत. | १०५३/२०१५ | |
| ६) | संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे, गट नं.१९५ पै. मधील हेलीपॅड भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे दुरुस्ती करणेबाबत. | ५०७३/२०१५ | |
| ७) | शिर्डी येथे विमानतळ उभारणेकामी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित , मुंबई यांना अर्थ सहाय्य करणेबाबत. | ६८५२/२०१५ | |
| ८) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या निधीतुन शिर्डी, शहरातील व्दितीय प्राधानय गटातील भूसंपादनाची आवश्यकता नसलेल्या १७ रस्त्यांचे विकसनाबाबत. | ५०७२/२०१५ | |
| ९) | श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को. सोसायटी लि., शिर्डी, यांना लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर वापरास देण्यात आलेल्या व्यवसायांचे मुदतवाढीबाबत. | १०४२६/२०१४ | |
| १०) | सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ मधील संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करण्यात आलेल्या अतिरिक्त साई सुविधांकरीता झालेल्या खर्चाचा अहवाल सादर करणे मुदतवाढ मिळणेबाबत. | १६५२३/२०१५ | |
| ११) | १) सिंहस्थ कुंभमेळया करीता झालेल्या खर्चाचा अहवाल, मा.कोर्टास सादर करणेबाबत.<br>२) सिंहस्थ कुंभमेळा करीता शिर्डी पोलीस स्टेशनसाठी भाडेतत्वावर मध्यवर्ती उदघोषणा कक्ष उभारणेबाबतचा खर्च मा. उच्च न्यायालयाला कळविणेबाबत. | ३५००/२०१५ | ८/९/२०१६ |
| १२) | दर्शन हॉलमधील स्टील बेंच रिलींगबाबत. | ६८४७/२०१५ | |
| १३) | दैनदिन वापराचे निरुपयोगी भंगार / डेडस्टॉक / मिसलेनिअस तसेच सादील स्वरुपाचे साहित्य विक्री करणेस मान्यता मिळणेबाबत. | १३२७९/२०१३ | |
| १४) | सन २०१४-२०१५ करिता ब्लीचींग पावडर फेरिक अॅलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेस मान्यता घेणेबाबत. | ५८१५/२०१४ | |
| १५) | शिर्डी नगरपंचायत यांना पाणी साठवण तलावास कागद टाकणेसाठी अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत. | ६५४४/२०१६ | |
| १६) | शिर्डी शहरामध्ये प्रवेश करणा-या वाहनांवर शिर्डी नगरपंचायत मार्फत स्वच्छता कर वसुल न केल्यामुळे भरपाई रक्कम वाढीव दरासह मिळणेबाबत. | ४७५३/२०१५ | |
| १७) | मा. कोर्टास विनंती करुन रु.१ कोटी पर्यंतचा खर्च मा. विश्वस्त समितीचे मान्यतेने करणेबाबत. | ५८११/२०१४ | |
| १८) | साठा संपत आलेल्या संस्थान निर्मीत सीडी व डिव्हीडीचे पुननिर्मीती विहित पध्दतीने ई-निविदा मागवून करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत. | १२४५८/२०१६ | |
| १९) | दरवर्षीप्रमाणे सन २०१७ ची श्री साई दैनंदिनी / दिनदर्शीका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शीका छपाई करुन विक्री करणेबाबत. | १२४५७/२०१६ | |
| २०) | आय.एस.ओ चे ऑडीटर यांनी सुचविलेल्या साईआश्रम भक्तनिवास मधील प्रत्येक रुमला बाहेरुन सप्लाय बंद करणेसाठी दरवाजावर मास्टर स्वीचसह वायरींग करणेबाबत. | ४७४४/२०१५ | |
| २१) | संस्थान कर्मचा-यांना सानुग्रहअनुदान देणेबाबत. | १३२८४/२०१३ | |
| २२) | श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये परफयुजनिस्टचे आणखी एका पदाचा समावेश करणेकामी उच्च न्यायालयाची मान्यता घेणेबाबत. | १२४५९/२०१६ | |
| २३) | श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटलचे यांत्रिकीकरणासह स्वच्छता कामाकरीता ई निविदा मागविणेबाबत. | १२४५६/२०१६ | |
| २४) | मौजे शिर्डी येथील अंतर्गत रस्ते विकसीत करणेकामी भूसंपादन व इतर खर्चाकामी रक्कम रु.१११.५४५ कोटी खर्चास मान्यता मिळणेबाबत. | ८७०९/२०१४ | १५/९/२०१६ |

अॅड. श्री एस. आर. चौकीदार, यांनी, उपरोक्त एकुण २४ सिव्हील अॅप्लीकेशनससाठी रु.२,४०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख चाळीस हजार मात्र ) मागणी केलेली आहे.

अॅड.श्री एस. आर. चौकीदार, यांनी, उपरोक्त सिव्हील अॅप्लीकेशन्स् , संस्थानने दिलेल्या पत्रानुसार मा. उच्च न्यायालयातुन, दि.८/९/२०१६ व दि. १५/९/२०१६, रोजी मागे (withdraw) घेतलेले आहे, प्रस्तुतचे काही सिव्हील अॅप्लीकेशन्स्मध्ये, मा. कोर्टाने वेळोवेळी नुसत्या तारखा दिलेल्या आहेत. सुनावणी (Hearing) झालेली नाही, तर काही सिव्हील अर्ज दाखल केल्या पासुन बोर्डावर आलेले नाही, त्यामुळे, अॅड. श्री.चौकीदार, यांना वरील २४ सिव्हील अॅप्लीकेशनमध्ये प्रती सिव्हील अॅप्लीकेशनसाठी १०,०००/- याप्रमाणे एकुण २४ सिव्हील अॅप्लीकेशनसाठी रु. २,४०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख चाळीस हजार मात्र ) अॅड संजय आर चौकीदार यांनी दि.२७/८/२०१६ चे पत्राने मागणी केली आहे.

अॅडव्होकेट चौकीदार यांना वकील फी अदा करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/२/२०१३ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय १४ विश्वस्तांच्या सुचनांबाबत मधील निर्णय क्र. २५७ ने मा. विश्वस्तांनी सभेत सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या. ०२) अॅड चौकीदार हे मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थानचे वतीने विनातक्रार काम पहात आहेत. त्यांना अॅड धोर्डे यांचे मानधनाप्रमाणे मानधन देण्यात यावे असा निर्णय झालेला आहे.

तरी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयांस अनुसरुन अॅडव्होकेट संजय आर चौकीदार यांनी उपरोक्त सिव्हील अॅप्लीकेशन मा. उच्च न्यायालयातुन दि. ८/९/२०१६ व दि. १५/९/२०१६ रोजी मागे (withdraw) घेतलेले आहे, प्रस्तुतचे २४ सिव्हील अॅप्लीकेशनमध्ये प्रती सिव्हील अॅप्लीकेशनसाठी १०,०००/- या प्रमाणे रु.२,४०,०००/- अक्षरी रु. दोन लाख चाळीस हजार मात्र अॅड संजय आर चौकीदार यांना अदा करणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अॅडव्होकेट संजय आर चौकीदार यांनी मा.उच्च न्यायालयामधील २४ सिव्हील अॅप्लीकेशनमधील प्रती सिव्हील अॅप्लीकेशनसाठी रु.१०,०००/- मात्र वकील फी ची मागणी केलेली आहे. परंतु या २४ अॅप्लीकेशनपैकी किती अॅप्लीकेशनवर मा.उच्च न्यायामध्ये सुनावणी केलेली आहे, याचा उपरोक्त प्रस्तावामध्ये उल्लेख दिसून येत नाही. याकरीता समिती सदस्य अॅड॰मोहन जयकर यांनी अॅड॰ संजय चौकीदार यांचेबरोबर चर्चा करुनफी बाबत अंतीम निर्णय घ्यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.११** **मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील रिट पिटीशन नं.२०१४/ २०१४, ३३०/२०१५ व २०८४/ २०१६ मधील संस्थानसाठी विविध उपक्रमांसाठीचे आरक्षण क्र.३९ मधील जमीन स.नं.१२६ व १२४ पैकी क्षेत्र ४ हे.५४ आर. १८ चौ.मी. हे भू-संपादन प्रक्रियेने घेणे अथवा न घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद, येथे संस्थानचे विरुध्द् दाखल केलेले रिट पिटीशन नं.२०४०/ २०१४, डॉ.सतोष लोढा विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर, रिट पिटीशन नं.३३०/२०१५, भिमाबाई पंढरीनाथ शेळके विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर, रिट पिटीशन नं.२०८४/२०१६, श्री चंद्रकांत रतिलाल मेहता विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर हे, मौजे शिर्डी, येथील स.नं. १२४, १२६, आरक्षण क्र.३९, क्षेत्र ४ हे. ५४ आर. १८ चौ.मी. चे भूसंपादना संदर्भात दाखल झालेले आहे .

मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी, यांनी, दि.२०/१०/२०१६, रोजीचे पत्राने, मा.जिल्हाधिकारी, यांना भूमी संपादन अधिनियम् २०१३ व भूसंपादन अधिनियम १८९४ मधील तरतुदीच्या अनुषंगाने संपादित जागेचे ठरविण्यासाठी करावयाचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली आहे, त्यामध्ये आरक्षण क्र. ३९ चे संदर्भात खालील प्रमाणे माहिती नमुद केली आहे.

| अ.क्र | एलएक्यु एस आर | गावाचे नाव | क्षेत्र हे. आर. चौ.मी. | भूसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम (४) सुचनेचा दिनांक कलम (६)ची अधिसुचना | भूसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम ४ प्रसिध्दी दिनांकानुसार येणारे मुल्यांकन | त्यानुसार देय होणा-या मोबदल्याची रक्कम | भूसंपादन अधिनियम २०१३ लागु झाल्याचा दिनांक १/१/२०१४ नुसार येणारे मुल्यांकन | त्यानुसार देय होणा-या मोबदल्याची रक्कम | वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १६/२००० | शिर्डी | ४-५४-१८ | ४/७/२००२ | ४,१७,५४,५२५/- | १५,३४,५६,४०३/- | ३८,७७,२०,७६४/- | ९१,४८,२०,७६४/- | ७६,१३,६४,३६१/- |

प्रस्तुत प्रकरणी, मे.कोर्टाने, दि.७/१२/२०१६, रोजी तारीख नेमलेली होती, सदर तारखेस विधी विभागाचे प्र.विधी अधिकारी अशोक शंकरराव वाळुंज व लिपीक टंकलेखक संदिप अ. सालकर, यांनी तारीख हजर केली, मा. कोर्टात पुकारल्यानंतर पिटीशनरचे वकीलांनी रिट पिटीशनची माहिती सांगून सेक्शन ६ ची नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून नुकसान भरपाईचा मोबदला मिळावा अशी विनंती केली, त्यावर, मा. कोर्टाने संस्थानचे वकील, श्री भवर सो., यांना विचारणा केली, त्यावर, त्यांनी भूसंपादनाची प्रक्रीयाही सन, २००२, चे अधिसुचनेनुसार चालू आहे, मध्यंतरीचे काळात सदर क्षेत्रातून रस्ता गेल्याने पुन्हा क्षेत्र कमी झाले व क्षेत्राची निश्चीती करुन भूसंपादनाचे प्रक्रियेस पुन्हा सुरुवात झाली, सेक्शन ६ ची नोटीस जरी, सन,२०१३, साली काढली

असली तरी भूसंपादन प्रक्रिया ही सन, २००२ पासून चालू आहे, तसेच, भूसंपादन संस्था ही धर्मदाय संस्था आहे असे सांगीतले, त्यावर, मा. कोर्टाने भूसंपादन प्रक्रिया जरी सन, २००२, पासून चालू असली तरी सेक्शन ६ ची नोटीस सन, २०१३, साली निघाली आहे, त्यामुळे, प्रकरणी सेक्शन ६ चे नोटीस प्रसिध्द झाल्यापासून रक्कम देणेबाबत विचार करावा असे सांगून प्रकरणी, दि.१६/१२/२०१६, रोजी पुढील तारीख नेमलेली आहे.

तारीख झाल्यानंतर, ॲड.श्री नितीन भवर यांचेशी प्रकरणी चर्चा केली असता, मा. कोर्ट, जर सन, २००२ च्या रेट नुसार जमीन संदर्भात परवानगी देत असेल तर भूसंपादनासाठी अंदाजे रु.१५,३४,५६,४०३/- इतका खर्च येणार आहे, परंतू, जर मा. कोर्टाने सन, २०१३, चे नोटीफिकेशन नुसार भूसंपादन करण्याचा आदेश केला तर, दि.०१/०१/२०१४, पर्यंतच अंदाजे रु.९१,४८,२०,७६४/-, इतकी रक्कम अदा करावी लागणार आहे, सदरची रक्कम, मा.कोर्टातचा आदेश होई पावेतो आणखी वाढेल, सदर प्रकरणी पुढील तरीख, दि.१६/१२/२०१६, नेमलेली आहे, सदर तारखेस, मा. उच्च न्यायालयात भूसंपादन प्रक्रिये पोटी द्याव्या लागणा-या नुकसान भरपाईच्या रक्कमेबाबत, ॲड., श्री नितीन भवर, यांना माहिती द्यावयाची आहे.

प्रस्तुत आरक्षण क्र.३९ मधील जमीन संस्थानला मिळणेकामी शासनाकडे रक्कम रु.१६,१६,३१,४४४/- जमा केली आहे, सदरचे क्षेत्र संस्थानचे मालकीचे स.नं.१२४/१ क्षेत्र ८८ आर ३५ चौ.मी. (सेट्रल गोडवून) चे जवळ आहे.

उपरोक्त आरक्षण क्र.३९ ची भूसंपादनाची कार्यवाही चालू ठेवली अथवा रद्द केली तरी देखील शासनास आस्थापना खर्च ३% इतका अंदाजे रु. ४७,०७,७१२/- इतकी रक्कम अदा करावी लागणार आहे.

उक्त आरक्षणातील जमीनी संबंधीत जमीन मालकांकडून थेट पध्दतीने खेरदी करावयाच्या झाल्यास सन, २०१६-१७, चे शासनाचे रेडीरेकनर प्रमाणे स.नं.१२४ चे प्रती चौ.मी. दर रु.१५,३००/-, प्रमाणे क्षेत्र १ हे. ०३ आर. १६ चौ. मी. ची रक्कम रु.१५,७८,३४,८००/-, इतकी होत असून, स.नं.१२६ चे प्रति चौ.मी.दर ८,५००/-, प्रमाणे ३ हे. ५१ आर. ०२ चौ. मी. ची रक्कम रु.२९,८३,६७,०००/-, इतकी होत आहे, म्हणजेच प्रस्तुत आरक्षण क्र.३९ मधील एकुण क्षेत्र ४ हे. ५४ आर १८ चौ.मी. ची एकुण रक्कम रु.४५,६२,०१,८००/-, इतकी होत आहे, मात्र सदरचे क्षेत्र भूसंपादन प्रक्रियेव्दारे घ्यावयाचे झाल्यास, त्यासाठी, दि.०१/०१/२०१४, पर्यंतची अंदाजे रक्कम रु.९१,४८,२०,७६४/-, इतका खर्च व दि.०१/०१/२०१४, पासून ते, मे. कोर्टाचा आदेश होईपावेतोच्या तारखेपर्यंत सदर खर्चात आणखी वाढ होणार आहे.

**विभागाचा अभिप्राय-** मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद हे उक्त दाव्या मध्ये आरक्षण क्र.३९ मधील क्षेत्र ४ हे. ५४ आर. १८ चौ.मी. चे भूसंपादना संबंधी नुकसान भरपाईची रक्कम वादी यांना सन, २०१३, चे सुधारीत भूसंपादन कायद्या प्रमाणे अदा करण्याबाबतचे आदेश निर्गत करणार असल्याची शक्यता नाकारत येत नाही, त्याप्रमाणे, सन, २०१३, च्या सुधारीत भूसंपादन कायद्यान्वये संबंधीत जमीन मालकांना फार मोठ्या प्रमाणावर भूसंपादना पोटी नुकसान भरपाईची रक्कम द्यावी लागेल, भूसंपादन प्रक्रियेव्दारे सदर जमीन संपादन करणे संस्थानला आर्थीक दृष्ट्या फायद्याचे होणार नाही, म्हणून, सदरचे क्षेत्र सन २००२, च्या अधिसुचनेनुसार व जुन्या भूसंपादन कायद्यानुसार व संस्थानची गरज तपासुन कार्यवाही व्हावी असे मत आहे. तरी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.९१५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, आरक्षण क्र.३९ मधील क्षेत्रा संबंधी जमीन मालकांमध्ये आपआपसात वाद असून, त्या जागेवर बेकायदेशीर अतिक्रमणे सुध्दा आहेत. तसेच सुधारीत भूसंपादन कायदा सन २०१३, चे तरतुदीनुसार जागेची किंमत फार जास्त होत आहे व जागेचे क्षेत्र आणि त्यासाठी द्यावी लागणारी किंमत संयुक्तीक नाही, असे समितीचे मत झाले.**

**तसेच, शेती महामंडळाची, शिर्डी व लगतच्या गावांतील ३०१ हे. ८४ आर. (७५४ एकर ६० आर) जमीन संस्थानला मिळणेकामी महाराष्ट्र राज्य, शेती महामंडळ, पुणे, यांचेकडे दि.२४/१०/२०१६, रोजी प्रस्ताव सादर केलेला आहे, सदर जमीन संस्थानला कमी किमतीत मिळणार आहे, या सर्व बाबींचा विचार करता, आरक्षण क्र.३९ मधील क्षेत्र भूसंपादनाने घेणे संस्थानच्या दृष्टीने किफायतशीर व सोईचे नाही, म्हणून आरक्षण क्र. ३९, मधील ४ हेक्टर ५४ आर. १८ चौ.मी. हे क्षेत्र भूसंपादनाव्दारे घेवू नये व सदर आरक्षण रद्द करणे व भूसंपादनापोटी शासनाकडे जमा केली रक्कम परत मिळणेकामी कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.१२ पालखी सेवेकरी यांचा वैद्यकिय सेवा व मानधनात वाढ मिळणेबाबत दि.०५.१०.२०१६ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/ तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १(झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल, व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व सर्व गोष्टी करील. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(क) | मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन |
| ०३ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(ख) | रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-** संस्थानमार्फत प्रत्येक गुरुवारी श्रींची पालखी समाधी मंदिर ते व्दारकामाई, व्दारकामाईत भजन व तेथून चावडीपर्यंत त्यानंतर चावडीमध्ये आरती व परत समाधी मंदिर अशी पालखीची मिरवणूक असते. तसेच स्थानिक उत्सव व प्रमुख तीन उत्सवाचे वेळी श्रींचे रथ/पालखीची गावातुन मिरवणूक असते, यावेळी श्रींचे रथ/ पालखीचे समोर पालखीधारक, अब्दागिरीधारक, मृदूंग वादक, सनई वादक, शिंग वादक, ताशा वादक, डफ वादक, बत्तीधारक इ. सेवा प्रकारे पालखी सेवेकरी म्हणून एकुण १५ सेवेकरी नेमण्यात आलेले आहेत.

**प्रस्ताव-** श्री.रामनाथ हरिभाऊ वर्पे व इतर १५ पालखी सेवेक-यांनी दि.०५/१०/२०१६ रोजीचे अर्जान्वये आम्ही सर्व बाबांच्या पालखीची पुरवजांपासून सेवेत रुजू आहोत व आमची घरची परिस्थिती हालाखीची आहे. तरी आम्हां सर्वांना श्री साईबाबा संस्थानकडून मोफत वैद्यकीय सेवा मिळावी व आम्हांला जे मानधन दिले जाते ते फार कमी आहे. त्यात वाढ करुन मिळावी अशी विनंती केली आहे.

श्री बाबांचे रथ/ पालखीचे समोर पालखीधारक, अब्दागिरीधारक, मृदुंग वादक, सनई वादक, शिंग वादक, ताशा वादक, डफ वादक, बत्तीधारक इ.प्रकारचे खालीलप्रमाणे पालखी सेवेकरी नेमण्यात आलेले आहेत.

**<u>पालखी सेवेकरी</u>**

| अ.क्र | सेवेक-यांची नांवे | प्रकार | अ.क्र | सेवेक-यांची नांवे | प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री अमोल नथुराम बिडवे | पालखीधारक | ०८ | श्री शंकर रामदास गायके | बत्तीधारक |
| ०२ | श्री रामनाथ हरीभाऊ वर्पे | पालखीधारक | ०९ | श्री गंगा धोंडीबा सोळसे | सनईवादक |
| ०३ | श्री निवृत्ती रामचंद आहेर | पालखीधारक | १० | श्री बाळा साळबा आरणे | शिंग वादक |
| ०४ | श्री संतोष दत्तात्रय शेळके | पालखीधारक | ११ | श्री साहेबराव रामचंद्र आरणे | शिंग वादक |
| ०५ | श्री दगडू भिकाजी अडांगळे | डफ वादक | १२ | श्री दिपक सर्वोत्तम बिडवे | अब्दागिरीधारक |
| ०६ | श्री अर्जुन रामा ढोबळे | डफ वादक | १३ | श्री सुकदेव भागाजी बत्तीसे | ताशा वादक |
| ०७ | श्रीमती मुमताज रिटीकभाई सय्यद | बत्तीधारक | १४ | श्री बालमभाई पापाभाई सय्यद | ताशा वादक |

**आरतीकरीता चौघडा वादक सेवेकरी**

| | | |
|---|---|---|
| ०१ | श्री. दिपक सर्वोत्तम बिडवे | चौघडा वादक |

वरीलप्रमाणे एकुण १५ सेवेकरी श्री बाबांचे रथ/ पालखी तसेच आरतीसाठी संस्थानला सेवा देत असतात. त्यांना मा.व्यवस्थापन समिती दि.१०/११/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१२ नुसार संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयामध्ये अत्यल्प दरामध्ये सर्वांसाठी वैद्यकीय सेवा उलब्ध असल्यामुळे पालखी सेवेक-यांना त्या सेवेचा लाभ घ्यावा व ओळखपत्राचा दुरुपयोग होऊ नये, याकरीता त्यांना ओळखपत्र न देता संरक्षण विभागास लेखी स्वरुपात कळविणेत यावे. तसेच वाढत्या महागाईचा विचार करता पालखी सेवेकरी व चौघडा वादक यांना दरमाह प्रत्येकी रु.११००/- मात्र मानधन देण्यात यावे, असे ठरले आहे.

त्यानुसार जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/ ३९८३/२०१६ दि.२०/०१/२०१६ अन्वये प्रतिमहिना रु.११००/- (हजेरीप्रमाणे) इतके एकत्रित मानधन देण्यात येत आहे. आता, त्यांनी त्यांचे मानधनात वाढ करुन संस्थानचे रुग्णालयात मोफत वैद्यकीय सेवा मिळणेबाबत विनंती केली आहे.

**विभागाचे मत/ अभिप्राय-** याकामी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ नुसार वरील नमूद तरतूदीस अनुसरुन मा.व्यवस्थापन समिती दि.१९/११/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६५ (२३) (क) नुसार संस्थानमध्ये कॉन्ट्रॅक्टर्समार्फत सेवेत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना खालीलप्रमाणे वैद्यकीय सेवा पुरविली जाते.

| अ.क्र | कंत्राटी कामगारांचा सेवा कालावधी | वैद्यकीय बिल मर्यादा रुपये |
|---|---|---|
| ०१ | ०१ ते ०५ वर्षापर्यंत | ३०,०००/- |
| ०२ | ०५ ते १० वर्षापर्यंत | ४०,०००/- |
| ०३ | १० वर्ष व त्यापेक्षा अधिक | ५०,०००/- |

उपरोक्त कंत्राटी कर्मचा-यांसाठी विहीत केलेल्या निकषाप्रमाणे श्री साईबाबांचे रथ/ पालखी व आरतीसाठी सेवा देणा-या १५ सेवेकरी यांना स्वतःसाठी संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा रुग्णालय येथे प्रति वर्षी रक्कम रु.५०,०००/- मर्यादेपर्यंत पर्यंत मोफत वैद्यकीय सेवा देता येईल. तसेच त्यांचे एकत्रित मानधन प्रत्येकी दरमहा रु.११००/- यामध्ये वाढ करणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या १४ पालखी सेवेकरी व 1 चौघडा वादक सेवेकरी हे विनाखंड करत असलेल्या सेवेचा विचार करता, त्यांना दि.०१ जानेवारी, २०१७ पासुन रु.३०००/- मात्र मासिक मानधन देण्यात यावे, असे ठरले.**

**तसेच सेवेकऱ्यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना वैद्यकिय सेवा पुरविणेकामी समिती सदस्य श्री.सचिन तांबे यांनी निर्णय घ्यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.१३** **श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा सन २०१६-१७ वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार मा.कोर्ट रिसिव्हर यांचे काळापासून मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने दरवर्षी संस्थान कर्मचा-यांना त्यांच्या पाल्याचा शैक्षणिक शुल्काचा परतावा दिला जातो.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ अन्वये मार्गदर्शक तत्वे वजा नियमावली ठरविण्यात आलेली आहे. सदरच्या मार्गदर्शक तत्वानुसार सध्या शैक्षणिक शुल्काचा परतावा देण्याची कार्यवाही चालु आहे. निर्णय क्र.८९ (१) शासनाने विद्यापीठांनी केवळ गुणवत्तेच्या निकाषावर (On Merit Basis) भरण्यात येणा-या (सुमारे ५० % पर्यंतच्या) जागांवर प्रवेश दिल्या जाणा-या विद्यार्थ्यांसाठी (निम्न दराने) निर्धारीत केलेल्या फी दर रकमेपर्यंतच, मर्यादीत असावा असे नमुद आहे. यास अनुसरुन शासकीय/शासन अनुदानित अभ्यासक्रमासाठी आकरण्यात येणा-या शुल्काच्या मर्यादेपर्यंत शैक्षणिक शुल्क रकमेचा परतावा दिला जातो. तसेच ज्यु.के.जी ते इ.१० वी (इंग्रजी माध्यम) व आयटीआय या अभ्यासक्रमांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा संस्थानच्या शाळेतील फीचे मर्यादेपर्यंत अदा केला जातो.

शासन मंजुरी क्र.सासंवि २००७/२४२/(६०)-का.सोळा, मंत्रालय मुंबई दि.१६ जुलै, २००९ अन्वये विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांनी सदर योजना माव्यवस्थापन मंडळाचे सन १९९६ चे सभेतील निर्णयाप्रमाणे संस्थान कर्मचा-यांना लागू आहे. त्याच धर्तीवर ती यापुढेही प्रचलीत पद्धतीने चालु राहील, अशी मंजुरी दिलेली आहे.

**(ब)** उपरोक्त शासन मंजूरीस अनुसरुन दरवर्षी संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक परताव्याबाबतची कार्यवाही सामान्य प्रशासन विभाग, वशी-०६ मार्फत करण्यात येते. सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिताची कार्यवाहीही त्यांचेमार्फतच सुरु आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस/वशी-०६/२०४७/ २०१६ दि.२६.०८.२०१६ रोजीचे पत्रान्वये संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१६-१७ चा शैक्षणिक शुल्क परतावा करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आवश्यक माहिती सादर करणेकामी श्री साईनाथ रुग्णालय विभागाकडील पात्र कर्मचारी संख्या, पाल्य संख्या, विद्यार्थी शिक्षण घेत असलेले वर्ग/अभ्यासक्रम व अंदाजे फीची रक्कम याबाबतची माहिती दि.१५.०९.२०१६ अखेर सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

मात्र श्री साईनाथ रुग्णालयाकडून मुदतीत माहिती उपलब्ध नाही. त्याबाबत त्यांना वेळोवेळी दुरध्वनीद्वारे देखील कळविलेले होते, मात्र त्यांनी लिपीक सुट्टीवर आहे, उद्या देतो असे कारणे सांगून माहिती देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे दरम्यानचे काळात श्री साईनाथ रुग्णालय विभाग वगळता इतर विभागातील संस्थान कर्मचा-यांच्या अंदाजे ८७० (श्री साईनाथ रुग्णालय विभाग वगळता) पाल्यांचा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचा शुल्क परतावा करणेबाबतचा विषय मा.व्य.समितीचे सभेत सादर करण्यात आला.

त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६९२ अन्वये संस्थान कायम कर्मचा-यास एकुण ८७० पाल्यांचा सन २०१६-१७ या वर्षातील शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.६६,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार परिपत्रक पारित करुन साईनाथ रुग्णालय वगळता इतर कर्मचा-यांना फॉर्म वाटप करुन, कार्यवाही अंतिम टप्प्यात आलेली आहे.

**(क)** आता श्री साईनाथ रुग्णालयामार्फत दि.१९.११.२०१६ रोजीचे पत्र व त्यासोबतच्या दि.१५.११.२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये साईनाथ रुग्णालय विभागाकडील पाल्यांचा सन २०१६-१७ या वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेबाबतचा कार्यवाही इकडील कार्यालयाकडून करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार त्यांनी तब्बल ०२ महिने (६० दिवस) उशीराने प्रस्ताव इकडील कार्यालयाकडे सादर केलेला आहे. साईनाथ रुग्णालय वगळता संस्थानचे इतर स्थायी कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१६-१७ या वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ चे सभेत मान्यता मिळालेली आहे.

**(ड)** श्री साईनाथ रुग्णालयाकडील कर्मचा-यांकडील माहितीनुसार एकुण ६८ कर्मचा-यांच्या ११० पाल्यांना सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील शुल्क परतावा करणेकामी अंदाजे रु.२९,९८,८७०/- अंदाजे पुर्णांकित रक्कम रु.३०,००,०००/- (अक्षरी रुपये तीस लाख) मात्र अपेक्षित आहे, सदर खर्चास मान्यता मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात येऊन, मा.व्य.समितीचे मान्यतेनंतर विहित पद्धतीने कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१६-१७ चा शैक्षणिक फी परतावा करता येईल.

तरी उपरोक्त परिच्छेद “ड” मध्ये नमुद केलेप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालय विभागाकडील स्थायी कर्मचाऱ्यांची ११३ पाल्यांचा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचा शुल्क परतावा आदा करणेस व त्याकामी

येणारे अंदाजे पुर्णांकित रक्कम रु.३०,००,०००/- (अक्षरी रुपये तीस लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये ११० पाल्यांच्या शैक्षणिक शुल्काचा परतावा रु.३०,००,०००/- मात्र दर्शविणेत आलेला आहे. सदरहू रक्कम संयुक्तिक वाटत नाही, याकरीता रु.३०,००,०००/- मात्र शैक्षणिक शुल्काच्या विवरणासहीत प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१४** **श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेबाबत फेरसादर.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचालित शैक्षणिक संकुलामधील श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती निता बबनराव चव्हाणके या दि.३१.१२.२०१५ रोजी विहित वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांचे पदावर शाळा संहितेनुसार, पदोन्नतीने मुख्याध्यापक नेमणे आहे. श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील ०४ सहा.शिक्षक, यांनी श्रीमती चव्हाणके यांचे सेवानिवृत्तीनंतर पदोन्नतीने मुख्याध्यापक पद मिळणेबाबत अर्ज केलेले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

अ) पदोन्नतीने मुख्याध्यापक पद मिळणेकामी अर्ज केलेल्या श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील ०३ सहा.शिक्षक यांची सेवाजेष्ठता व गोपनीय अहवालाची प्रतवारी खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदार शिक्षकाचे नांव | नेमणूक दिनांक व सेवा जेष्ठता क्रमांक | शिक्षण | पाच वर्षांचे गोपनीय अहवालाची प्रतवारी | | सरासरी प्रतवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सन | प्रतवारी | |
| ०१. | श्री.वाणी बाजीराव कनलाल | दि.०४.०७.१९९४ (सेवा जेष्ठता क्रमांक १) | बी.एस्सी., बी.एड. | २०१०-११ | B | B+ |
| | | | | २०११-१२ | B+ | |
| | | | | २०१२-१३ | B+ | |
| | | | | २०१३-१४ | B+ | |
| | | | | २०१४-१५ | A | |
| ०२. | श्री.वरघुडे गंगाधर विश्वनाथ | दि.०४.०७.१९९४ (सेवा जेष्ठता क्रमांक २) | बी.ए., बी.एड. | २०१०-११ | A | A |
| | | | | २०११-१२ | A | |
| | | | | २०१२-१३ | A | |
| | | | | २०१३-१४ | A | |
| | | | | २०१४-१५ | A | |
| ०३. | श्रीमती मिरजकर जहाँआरा शहाबुद्दीन | दि.१७.०६.१९९६ (सेवा जेष्ठता क्रमांक ३) | एम.ए.बी.एड. (Phy.), एम.एड., डी.एस.एम., इंग्रजी टायपिंग ३० श.प्र.मि, MS-CIT | २०१०-११ | B+ | A |
| | | | | २०११-१२ | A | |
| | | | | २०१२-१३ | A | |
| | | | | २०१३-१४ | A | |
| | | | | २०१४-१५ | A | |

ब) तसेच पदोन्नतीने मुख्याध्यापक पद मिळणेकामी अर्ज केलेल्या श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील ०१ सहा.शिक्षक यांची सेवाजेष्ठता व गोपनीय अहवालाची प्रतवारी खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदार शिक्षकाचे नांव | नेमणूक दिनांक व सेवा जेष्ठता क्रमांक | शिक्षण | पाच वर्षांचे गोपनीय अहवालाची प्रतवारी | | सरासरी प्रतवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सन | प्रतवारी | |
| ०१. | श्री.अरुण बाबुराव घोडके | दि.०१.०७.१९९६ (सेवा जेष्ठता क्रमांक २२) | बी.एस्सी., बी.एड. | २०१०-११ | - | A+ |
| | | | | २०११-१२ | A+ | |
| | | | | २०१२-१३ | A+ | |
| | | | | २०१३-१४ | A+ | |
| | | | | २०१४-१५ | A+ | |

श्री.अरुण बाबुराव घोडके, सहा.शिक्षक हे सध्या श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे कार्यरत असून, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील सेवाजेष्ठता याद्या स्वतंत्र ठेवण्यात आलेल्या आहेत. श्री.घोडके हे कनिष्ठ महाविद्यालयाकडील सेवाजेष्ठतायादीमध्ये २२ व्या क्रमांकावर आहेत.

श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेकामी कामगार विभागामार्फत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचेकडून कायदेशीर अभिप्राय मागविण्यात आला होता. ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

With reference to your letter dt.06/10/2015 seeking my opinion for appointment of Head of Shri Saibaba Kanya Vidya Mandir I would like to invite your attention to rule No.3 (4) of MEPS Rules 1981 which provides that. In the case of girls Secondary School or Junior College of Education for women, the senior most lady teacher fulfilling the conditions laid down in clause (b) of sub rule (1) and having satisfactory record of service, shall be appointed as the Head of that school irrespective of her seniority vis-a-vis the male teachers

Therefore in my opinion Smt.Mirajkar though she is junior to male candidate needs to be promoted on the post of Head of Shri Saibaba Kanya Vidya Mandir.
If required, it is also advisable to clarify the position by visiting the office of Deputy Director of Education.

उपरोक्त अभिप्रायामध्ये त्यांनी महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ३ (४) मधील तरतुदीकडे लक्ष वेधून, सदर तरतुदीनुसार श्रीमती मिरजकर यांना पदोन्नतीने मुख्याध्यापक नेमणेस हरकत नाही, असे कळविलेले आहे, मात्र गरज असल्यास मा.शिक्षण उपसंचालक यांचा अभिप्राय घेणेबाबत सुचित केलेले आहे.

ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी सुचित केलेनुसार इकडील कार्यालयाकडील दि.२५.०५.२०१६ रोजीचे मंजुर टिपणीनुसार जा.क्र.एसएसएस/वशी-०१/११४६/२०१६ दि.१०.०६.२०१६ अन्वये शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचेशी पत्रव्यवहार करुन त्यांना सर्व वस्तुस्थिती कळविण्यात येऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेकामी सेवाज्येष्ठ शिक्षकाची नेमणूक करावी अगर जेष्ठतम महिला शिक्षिकेची नेमणूक करावी याबाबत अभिप्राय मागविण्यात आला होता. त्यानुसार मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र.शिउसं/उमावि-२/पुवि/ १५६३९/२०१६ दि.०२.०७.२०१६ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

"महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम-३(४) मधील तरतुदीनुसार मुलींच्या माध्यमिक शाळेच्या बाबतीत किंवा महिला विद्यालयाच्या बाबतीत पोटनियम-१ खंड (ब) मध्ये ठरवून दिलेल्या शर्ती पुर्ण करणा-या व समाधानकारक सेवा विषयक पुर्ववत असलेल्या जेष्ठतम शिक्षकेस पुरुष शिक्षकाच्या तुलनेने संबधित महिला कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता लक्षात घेऊन शाळेची/विद्यालयाची मुख्याध्यापक/ प्राचार्य म्हणून नियुक्ती करता येईल.

माध्यमिक शाळा संहिता नुसार माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक हेच उच्च माध्यमिक शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून काम करत असतात. उच्च माध्यमिक विभागाकडील प्राचार्यांच्या कामासाठी संबधित मुख्याध्यापकाच्या वेतनच्या ग्रेड पे मध्ये १००/- (रु.शंभर) वाढ त्यांना दिलेली असते. त्यामुळे आपल्या संस्थेच्या श्री साईबाबा कन्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी वरील सर्व नियमांच्या अधीन राहुन सेवाजेष्ठता यादीतील सेवाजेष्ठ महिलेची नियुक्ती मुख्याध्यापक/प्राचार्य म्हणून करता येईल"

संस्थानमार्फत श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर ही मुलींची शाळा चालविण्यात येते. मा.व्य.समितीचे मान्यतेने सन २००१ मध्ये कन्या शाळेस जोडून फक्त मुलींकरिता कनिष्ठ महाविद्यालय (इ.११ वी व १२ वी.) सुरु करण्यात आले. त्यानंतर सन २००५ पासून कनिष्ठ महाविद्यालयामध्ये मुले व मुलींसाठी सहशिक्षण प्रवेश देणेस मा.शिक्षण उपसंचालक यांनी मान्यता दिल्याने सन २००५ पासून श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयामध्ये मुले व मुली दोघेही सहशिक्षण घेत आहेत.

शाळा संहिता नियमानुसार माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक हेच माध्यमिक शाळेला जोडलेल्या उच्च माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक असतात. संस्थानचे मंजुर आकृतीबंधामध्ये कन्या शाळेस मुख्याध्यापक/प्राचार्य पद मंजुर असून, कनिष्ठ महाविद्यालयास उप प्राचार्य हे पद मंजुर आहे. दोन्ही विभागांच्या सेवाजेष्ठता याद्या स्वतंत्र ठेवण्यात आलेल्या आहेत.

तरी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील सेवाजेष्ठता, गोपनीय अहवालाची प्रतवारी, ॲड.अशोकराव पाटील, अहमदगनर यांचा अभिप्राय तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचा अभिप्राय या सर्व बाबींचे अवलोकन करुन महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ३ (४) मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरकडील जेष्ठतम

शिक्षिका श्रीमती जहाँआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी पदोन्नतीने नेमणूक करता येईल, असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयास पदोन्नतीने मुख्याध्यापक/ प्राचार्य नेमणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील सेवाजेष्ठता, गोपनीय अहवालाची प्रतवारी, ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा अभिप्राय तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचा अभिप्राय या सर्व बाबींचे अवलोकन करुन महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ३ (४) मधील तरतुदीनुसार तसेच शिक्षण संचालक, पुणे विभाग यांचेशी दुरध्वनीद्वारे केलेल्या चर्चेस अनुसरुन जेष्ठतम शिक्षिका श्रीमती जहाँआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी पदोन्नतीने नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१५** **संस्थान निवासस्थान रिक्त करुन देणेस असमर्थता दर्शविलेमुळे सेवानियुक्त कर्मचारी श्री.मच्छिंद्र दिगंबर धनेश्वर यांचे विरुध्द कायदेशीर दावा दाखल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.एम.डी.धनेश्वर, कनिष्ठ कामगार अधिकारी हे दि.३१/०५/२०१५ रोजी संस्थान सेवेतून सेवानिवृत्त झालेले आहेत. सेवेत असतांना श्री.धनेश्वर यांना संस्थानमार्फत साईध्यान ०२/०४ हे निवासस्थान उपलब्ध करुन देणेत आलेले होते. सेवानिवृत्तीनंतर श्री.धनेश्वर यांचेकडून निवासस्थान रिक्त न झालेमुळे त्यांना निवासस्थान रिक्त करणेसाठी दि.१३/०८/२०१५ रोजीचे पत्राने कळविणेत आलेले होते. पत्र मिळालेनंतर श्री.धनेश्वर यांनी दि.१९/०८/२०१५ रोजीचे अर्जाने, घराचे बांधकाम चालू असल्याचे कारणास्तव ०६ महिनेसाठी निवासस्थानामध्ये राहण्याची मुदतवाढ मिळणेची विनंती केलेली होती.

श्री.धनेश्वर यांचे समवेत सेवानिवृत्त झालेले इतर कर्मचारी श्री.रामराव शेळके, श्री.भाऊसाहेब साबळे व श्री.सुभाष गर्कळ यांना घराचे बांधकाम चालू असल्याचे कारणास्तव शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रथम ०३ महिने नियमीत दराने व त्यापुढील कालावधीचे चालू बाजारभाव दराने भाडे वसुलीचे अटीवर निवासस्थानामध्ये राहणेची मुदतवाढ दिलेली होती. त्याच धर्तीवर श्री.धनेश्वर यांना जा.नं.एसएसएस/वशी-०१/३७०६/२०१५ दि.३०/१२/२०१५ रोजीचे आदेशाने प्रथम ०३ महिने नियमीत दराने व त्यापुढील कालावधीचे चालू बाजारभाव दराने भाडे दराने वसुलीचे अटीवर निवासस्थानामध्ये राहणेची मुदतवाढ देणेत आलेली आहे.

मुदतवाढीचा ०६ महिन्याचा कालावधी उलटून गेलेनंतर श्री.धनेश्वर यांनी पुन्हा दि.२९ मार्च, २०१६ रोजीचे पत्राने, "मी मा.अध्यक्ष साहेब (तत्कालीन) यांना समक्ष भेटून व त्यांचे निर्देशानुसार शासन निर्णयास अनुसरुन संस्थानमध्ये पुर्ननेमणूकीसाठी अर्ज सादर केलेले आहे." तसेच माझ्या मुलीचा विवाह ठरलेला असून त्याकामी पुढील ०६ महिनेसाठी निवासस्थानामध्ये राहण्याची परवानगी मिळणेची विनंती केलेली होती. श्री. धनेश्वर यांचे दि. १९/०८/२०१५ व दि.२९/०३/२०१६ रोजीचे निवासस्थान मुदतवाढीचे दोन्ही अर्जाचे अवलोकन केले असता अर्जात दोन वेगवेगळी कारणे नमूद करुन केवळ वेळकाढूपणा करत असल्याचे स्पष्ट दिसून येत होते. सबब, श्री.धनेश्वर यांना प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष बोलावून निवासस्थान रिक्त करुन देणेबाबत कळविणेत आले. तथापी, श्री.धनेश्वर यांनी निवासस्थान रिक्त करुन देणेसाठी असमर्थता दर्शविलेमुळे त्यांचे ताबेतील निवासस्थान रिक्त करुन घेणेकामी सादर करणेत आलेल्या दि.१७/१०/२०१६ रोजीचे टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी महोदयांनी श्री धनेश्वर यांचे ताबेतील निवासस्थान कायदेशीर कार्यवाही करुन रिक्त करुन घेणेचे तोंडी निर्देश दिलेले आहेत.

श्री.धनेश्वर यांचे विरुध्द कायदेशीर दावा दाखल करणेकामी विधी विभागाकडून अभिप्राय घेणेत आलेला असून, विधी विभागाने दि.२४/११/२०१६ रोजीचे पत्राने दावा दाखल करणेसाठी संस्थान पॅनलवरील ॲड.जगन्नाथ कारभारी गोंदकर, शिर्डी यांचे नाव सुचविले आहे. तसेच दावा दाखल करणेस व याकामी येणा-या एकूण खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल असे कळविले आहे.

तरी श्री.धनेश्वर यांचे विरुध्द ॲड.जगन्नाथ कारभारी गोंदकर यांचे मार्फत कायदेशीर दावा दाखल करणेस व याकामी येणा-या एकूण खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सेवानिवृत्त कर्मचारी श्री.मच्छिंद्र दिगंबर धनेश्वर यांचे निवासस्थान खाली करुन घेणेसाठी कार्यकारी अधिकारी यांनी समक्ष बोलावून त्यांचेबरोबर चर्चा करावी व निवासस्थान खाली करणेबाबत श्री.धनेश्वर यांचेकडून लेखी स्वरुपात घेण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१६** **अनुकंपा कारणास्तव संबंधीत पात्र नातेवाईकांची वर्ग-०३ लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** संस्थान सेवेत असतांना मृत पावणा-या कर्मचा-यांच्या कुटुंबातील एका पात्र नातेवाईकास वेळोवेळी पारीत होणाऱ्या शासन निर्णयातील अनुकंपा तरतुदीचे अधिन राहून मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने दि.०७/०८/२००९ पुर्वीपर्यंत संस्थान सेवेत स्थायी पदांवर सामावून घेण्यात आलेले आहे. दि.०७/०८/२००९

रोजी मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून श्री साईबाबा संस्थानचे विविध पदांचे आकृतीबंधास मंजुरी मिळालेली आहे. मंजुर आकृतीबंधानुसार संस्थान आस्थापनेवर त्यावेळी कार्यरत असलेल्या वर्ग ०४ कर्मचा-यांची संख्या मंजुर पदांपेक्षा जास्त होती. मंजुर आकृतीबंधामध्ये, 'समितीला आकृतीबंधा बाहेर जाऊन पदभरती करता येणार नाही.' अशी अट असल्याने दि.०७/०८/२००९ नंतर अनुकंपा कारणास्तव नोकरी मिळणेसाठी अर्ज केलेल्या संबधीत नातेवाईकांना माव्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.७६५ (१) अन्वये तूर्त किमान वेतनदरा प्रमाणे लेबर कॉन्ट्रक्टर मार्फत कंत्राटी पध्दतीने संस्थान सेवेत घेण्यात आलेले होते.

**(ब)** मंजुर आकृतीबंधानुसार सप्टेंबर २०१४ चे कर्मचारी संख्येनुसार वर्ग ०४ संवर्गाची ३५ पदे अतिरिक्त होती व वर्ग ०३ संवर्गातील विविध पदे रिक्त होती. याबाबत शासन निर्णय, क्रमांक – अंकपा.१००० / प्र.क्र.२० / २००० / आठ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक. २८ मार्च, २००१ मध्ये, "अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा लाभ सेवेत असतांना दिवंगत किंवा अकाली निवृत्त केवळ गट क व ड मधील कर्मचा-यांच्या कुटूंबियांना गट 'क' व 'ड' मधील पदावर नियुक्तीसाठी अनुज्ञेय राहिल." तसेच शासन निर्णय, क्रमांक– अंकपा. १००४/ प्र.क्र.५१/ २००४/ आठ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक, २२ ऑगस्ट, २००५ मध्ये, "गट 'क' व 'ड' मधील पदांवरील नियुक्तीसाठी सक्षम नियुक्ती प्राधिकारी (कार्यालय किंवा विभाग प्रमुख ) त्यांच्या कार्यक्षेत्रातील उपलब्ध गट 'क' आणि 'ड' च्या रिक्त पदांवर विहीत अटी व शर्ती पूर्णकरणा-या उमेदवारांना या यादीतील क्रमानुसार नियुक्त करु शकतील." अशी तरतूद असल्याने त्यावेळी अनुकंपा कारणास्तव कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या २८ उमेदवारांचे शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांची वर्ग ०३ व ०४ चे पदावर संस्थान सेवेत सामावून घेणेबाबतचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे दि.२५/०९/२०१४ रोजीचे सभेसमोर सादर करणेत येऊन त्यावरील निर्णयानुसार मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये विधी विभागामार्फत दिवाणी अर्ज क्र.५०६६ दाखल करणेत आलेला होता. त्यावर मा. न्यायालयाने दि.०६/०५/२०१५ रोजी खालील प्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"The Committee may implement Resolution no.17 to appoint the 28 employees on compassionate basis as prayed, after considering their eligibility, so also availability of sanctioned posts, as per the government resolution and the policy in vogue". याचाच अर्थ, व्यवस्थापन समितीचे विषय नं.१७ (निर्णय क्र.८२५) नुसार मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावास, मानवतेच्या दृष्टीकोनातून २८ कर्मचा-यांच्या शैक्षणिक पात्रता, सध्या रिक्त असलेली मंजूर पदे यांची पडताळणी करुन, याबाबतचे शासन निर्णय व प्रचलित पध्दतीनुसार नेमणूका करणेस मान्यता देणेत आली.

दि.२८ मार्च, २००१ व दि.२२ ऑगस्ट, २००५ रोजीचे शासन निर्णयातील तरतूद व मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे मान्यतेनुसार, जुन २०१५ चे आकडेवारीनुसार संस्थान आस्थापनेवर वर्ग ०४ संवर्गाची पदे रिक्त नव्हती केवळ गट ०३ संवर्गाची काही पदे रिक्त असल्याने, संबधीत २८ उमेदवारांपैकी केवळ एका उमेदवराची (श्रीमती रेणुका श्रीनिवास नाईक) त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक करणेत आलेली आहे.

**(क)** त्यानंतर अनुकंपा कारणास्तव तूर्त कंत्राटी पध्दतीने सेवेत असलेले उमेदवार श्री.राहुल अशोक गोडगे यांनी लिपीक-टंकलेखक पदाची शैक्षणिक पात्रता पूर्ण केलेनंतर दि.३०/१०/२०१५ रोजीचे अर्जाने अनुकंपा कारणास्तव लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक मिळणेची विनंती केलेली होती. याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे दि.०२/०२/२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करणेत येऊन त्यावर निर्णय क्र. ०९ अन्वये, मा.उच्च न्यायालय मुंबईचे औरंगाबाद खंडपीठामध्येदाखल केलेल्या दिवाणी अर्जावरील निर्णयास अनुसरुन पात्र उमेदवारास अनुकंपा कारणास्तव वर्ग ०३ चे पदावर नेमणूक देणेकामी शासन निर्णय व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशासह फेरप्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा. असा निर्णय संमत झालेला होता. सदर निर्णयास अनुसरुन याबाबतचे सर्व शासन निर्णय व मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे दि.०६/०५/२०१५ रोजीची मान्यतेसह फेरप्रस्ताव दि.०२/०४/२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला. त्यावर निर्णय क्र.२१९ अन्वये, सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाबाबत संस्थान कायदेशीर सल्लागाराचे मार्गदर्शन घेण्यात यावे तसेच सर्व शासन निर्णय तपासून निर्णय घेणे आवश्यक असल्याने सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवण्यात यावा. असा निर्णय संमत झालेला होता.

उपरोक्त निर्णयानुसार संस्थान कायदेशीर सल्लागार ॲड. जगनाथ कारभारी गोंदकर मु.पो.शिर्डी यांना पत्र देण्यात आलेले होते. त्यांनी दि.१७/१०/२०१६ रोजीचे पत्राने खालील प्रमाणे कायदेशीर अभिप्राय दिलेला आहे. "आपले पत्रानुसार श्री.राहुल अशोक गोडगे यास अनुकंपा कारणास्तव वर्ग ०३ (लिपीक-टंकलेखक) या पदावर नेमणूक करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीने दि.१९/११/२०११ च्या सभेतील निर्णय क्र.७६५ (१) अन्वये लेबर कॉन्ट्रक्टर मार्फत कंत्राटी पध्दतीने आपल्या संस्थान सेवेत घेतलेले आहे.

शासन निर्णय क्र.अकंपा-१०००/प्र.क्र.२०/२०००/८, मंत्रालय मुंबई दि.२८ मार्च, २००१ मध्ये अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा लाभ सेवेत असतांना दिवंगत किंवा अकाली निवृत्त केवळ गट क व ड मधील कर्मचा-यांचे कुटूंबियांना गट क व ड मधील पदावर नियुक्तीबाबतचे परिपत्रक पाहिले असता त्याप्रमाणे सदर कर्मचारी श्री.गोडगे सदरचे पदावर नियुक्तीसाठी अनुज्ञेय असे आहे. तत्राप त्यातील कलम ब सुध्दा लक्षात घेणे

जरुरीचे आहे. त्यासाठी मृत व्यक्ती वयाची ५० वर्षे पुर्ण होण्यापुर्वीच जे कर्मचारी कर्करोग, पक्षघात किंवा अपघातामुळे सेवेसाठी कायमचे असमर्थ होतील, केवळ त्यांचेच कुटूंबियांना अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र समजणेत यावे, असेही कारण समाविष्ट केलेले आहे. त्यामुळे त्याचा विचारसुध्दा सदर पदावर श्री.गोडगे यांना नियुक्त करणेसाठी विचारात घेणेत यावा. तसेच मा.उच्च न्यायालयाचे दिवाणी अर्ज क्र.५०६६ दि.०६/०५/२०१५ चे निर्णयानुसारही सदर गोडगे यांना सदर लिपीक-टंकलेखक पदावर नेमणुका देता येऊ शकते. तसेच आपले त्रिसदस्यीय समितीचे दि.०२/०२/२०१६ रोजीचे सभेपुढील झालेला निर्णय क्र.९ नुसार तसेच मा.उच्च न्यायालय मुंबईचे खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्णयास अनुसरुन सदर श्रीगोडगे यांना अनुकंपा कारणास्तव वर्ग ०३ चे पदावर नेमणुक देणेकामी निर्णयही संमत झालेला आहे. तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठाचे दि.०६/०५/२०१६ रोजीचे निर्णयानुसार पुन्हा त्रिसदस्य समितीचे दि.०२/०४/२०१६रोजीचे सभेतील फेरप्रस्ताव सादर करुन त्यावर निर्णय क्र.२१९ सुध्दा झालेला आहे. त्यामुळे त्या सर्व गोष्टीचे व शासनाचे परिपत्रकाचे अवलोकन करता सदर श्री.राहुल अशोक गोडगे यास वर्ग०३ संवर्गात लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक करणेकामी योग्य तो निर्णय घेणेस हरकत नाही. मात्र मृत पावणा-या कर्मचा-याच्या कुटुंबातील एका पात्र नातेवाईकास शासनाचे निर्णयातील अनुकंपा तरतुदीनुसार त्यांचे कुटुंबातील सर्व सदस्यांची संमती घेणे जरुरीचे आहे."

तरी, सध्या वापरात असलेली फिंगर प्रिंट सिस्टिम (बायोमेट्रीक) मशिन (१२ नग) चे बायबॅक करुन नविन १४ नग मशिन व त्यासाठी आवश्यक ते सर्व्हर व सॉफटवेअर खरेदी करणे आवश्यक आहे. त्यासाठी अंदाजे रक्कम रुपये 11,83,620/- + टॅक्स् इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरची खरेदी ही संस्थानच्या प्रचलित पध्दतीने ई-निविदेव्दारे करावी लागणार आहे. फिंगर प्रिंट सिस्टिमसाठी सध्या कार्यरत असलेली मे. अेलाक्रीटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि, मुंबई यांचे वार्षिक दुरुस्ती-देखभाल करार सप्टेंबर 2016 अखेर संपुष्टात येत आहे. त्यांनी त्यापुढील कालावधीसाठी दरमहा दोन दिवसाची व्हिजीट देऊन अडी-अडचणीचे निरसण करुन देणे त्यासाठी त्यांनी दरमहा 15,000/- + टॅक्स् इतकी रक्कम कळविलेली आहे.

साईटेक प्रकल्पाची नुतनिकरण नविन निविदा तयार करण्याची कार्यवही KPMG या कंपनीमार्फत चालु आहे. त्यामध्ये बायोमेट्रीक कार्यप्रणाली अतर्भाव करणेस मान्यता तसेच साईटेक प्रकल्पात अंतर्भात होईपर्यंत मे. अेलाक्रीटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि, मुंबई दरमहा 15,000/- + टॅक्स् दुरुस्ती देखभालीसाठी अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्त् नमुद केलेप्रमाणे मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.९२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.२२** **संस्थानचे विविध विभागांचे मागणीनुसार दैनंदिन कामकाजासाठी ३० नग संगणक संच व १० लॅपटॉप खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 17 (1) नुसार.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :** मा.व्यवस्थापन समितीचे दि. 02/04/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 235.

**प्रास्ताविक:** माहिती तंत्रज्ञान विभागासाठी अत्यावश्यक सेवेकरीता व सर्व विभागांचे संगणकाची मागणीचा विचार करता खालील तक्त्यातील तपशिलानुसार 30 नग संगणक संच व 10 नग लॅपटॉप खरेदी करणेस अंदाजे रक्कम रु. 16,91,165/- + टॅक्सचे खर्चास प्रस्ताव दि. 31/08/2016 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर केला असता प्रथम श्री विजय नायडु यांचा Hardware बाबत अभिप्राय घेण्यात यावा तद्नंतर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा असे निर्देश दिलेले आहे.

त्यानुसार संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडु यांचा अभिप्राय घेणेकामी त्यानंा जानं. एसएसएसटी/ आयटी/ 3385/2016 दि. 30/09/2016 रोजीचे पत्राने कळविण्यात आले होते. त्यांनी संदर्भ क्रं. 02 अन्वये त्यांचा अभिप्राय कळविलेला आहे. च्सर्व संस्थानचे संगणक प्रिंटरचे Audit बाबत- सध्या संस्थानमध्ये साईटेक प्रकल्पासाठी व कार्यालयीन कामासाठी असे 2 प्रकारात संगणक संच वापरण्यात येतात, यामध्ये साईटेक प्रकल्पासाठी 168 व 18 Dual Display आणि 78 कार्यालयीन कामासाठी वापरात आहे. याचे विभागवार अवलोकन करण्यात आलेले आहे. त्याची यादी सदरील पत्रासोबत जोडलेली आहे.

तरी, कार्यालयीन कामासाठी वरील तपशिलाप्रमाणे i3 Processor Model प्रस्तावित करता येईल. काऊंटरसाठी Quad Core Processor Model घेता येईल.

तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडु यांचे अभिप्रायानुसारDonation, Room Booking व Book Stall इत्यादी ठिकाणी All-in-one Desktop Model व कार्यालयीन कामासाठी खालील तपशिलाप्रमाणे i3 Processor Model याचा तपशिल खलीलप्रमाणे.

आवश्यक असलेल्या संगणकाचे दर महाराष्ट्र शासनाचे व केंद्र शासनाचे रेट कॉन्ट्राक्ट नुसार व विविध कंपन्यांच्या वेबसाईटवरुन घेतलेले आहेत. तसेच पुरवठाधारकांकडुन कोटेशन मागवुन घेतलेले आहेत.

विविध कंपन्यांनी दिलेल्या दरावरुन सरासरी दर काढणेत आलेले आहे त्याचा तुलनात्मक तक्ता व कोटेशन सोबत जोडलेले आहे.

**संगणक संच व लॅपटॉप यांचे दराचा तपशिल खालीलप्रमाणे**

| **अ.नं.** | **कांऊटरसाठी संगणक संच तपशिल** | **नग** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| 01 | All In One Desktop, Intel Quad core Processor , onboard Integrated Graphics,10/1000 LAN, onboard USB, 4 GB DDR3 RAM, 500GB Hard Drive, No Optical Drive ,18.5" Screen or above, USB Optical Mouse and Keyboard, Windows 10 professional 64 bit, 3 Yr Next business day onsite service. (Make Dell/HP/Lenovo/Asus) With Built in battary backup, Wi-fi (Commercial Desktop) | 15 | 33,742/- | 5,06,130=00 |
| **अ.नं.** | **कार्यालयीन कामकाजासाठी संगणक संच तपशिल** | **नग** | **दर** | **रक्कम** |
| 01 | All In One Intel Core i3- Processor , 3rd generation or above, onboard Integrated Graphics,10/1000 LAN, onboard USB, 4 GB DDR3 RAM, 500GB Hard Drive, No Optical Drive ,18.5" Screen or above, USB Optical Mouse and Keyboard, Windows 10 professional 64 bit 3 Yr Next business day onsite service. (Make Dell/HP/ Lenovo/Asus) Built in Wi-fi, (Commercial Desktop) | 15 | 44,807/- | 6,72,105=00 |
| **अ.नं.** | **लॅपटॉप संच तपशिल** | **नग** | **दर** | **रक्कम** |
| 01 | Ultra Book Core i5 With 14" Display, 500 GB HDD, 4 GB RAM DVD, Windows 10 Pro, Carry case, 3 Yr Next business day onsite service. (Make Dell/HP/ Lenovo/Asus) (Commercial Laptop) | 10 | 51,293/- | 5,12,930=00 |
| | | | **एकुण रक्कम** | **16,91,165=00** |

सबब, संस्थानचे विविध विभागातील दैंनदिन तसेच कार्यप्रणालीचे वापरासाठी संगणकाची प्रस्तावीत तपशिलानुसार व तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडु यांचे अभिप्रायानुसारDonation, Room Booking व Bookstall, Laadu sales इत्यादी ठिकाणी 15 नग व कार्यालयीन कामासाठी 15 असे एकुण 30 नग संगणक संच तसेच 10 नग लॅपटॉप संच खरेदी करता येईल.

**मागणी:** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** शासन निर्देश व तांत्रिक.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केल्याप्रमाणे विभागांचे संगणकाची मागणीचा विचार करता वरिल तपशिलानुसार 30 नग संगणक संच व 10 नग लॅपटॉप खरेदीकामी विविध पुरवठा धारकांकडुन ईनिविदा मागवुन व सदरकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये रु. 16,91,165/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.९२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये लॅपटॉप/ संगणक कोणत्या विभागास व कशासाठी आवश्यक आहेत याचे विवरण दिसून येत नाही. त्यामुळे सध्या विविध विभागांना दिलेल्या लॅपटॉपच्या वापराचे ऑडीट करणेत यावे व लॅपटॉप वगळता संगणक खरेदीबाबतचे विवरण कार्यकारी अधिकारी यांनी तपासून पहावे. आवश्यकता असेल तरच प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अद्ययावत ३० नग संगणके खरेदी करणेत यावे, असे ठरले.**

**तसेच सदरहू संगणके खरेदी करणेकामी अंदाजे खर्चाच्या ३०% रक्कम कमी करणेत येऊन, विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.२३** **श्री साईप्रसादालयातील रिकाम्या तेला-तुपाच्या व काजूच्या डब्यांचा माहे एप्रिल, २०१५ ते मार्च, २०१६ अखेरचा अहवाल.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियम २००४ कलम १७ (४) नुसार निरुपयोगी वस्तूंची विल्हेवाट लावणे.

**मा.व्यवस्थापन समिती सभा ठराव:-** मा. व्य. समिती सभा दिनांक १७/०७/२०१४ मधील निर्णय क्र.५९२.

**प्रस्ताविक:-** मा.व्य.समिती सभा दि.१७/०७/२०१४ निर्णय क्र. ५९२ नुसार असे ठरले आहे की, तेला-तुपाचे एकुण डबे, रिकामे डबे कुठे वापरण्यात आले याच्या नोंदी ठेवणेत येऊन, त्याचा मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी यांचेसमोर व वार्षिक अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा.

श्री साई प्रसादालयात सकाळी १०.०० ते रात्री १०.०० या वेळेत साईभक्तांना प्रसादभोजन पुरविले जाते. या सर्व भक्तांना जेवणामध्ये चपाती, पुरी, भाजी, बर्फी, इ. पदार्थ दिले जात असून साईभक्तांना प्रसाद बनविण्यासाठी खाद्यतेल, गावरान तुप, वनस्पती तुप व काजू वापरले जात असून सदर डब्यांचा मध्यवर्ती भांडारकडून पत्र्याच्या डब्यात पुरवठा होत असतो. सदरील रिकाम्या डब्यांची विक्री ही अभिलेख कक्षामार्फत केली जाते. प्रसादालयात साधारणत: महिन्याकाठी १५-२० डबे गिरण्यांना जाते टाकल्यानंतर पॅकींग म्हणून व प्रसादालयातील साफसफाईकामी वापरले जातात व ते प्रसादालय खाती खर्ची टाकण्यात येतात.

**मागणी:-** मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार तेला-तुपाचे एकूण डबे, रिकामे झालेले डबे व रिकामे डबे कुठे वापरणेत आले याच्या नोंदी ठेवणेत येऊन, त्याचा मासिक अहवाल मा. कार्यकारी अधिकारी यांचेसमोर व वार्षिक अहवाल मा. त्रिसदस्य समितीसमोर सादर करण्यात यावा असे ठरले होते. त्यानुसार माहे एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६ चा डब्यांच्या कार्यवाहीचा अहवाल आपले माहितीस्तव पुढीलप्रमाणे सादर.

अ) मागिल शिल्लक व आवक होऊन रिकामे झालेले डबे- माहे एप्रिल-२०१५ ते माहे मार्च-२०१६ अखेर.

| महिना | गावरान तुप डबे | खाद्यतेल डबे | वनस्पती तुप डबे | काजु डबे |
|---|---|---|---|---|
| मागिल शिल्लक डबे | **००** | **६२९** | **१३८** | **०५** |
| माहे एप्रिल-२०१५ | ०० | १२०० | १५० | ०० |
| माहे मे-२०१५ | ०० | २३७३ | २०० | ०० |
| माहे जून-२०१५ | ०० | २१०९ | २५० | ०० |
| माहे जुलै-२०१५ | ०० | १९३५ | ६६२ | ०० |
| माहे ऑगस्ट-२०१५ | ०० | १९३४ | ३८८ | १२ |
| माहे सप्टेंबर-२०१५ | १५ | १९८० | २९४ | ०० |
| माहे ऑक्टोंबर-२०१५ | ०१ | १२९६ | ८०६ | ०६ |
| माहे नोव्हेंबर-२०१५ | ०० | २१६२ | ०० | ०३ |
| माहे डिसेंबर-२०१५ | ०१ | १६५४ | ३५० | ०२ |
| माहे जानेवारी-२०१६ | ०१ | २७२० | ४०० | ०१ |
| माहे फेब्रुवारी-२०१६ | ०० | १६७१ | ३०४ | ०१ |
| माहे मार्च-२०१६ | ०० | १२४० | ३५० | ०२ |
| रिकामे झालेले एकुण डबे | **१८** | **२२९०३** | **४२९२** | **३२** |

ब.) अभिलेख कक्षामार्फत विक्री करण्यात आलेले रिकामे डबे-

| महिना | गावरान तुप डबे | खाद्यतेल डबे | वनस्पती तुप डबे | काजु डबे |
|---|---|---|---|---|
| माहे एप्रिल-२०१५ | ०० | ०० | ०० | ०० |
| माहे मे-२०१५ | ०० | ०० | ०० | ०० |
| माहे जुन-२०१५ | ०० | ३३२६ | ३१२ | ०० |
| माहे जुलै-२०१५ | ०० | १०४४ | ०० | ०० |
| माहे ऑगस्ट-२०१५ | ०० | २३८६ | १११६ | ०० |
| माहे सप्टेंबर-२०१५ | ०० | ३०२४ | ०० | ०० |
| माहे ऑक्टोंबर-२०१५ | ०० | १४४३ | ३१० | ०० |
| माहे नोव्हेंबर-२०१५ | ०० | १७६४ | ०० | ०० |
| माहे डिसेंबर-२०१५ | ०० | १३९२ | ०० | ०० |
| माहे जानेवारी-२०१६ | ०० | ३०१० | ५५५ | ०० |
| माहे फेब्रुवारी-२०१६ | ०० | २२१४ | ०० | ०० |
| माहे मार्च-२०१६ | ०० | २३८८ | ०० | ०० |
| एकुण विक्री केलेले डबे | **००** | **२१९९१** | **२२९३** | **००** |

क.) श्री साईप्रसादालय विभागामध्ये गिरणी पॅकींग, साफसफाईकामी व मंदिर विभागात वापरलेले रिकामे डबे-

| महिना | विभाग | गावरान तुप डबे | खाद्य- तेल डबे | वनस्पती तुप डबे | काजु डबे |
|---|---|---|---|---|---|
| माहे एप्रिल-२०१५ | १.) प्रसादालयखर्च-<br>२.) मंदिर विभाग- | ००<br>०० | २०<br>०० | ००<br>०० | ००<br>०० |
| माहे मे-२०१५ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) मंदिर विभाग- | ००<br>०० | १८<br>०१ | ००<br>०० | ००<br>०० |
| माहे जून-२०१५ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) मंदिर विभाग- | ००<br>०० | ००<br>०१ | २०<br>०० | ००<br>०० |
| माहे जुलै-२०१५ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) मंदिर विभाग- | ००<br>०० | १०<br>०० | ०८<br>०० | ००<br>०० |
| माहे ऑगस्ट-२०१५ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) मंदिर विभाग-<br>३.) आरोग्य विभाग- | ००<br>००<br>डि.पी. नं. → | ००<br>०१<br>(६५२६) | १०<br>००<br>१०० | ००<br>००<br>०० |
| माहे सप्टेंबर-२०१५ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) मंदिर विभाग-<br>३.) लाडु विभाग- | डि.पी. नं.<br>(३३४०)<br>१५ | १४<br>०१ | ०४<br>०० | डि.पी. नं.<br>(३३४०)<br>०९ |
| माहे ऑक्टोंबर-२०१५ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) मंदिर विभाग- | ००<br>०० | ०८<br>०१ | ०७<br>०० | ००<br>०० |
| माहे नोव्हेंबर-२०१५ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) मंदिर विभाग- | ००<br>०० | १४<br>०१ | ०५<br>०० | ००<br>०० |
| माहे डिसेंबर-२०१५ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) मंदिर विभाग- | ००<br>०० | ०८<br>०१ | ०९<br>०० | ००<br>०० |
| माहे जानेवारी-२०१६ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) मंदिर विभाग- | ००<br>०० | ०५<br>०१ | १४<br>०० | ००<br>०० |
| माहे फेब्रुवारी-२०१६ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) मंदिर विभाग- | ००<br>०० | ०२<br>०१ | १८<br>०० | ००<br>०० |
| माहे मार्च-२०१६ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) मंदिर विभाग- | ००<br>०० | ०२<br>०० | १७<br>०० | ००<br>०० |
| एकुण विक्री केलेले डबे | एकुण | **१५** | **११०** | **२१२** | **०९** |

ड) एकुण खर्च डबे-

| महिना | गावरान तुप डबे | खाद्य तेल डबे | वनस्पती तुप डबे | काजु डबे |
|---|---|---|---|---|
| **'ब' नुसार खर्च डबे** | ०० | २१९९१ | २२९३ | ०० |
| **'क' नुसार खर्च डबे** | १५ | ११० | २१२ | ०९ |
| एकुण खर्च डबे- | **१५** | **२२१०१** | **२५०५** | **०९** |

ई.) समरी तक्ता- माहे एप्रिल -२०१६ अखेर.

| | गावरान तुप डबे | खाद्यतेल डबे | वनस्पती तुप डबे | काजु डबे |
|---|---|---|---|---|
| अ नुसार आवक डबे | **१८** | **२२९०३** | **४२९२** | **३२** |
| 'ब' व 'क' नुसार खर्च डबे | १५ | २२१०१ | २५०५ | ०९ |
| एकुण शिल्लक डबे | **०३** | **८०२** | **१७८७** | **२३** |

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:-** आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** उपरोक्त प्रमाणे माहे एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६ अखेर एकुण रिकामे झालेले डबे व त्यांची विल्हेवाट याबाबतचा शिल्लक डब्यांच्या अहवालास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील रिकाम्या तेला-तुपाच्या व काजूच्या डब्यांचा माहे एप्रिल, २०१५ ते मार्च, २०१६ अखेरच्या अहवालाचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**विषय नं.२४ प्लंबींग मेन्टेनंन्सकरीता आवश्यक साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्र. | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

**प्रस्तावना:-** श्री साईंच्या दर्शनासाठी शिर्डी येथे येणा-या भक्तांना निवासाची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून संस्थानमार्फत निवासस्थान इमारतींची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर इमारतीमधील खोल्या/हॉल साईभक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतीमध्ये साईभक्तांचे वापरासाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी पाईपलाईन व्दारे पाण्याचे नळ कनेक्शन देण्यात आलेले आहेत. सततच्या वापराने ब-याच ठिकाणच्या पाईपलाईन, नळ लिकेज होत असतात. पाण्याचा अपव्यय होवू नये यासाठी सदर पाईपलाईनचे लिकेज झाल्यानंतर ते त्वरीत बंद करुन पाणी पुरवठा सुरळीत ठेवणे गरजेचे असते. यासाठी आवश्यक साहित्य कायमस्वरुपी विभागाकडे उपलब्ध ठेवावे लागते.

**प्रस्ताव:-** सद्यस्थितीत प्लंबींग मेन्टेनंसकरीता आवश्यक खालील साहित्य पाणी पुरवठा विभागाकडील स्टोअर्समध्ये तसेच संस्थानचे मुख्य भांडार विभागाकडे उपलब्ध नाहीत. ऐनवेळी पाईपलाईन लिकेज झाल्यास पाणी पुरवठा खंडीत होवू नये, पाणी वाया जावू नये यासाठी सदरचे साहित्य खरेदी करणे आवश्यक आहेत. सदरचे साहित्य खरेदी करणेसाठी दरांबाबत स्थानिक दुकानदारांकडे चौकशी केली असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत. खरेदी करावयाच्या मटेरियलचा (साहित्याचा) तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | साहित्य तपशिल | कंपनी | मागणी | अंदाजे दर रु. प्रती नग/ फुट | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | आऊटलेट पाईप- १.१/४" (आय.एस.आय. मार्क) | --- | ३०० नग. | ४५.०० | १३,५००.०० |
| ०२ | इनलेट पाईप कोल्ड वॉटर- १/२" X २' | प्रयाग,वॉटर टेक | २०० नग. | ७२.०० | १४,४००.०० |
| ०३ | इनलेट पाईप हॉट वॉटर- १/२" X २' | --- | १०० नग. | १००.०० | १०,०००.०० |
| ०४ | जी.आय पाईप- १/२", सी-क्लास. | स्वास्तिक, प्रकाश सुर्या | ५०० फुट. | ३४.०० | १७,०००.०० |
| ०५ | जी.आय पाईप- १", सी-क्लास. | स्वास्तिक, प्रकाश सुर्या | ५०० फुट | ६५.०० | ३२,५००.०० |
| ०६ | जी.आय युनियन- १" (हेवी,आय.एस.आय. मार्क) | --- | ५० नग. | ५४.०० | २,७००.०० |
| ०७ | जी.आय युनियन- १.१/२" (हेवी,आय.एस.आय. मार्क) | --- | ५० नग. | ९२.०० | ४,६००.०० |
| ०८ | जी.आय युनियन- २" (हेवी,आय.एस.आय. मार्क) | --- | ५० नग. | १२८.०० | ६,४००.०० |
| ०९ | फायबर प्रेस कॉक- १/२" | प्रयाग,वॉटर टेक | ४०० नग. | ११२.०० | ४४,८००.०० |
| १० | फायबर युरिनल प्रेस कॉक- १/२" | प्रयाग,वॉटर टेक | १०० नग. | ९८.०० | ९,८००.०० |
| ११ | कमोड शिट कव्हर, सफेद (आय.एस.आय. मार्क) | --- | १०० नग. | ३५०.०० | ३५,०००.०० |
| १२ | विमान टाईप जेट स्प्रे. | --- | १०० नग. | १७५.०० | १७,५००.०० |
| १३ | टेपलॉन टेप ३/४" (२० मिटरचे) | --- | ५०० नग. | २०.०० | १०,०००.०० |
| १४ | न्हाणी ट्रॅप जाळी ५" - स्टील, | --- | २०० नग. | २५.०० | ५,०००.०० |
| १५ | फ्लश टाकी. | कमांडर/चॅम्पियन | ३० नग. | १५००.०० | ४५,०००.०० |
| १६ | हेक्सा ब्लेड- १", डबल | --- | २०० नग. | १०.०० | २,०००.०० |
| १७ | एम-सील- १०० ग्रॅम पॅकिंग | एम-सील | ५० नग. | २७.०० | १,३५०.०० |
| १८ | फ्लश टॅन्क ॲसिसरीज- बॉल कॉक सह, पुर्ण सेट | कमांडर | ४० नग. | ६००.०० | २४,०००.०० |
| | | | | **अंदाजे एकुण रक्कम रुपये-** | **२,९५,५५०.००** |

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** ऐनवेळी पाईपलाईन लिकेज झाल्यास पाणी पुरवठा खंडीत होवू नये, पाणी वाया जावू नये यासाठी सदरचे साहित्य विभागाकडील स्टोअर्समध्ये कायम उपलब्ध ठेववे लागते याकरीता सदरचे साहित्य खरेदी करणे गरजेचे आहे. श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ नुसार वरील नमुद तरतुदीस अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेतल्यानंतर वरील तपशिलानुसार नमुद मटेरियल (साहित्य) कोटेशन मागवून खरेदी करता येतील असे मत आहे.

वरीलप्रमाणे नमुद साहित्य (मटेरियल) खरेदी करणेसाठी अंदाजे रु.२,९५,५५०.००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचे साहित्य कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.२,९५,५५०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.९२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ऐनवेळी पाईपलाईन लिकेज झाल्यास पाणी पुरवठा खंडीत होवू नये व पाणी वाया जावू नये यासाठी प्रस्तावात नमुद केलेले प्लंबींग साहित्य करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु सदरहू खरेदीकामी ईनिविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२५** **संस्थानमधील पाणी नमुन्यांचीतपासणी करणेसाठी एजन्सीची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/तरतुद क्रमांक | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (क) | मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन. |

**प्रस्तावना:-** पाणी पुरवठा विभागाकडील कनकुरी साठवण तलाव येथून शुध्द केलेले पाणी पिण्यासाठी व इतर वापरासाठी संस्थान परिसरामध्ये विविध ठिकाणी वितरीत केले जाते. सदरचे शुध्द केलेले पाणी पिण्यायोग्य आहे किंवा नाही याबाबत पाण्याची नमुन्यांची तपासणी होणे आवश्यक असल्याने पाणी नमुन्यांची दरमहा संस्थानचे कनकुरी साठवण तलाव येथील प्रयोगशाळेत, जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, अहमदनगर तसेच याव्यतिरिक्त खाजगी एजन्सीची नेमणूक करुन त्यांचेकडून पाणी नमुन्यांची तपासणी करणेत येते.

सन २०१६ करीता संस्थानमधील पाणी नमुण्यांची तपासणी करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. यावर मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८ डिसेंबर, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्रं.६३४ अन्वये मान्यता देण्यात आलेली होती.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०५/२०१६ रोजीचे सभेत यावर सविस्तर चर्चा होवून सन २०१६ करीता संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी एजन्सीची नेमणूक करणेकरीता अश्वमेध इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट, नाशिक यांचे प्रती नमुना एकत्रित रु.९१६/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना जा.नं.एसएसएस/ वशी/ पाणी पुरवठा/१५३७/२०१६, दि.०१/०७/२०१६ अन्वये दि.०१/०७/२०१६ ते दि.३१/१२/२०१६ या कालावधीसाठी चार नमुने सुरवातीचे पंधरा दिवसात उर्वरीत चार नमुने नंतरचे पंधरा दिवसात याप्रमाणे दरमहा एकुण ०८ नमुन्यांची तपासणी करणेसाठी कार्यादेश देण्यात आलेला होता.

**प्रस्ताव:-** अश्वमेध इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट, नाशिक यांचेकडुन पाणी नमुने तपासणी करणेची मुदत माहे डिसेंबर, २०१६ अखेर संपत आहे. मागील सात ते आठ वर्षाचे कालावधीत संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी माहे जानेवारी ते माहे डिसेंबर या कालावधीसाठी खाजगी एजन्सी नेमणूक करणेत

येत होती. मागील वर्षी सन-२०१६ वर्षीचे कालावधीत कोटेशन बोलवून कार्यादेश देणे या प्रक्रियेस वेळ गेल्याने अश्वमेध इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट, नाशिक यांना माहे जुलै, २०१६ ते माहे डिसेंबर, २०१६ या ०६ (सहा) महिन्यांचे कालावधीसाठी कार्यादेश देण्यात आलेला होता.

**परंतु,** सन २०१६ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी ॲलम, ब्लीचिंग पावडर व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठी माहे डिसेंबर अखेर कार्यादेश देण्यात आल्याने संबंधीतांची बीले आदा करतेवेळी लेखाशाखेकडून वार्षिक ऑर्डर देतेवेळी माहे एप्रिल ते माहे मार्च या प्रमाणे आर्थिक वर्षाचा कालावधी विचारात घेवून कार्यादेश देण्यात यावे अशी सुचना करण्यात आलेली होती.

याकरीता पुढील कालावधीसाठी संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी संबंधीत एजन्सीजकडून माहे एप्रिल ते माहे मार्च या प्रमाणे आर्थिक वर्षाचा कालावधी विचारात घेवून कोटेशनची मागणी करावी लागेल. सन २०१६ करीता अश्वमेध इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट, नाशिक यांचेकडुन पाणी नमुने तपासणी करणेची मुदत माहे डिसेंबर, २०१६ अखेर संपत आहे. पुढील माहे जानेवारी २०१७ ते माहे मार्च २०१७ या कलावधीसाठी अश्वमेध इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट, नाशिक यांचेकडे मागील दर प्रती नमुना एकत्रित रु.९१६/- याप्रमाणे तपासणी करणेबाबत चौकशी केली असता त्यांनी पुढील तीन महिन्यासाठी मागील दराप्रमाणे पाणी नमुने तपासणी करुन देण्याची तयारी दर्शविलेली आहे. .

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** माहे जानेवारी, २०१७ ते माहे मार्च, २०१७ या कालावधीत मागील पाणी तपासणी एजन्सी अश्वमेध इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट, नाशिक यांना मागील दर प्रती नमुना एकत्रित रु.९१६/- याप्रमाणे मुदतवाढ देता येईल. त्यापुढील माहे एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ या कालावधीसाठी पाणी नमुने तपासणी करणेसाठी नव्याचे कोटेशनची मागणी करुन या कालावधीसाठी पाणी नमुने तपासणी करणेसाठी एजन्सीची नेमणूक करता येईल असे मत आहे.

माहे एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ या कालावधीसाठी चार नमुने सुरवातीचे पंधरा दिवसात उर्वरीत चार नमुने नंतरचे पंधरा दिवसात याप्रमाणे दरमहा एकुण ०८ नमुन्यांची तपासणी करणेसाठी प्रती नमुना अंदाजे रु.१,४००/- सर्व करसमावेशक व व्हीजिट चार्जसह वार्षिक अंदाजे एकुण रु.१,३४,४००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी अश्वमेध इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट, नाशिक यांना मागील दर प्रती नमुना एकत्रित रु.९१६/- याप्रमाणे माहे जानेवारी, २०१७ ते माहे मार्च, २०१७ या कालावधीसाठी पाणी नमुने तपासणी करणेसाठी मुदतवाढ देणेस व पुढील माहे एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ या कालावधीसाठी चार नमुने सुरवातीचे पंधरा दिवसात उर्वरीत चार नमुने नंतरचे पंधरा दिवसात याप्रमाणे दरमहा एकुण ०८ नमुन्यांची तपासणी करणेसाठी प्रती नमुना अंदाजे रु.१,४००/- सर्व करसमावेशक व व्हीजिट चार्जसह वार्षिक अंदाजे एकुण रु.१,३४,४००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९२९** **यावर सविस्तर चचा॑ होऊन, संस्थानमधील पाणी नमुन्यांची तपासणी करणेसाठी एजन्सीची नेमणूक करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२६** **संस्थानकडून १" पाण्याचे नळ कनेक्शन विना मिटर उपलब्ध करुन देणेबाबत शासकीय व्ही.आय.पी. विश्रामगृह, शिर्डी यांनी केलेल्या मागणीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २०-२१/०४/२००२ रोजीचे सभेतील विषय नं.२०, निर्णय क्रं.२२२ अन्वये शिर्डी येथील शासकिय विश्रामगृहास १/२" कनेक्शनव्दारे दररोज तीन तास पाणी पुरवठा करणेत यावा असा निर्णय झालेला होता. शासकिय विश्रामगृहाकडुन अंतर जास्त असल्याने १" पाईपलाईन टाकण्यात आलेली होती. त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/०२/२००३ रोजीचे सभेतील विषय नं.१८, निर्णय क्रं.६२ अन्वये दररोज दोन तास याप्रमाणे पाणी पुरविण्यात येवून त्यापोटी वार्षिक रु.८,६४०/- पाणीपट्टी रक्कम आकारण्यात यावी असा निर्णय झालेला होता.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी पिंपळवाडी व कनकुरी संयुक्त पाणी पुरवठा योजनेतून मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयास अनुसरुन, शासकिय विश्रामगृह, शिर्डी यांना जानेवारी, २००३ ते मार्च, २००८ या कालावधीत पाणी पुरवठा जोडुन देण्यात आलेला होता. त्यानुसार शासकिय विश्रामगृह, शिर्डी यांचेकडे एकुण रु.३४,५५८/- मात्रची पाणीपट्टी रक्कम थकित होती. त्यांपैकी त्यांचेकडुन रु.२२,८८०/- मात्रचे रकमेचा भरणा करण्यात आलेला होता. उर्वरीत थकित रक्कम रु.११,६७८/- मात्र शासकिय विश्रामगृह शिर्डी यांचेकडुन सन २००८ पासून येणे बाकी होती. शासकिय विश्रामगृह, शिर्डी यांना थकित रक्कम भरणेबाबत वेळोवेळी पत्र देण्यात आलेले होते परंतू त्यांचेकडुन थकित रकमेचा भरणा करण्यात आलेला नव्हता. माहे एप्रिल २००८ पासून शासकिय विश्रामगृह, शिर्डी यांचा पाणी पुरवठा बंद असलेने त्यांना त्यापुढील कालावधीची पाणीपट्टी रक्कम कळविणेत आलेली नव्हती.

तद्नंतर मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी, भाग शिर्डी यांचे कार्यालयाकडील दि.१९/०५/२०१६ रोजीचे पत्र संस्थान कार्यालयास प्राप्त झालेले होते. सदरचे पत्रात त्यांनी विश्रामगृहात येणा-या अति महत्वाचे अतिथी/ मा.मंत्री/ मा.खासदार/ मा.आमदार/ लोकप्रतिनीधी/शासकिय व कर्मचारी यांची पाणी नसल्यामुळे गैरसोय होत

असलेने संस्थानकडुन १" पाण्याचे नळ कनेक्शन जोडून देणेबाबतची कार्यवाही करणेत यावी असे कळविलेले होते. सदरचे पत्रावर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी विश्रामगृहाच्या पहिल्या मजल्याच्या बांधकामाबाबतीत Agreement झालेले आहे काय? यापुर्वी संस्थानने पाणी पुरवठा केलेला आहे काय? यासह सविस्तर टिपणी मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करावी असे निर्देश देण्यात आलेले होते. सदरहू प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेत निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता.

**मा.व्यवस्थापन समिती सभा निर्णय:-** सदरहू प्रकरणी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेत खालीप्रमाणे निर्णय क्रं.५२६ संमत झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, शासकिय व्ही.आय.पी.विश्रामगृह, शिर्डी यांचेकडे पुर्वीची रु.११,६७८/- मात्र पाणीपट्टी बाकी असल्याचे उपरोक्त प्रस्तावावरुन निदर्शनास येत आहे. बाकी असलेल्या पुर्ण रकमेचा भरणा करणेबाबत त्यांना कळविण्यात यावे व सदरहू सकमेचा भरणा केल्यानंतर शासकिय व्ही.आय.पी. विश्रामगृह, शिर्डी यांना अर्धा इंच पाण्याचे नळ कनेक्शन उपलब्ध करुन दयावे, असे ठरले. "

**प्रस्ताव:-** शासकिय व्ही.आय.पी. विश्रामगृह, शिर्डी यांचेकडुन रु११,६७८/- मात्र रकमेचा भरणा भारतीय स्टेट बँक शाखा शिर्डी, डिमांड ड्राफ्ट क्रं.८५७४९३, दि.१४/१०/२०१६ अन्वये करण्यात आलेला आहे.

याबाबत उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, राहाता यांचे दि.११/११/२०१६ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले असून, त्यामध्ये त्यांनी शासकिय व्ही.आय.पी.विश्रामगृह, शिर्डी येथे १६ कक्ष असून तेथे सतत अति महत्वाचे अतिथी/मा.मंत्री/मा.खासदार/मा.आमदार/लोकप्रतिनिधी/शासकिय अधिकारी व कर्मचारी यांची वर्दळ असते. तसेच सदरचे १६ कक्षापैकी ०४ कक्ष संस्थान मालकीचे आहेत. याव्यतिरिक्त शासकिय विश्रामगृह शिर्डीचे आवारात शासकिय निवासस्थाने असल्याने शासकिय विश्रामगृह, शिर्डी करीता १/२" नळ कनेक्शन ऐवजी १" नळ कनेक्शन विना मिटर मंजूर करणेबाबत विनंती केलेली आहे.

शासकिय व्ही.आय.पी. विश्रामगृह, शिर्डी यांना यापुर्वी १/२" कनेक्शनव्दारे दररोज दोन तास याप्रमाणे पाणी पुरविण्यात येवून त्यापोटी वार्षिक रु.८,६४०/- पाणीपट्टी रक्कम आकारणी करणेत येत होती. शासकिय व्ही.आय.पी.विश्रामगृह, शिर्डी यांनी दि.११/११/२०१६ रोजीचे पत्रान्वये १/२" नळ कनेक्शन ऐवजी १" नळ कनेक्शन विना मिटर मंजुर करणेबाबत विनंती केलेली असून याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निणर्य होणे आवश्यक आहे.

तरी सदरहू प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासकीय व्ही.आय.पी. विश्रामगृह, शिर्डी यांचे मागणीप्रमाणे त्यांना १" पाण्याचे नळ कनेक्शन उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आली. परंतु सदरहू कनेक्शन विनामीटर न देता मीटर बसवून देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२७** **आटा व बेसन गिरणीचे जाते आऊटसोर्स पध्दतीने टाकणेकामी टेंडर बोलविणेबाबत तसेच याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.** १४ (भाग ४) मध्ये १४ (२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

श्री साईप्रसादालयात दररोज सरासरी ४० हजार साईभक्त प्रसाद भोजन घेतात. तसेच दररोज सरासरी १० हजार नाष्टा पाकिटे तयार केली जातात. तसेच लाडू निर्मिती विभागामार्फत दररोज १ लाख लाडू नग व बुंदीचे ६० हजार पाकीटे तयार करणेत येत आहे. प्रसाद भोजन व नाष्टा पाकीटामध्ये भक्तांना चपाती देणेकामी दररोज सरासरी ५० क्विंटल आटा व लाडू निमीती विभागा मार्फत ३५ क्विंटल बेसन तयार करणेत येते. याकरीता १८ इंच साईजच्या तीन व १६ इंच साईजच्या तीन अशा एकुण सहा गिरणी कार्यान्वित आहे.

उपरोक्त सहा गिरणी सकाळी ७.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत अविरत चालु असतात. तसेच उत्सव काळात आटा व बेसन कमी पडू नये याकरीता रात्रपाळीत सुद्धा गिरणी कार्यान्वित ठेवाव्या लागतात. पिठाची गुणवत्ता व आऊटपुट मिळणेकरीता गिरणीच्या जातेला दर ५-६ दिवसानी टाके मारावे लागतात. तसेच नविन जाते टाकावे लागतात. याकरीता दगडाला होल मारणे, त्यात शिसे ओतने, शॉफ्ट फिट करणे यासारखी काम करावी लागतात. सदरचे कामी सन २०१२ पासून आउट सोर्सींग पद्धतीने काम देणेत येत आहे. याकामी स्थानिक गिरणीचे जातेला टाके मारणा-या टेक्निशियन यांचेकडून कोटेशन मागावून मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने कार्यादेश देणेत येतो. फेबुवारी २०१५ ते जानेवारी २०१७ या दोन वर्षाच्या कालावधी करीता १८ इंच साईजचे जातेला टाके मारणेकरीता श्री आण्णासाहेब बावके यांना प्रती नग २४०/- व १६ इंच साईजच्या जातेकरीता दिनेश आसाराम गुजर यांना प्रती नग रु. १७९/- याप्रमाणे कायार्देश देण्यात आलेला आहे. फेब्रुवारी २०१५ ते सप्टेंबर २०१६ या १९ महिन्याच्या कालावधीकरीता रक्कम रु १,०१,१७१/- एवढा खर्च आलेला असून प्रति महा सरासरी रक्कम रु ५३२४/- खर्च झालेला आहे.

श्री.बावके व श्री.गुजर यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दिनांक ३१.१.२०१७ रोजी संपत आहे. जातेला टाके मारणे व नविन जातेला टाकेमारुन फिटींग करणे यासारखी कामे पुढिल दोन वर्षे कालावधीकरीता आऊटसोसींग पद्धतीने करणेकामी सदरचे कामे करणा-या स्थानिक जाते टाकणा-या टेक्निशियन यांचेकडून कोटेशन मागावून करावे लागणार आहे. याकामी अंदाजे रक्कम रु. १,५०,०००/- खर्च अपेक्षित आहे.

तरी १ फेब्रुवारी २०१७ ते ३१ जानेवारी २०१९ याकालावधी करीता श्री साईप्रसादालय व लाडू निर्मिती विभागाकडे वापरात असलेल्या गिरणीचे जातेचे टाके टाकणे तसेच नविन जाते फिटींग करणेकामी विहीत पद्धतीने दरपत्रक बोलविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यतेसाठी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१ फेब्रुवारी २०१७ ते दि.३१ जानेवारी २०१९ या कालावधी करीता श्री साईप्रसादालय व लाडू निर्मिती विभागाकडे वापरात असलेल्या गिरणीच्या जात्याचे टाके टाकणे तसेच नविन जाते फिटींग करणेकामी विहीत पद्धतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.२८** **साईआश्रम भक्तनिवास येथे बसविण्यात आलेल्या १३ लिफ्टचे AMC कार्यादेश देणेकामी कालावधीतील बदलास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांना अधिकाधिक सेवा सुविधा उपलब्ध करुन देणेकरीता साई आश्रम भक्तनिवास येथील इमारतीमध्ये साईभक्तांना वरील मजल्यावर ये-जा करणेकरीता मे. जॉनसन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांचेमार्फत स्टेनलेस स्टील ॲटोमॅटीक डोअर्सच्या 13 (तेरा) लिफ्टस बसविण्यात आलेल्या आहेत. लिफ्ट सतत कार्यान्वित राहणेकरीता प्रत्येक वर्षी लिफ्टची उत्पादक कंपनी यांचेमार्फत AMC करण्यात येते.

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 16/02/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 140 नुसार साईआश्रम भक्तनिवासस्थान येथे बसविण्यात आलेल्या 13 लिफ्टची उत्पादक कंपनी मे. जॉनसन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांना दिनांक 01/02/2016 ते 31/01/2017 या एक वर्षाचे कालावधीकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट देणेस व याकामी त्यांनी सिल्वर प्लॅननुसार कळविलेली एकत्रित रक्कम रुपये 5,80,515/- मात्रची रक्कम अदा करावयाच्या खर्चास तसेव दुरुस्तीकामी स्पेअरपार्टची आवश्यकता भासल्यास त्याची रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात आली.

मागील AMC कालावधीत (दि. 01/10/2014 ते 30/09/2015) शेवटचे महिन्यात लिफ्टचे काही पार्ट खराब झाल्याने ते बदलणे बाकी असल्याकारणांने मे. जॉनसन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांना सदरचे कालावधीतील बील अदा केलेले नव्हते. मागील बील अदा झालेशिवाय पुढील AMC कार्यादेश मिळाला तरी दुरूस्तीकरीता काही स्पेअर लागले कंपनी कडुन ते प्राप्त होणार नाहीत. असे मे. जॉन्सन लिफ्ट प्रा. लि., पुणे यांचे सर्व्हीस इंजीनिअर यांनी सांगीतले होते. त्यामुळे मागील AMC कालावधीतील राहीलेले स्पेअर पार्ट बसवुन घेऊन सदर कालावधीचे बील मे. जॉन्सन लिफ्ट प्रा. लि., पुणे यांना अदा केले व त्यानंतर दिनांक01/07/2016 ते 30/06/2017 या एक वर्षातील कालावधीकरीता जा.नं. एसएसएसटी/मेकॅनिकल/918/2016 दिनांक 28 मे, 2016 अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

दिनांक 01/07/2016 ते 30/06/2017 हा एकच वर्षाचा कालावधी असल्याने कार्यादेश देतांना संस्थानचे कुठल्याही प्रकारचे आर्थिक नुकसान झालेले नसून, उलट AMC नसलेल्या दिनांक 01/10/2015 ते 01/06/2016 या कालावधीत मे. जॉनसन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांचेमार्फत लिफ्ट कार्यान्वित ठेवलेल्या होत्या, त्याबदल्यात कुठलीही रक्कम अदा करण्यात आलेली नाही. मात्र लेखापरिक्षणाच्यादृष्टीने कार्यादेश कालावधी बदलास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी साईआश्रम भक्तनिवासस्थान येथे बसविण्यात आलेल्या 13 लिफ्टची उत्पादक कंपनी मे. जॉनसन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांना AMC कार्यादेश देतेवेळी कालावधीतील केलेल्या बदलास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास येथे बसविण्यात आलेल्या १३ लिफ्टच्या AMC साठी लिफ्टची उत्पादक कंपनी मे.जॉनसन लिफ्टस प्रा.लि., पुणे यांना कालावधीमध्ये बदल करुन देण्यात आलेल्या कार्यादेशास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच त्यांचा कालावधी संपल्यानंतर सदरहू लिफ्टचे स्पेअरपार्टस् सह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबतची कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.२९** **श्री साईप्रसादालय स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन १९९९ पासून प्रसादालयात अन्न शिजविणेसाठी थरमॅक्स कंपनीचा RXG-4 स्टीम बॉयलर वापरणेत येत आहे. माहे जानेवारी २००९ पासून नविन प्रसादालय सुरु करतांना थरमॅक्स कंपनीचा RXD-850 स्टीम बॉयलर बसविणेत आलेला आहे. त्याशिवाय मोतीचूर लाडू प्रसाद बनविणेकामी थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणेसाठी थरमॅक्स कंपनीचा थर्मिक फ्ल्युड हिटर ऑगष्ट, २००९ पासून कार्यान्वित करणेत आलेला आहे.

सन १९९९ पासून RXG-4 स्टीम बॉयलरकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट थरमॅक्स कंपनीने झोनप्रमाणे ठरवून दिलेला अधिकृत फ्रॅंचीसला दयावे लागत असल्याने सन २०१० पासून दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट मे. मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना देण्यात आलेला आहे. सन २०१६ या वर्षाचे RXG-4, RXD-850 या स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट हे

३१.१२.२०१६ रोजी संपणार आहे. मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांनी वार्षिक सव्हींसिंगचे काम समाधानकारक व वेळेत पूर्ण करुन दिलेले आहे.

सन २०१७ करीता दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटर सुस्थितीत ठेवून कार्यान्वित राहणेसाठी वार्षिक सर्व्हीसिंग कॉन्ट्रक्ट देणे गरजेचे असल्यामुळे मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांनी दिनांक५.११.२०१६ चे कोटेशनव्दारे सन २०१७ (दि. १.१.२०१७ ते ३१.१२.२०१७) या वर्षासाठी RXG-4, RXD-850 व थर्मिक फ्ल्युड हिटरसाठी खालीलप्रमाणे वार्षिक सर्व्हीसिंगचे दर कळविलेले आहे. सदर वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्टमध्ये दोन महिन्यांनी एक याप्रमाणे प्रत्येक युनिटसाठी सहा सर्व्हीसिंग करुन देणार आहे.

| अ.नं. | बॉलयरचे नांव | बॉलयर खरेदी वर्ष | खरेदी किमंत | सन २०१६ चे AMC दर रुपये | सन २०१७ साठी AMC करीता दिलेले दर रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | RXG-4 | १९९९ | ४,८७,४७४/- | २९,५००/- + टॅक्सेस | ३०,९७५/- + टॅक्सेस |
| 2. | RXD-850 | २००८ | १९,००,०००/- | २९,५००/ + टॅक्सेस | ३०,९७५/- + टॅक्सेस |
| 3. | थर्मिक फ्ल्युड हिटर | २००९ | २६,००,०००/- | २९,५००/+ टॅक्सेस | ३०,९७५/- + टॅक्सेस |
| | एकूण रुपये : | | | ८८,५००/- + टॅक्सेस | ९२,९७५/- + टॅक्सेस |

दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटर सुस्थितीत ठेवून कार्यान्वित राहणेसाठी वार्षिक सर्व्हीसिंग कॉन्ट्रक्ट देणे गरजेचे असल्यामुळे थरमॅक्स कंपनीचे अधिकृत डिलर मे. मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट देणे आवश्यक आहे.

तरी थरमॅक्स कंपनीचे अधिकृत फ्रॅचीस मे. मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना सन २०१७ या वर्षाकरीता दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे सर्व्हीस कॉन्ट्रक्ट देणेस व त्याकामी सर्व्हीस फी रुपये ९२,९२५/- + सर्व्हीस टॅक्स (लागू असेल तो) चे खर्चास मान्यता घेणेसाठीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९३३** **श्री साईप्रसादालयाकडील स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत यावे, असे समितीचे मत झाले. परंतु** थरमॅक्स कंपनीने **कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेस यापुर्वीच नकार दिलेला आहे, अशी माहिती सभेस मिळाली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, थरमॅक्स कंपनीचे अधिकृत फ्रॅचीस मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना सन २०१७ या वर्षाकरीता श्री साईप्रसादालयातील दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे सर्व्हीस कॉन्ट्रक्ट देणेस व त्याकामी सर्व्हीस फी रुपये ९२,९२५/- + सर्व्हीस टॅक्स (लागू असेल तो) मात्र येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.३०** **साई समाधी शताब्दीकरीता येणाऱ्या साईभक्तांच्या कम्युनिकेशनसाठी बीएसएनएलचे नवीन टॉवर संस्थानचे जागेत बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(१) मध्ये भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे वगैरे बाबत नमूद आहे.

**प्रस्ताव –** श्री साई समाधी शताब्दीकरीता येणा-या साईभक्तांच्या कम्युनिकेशनसाठी बीएसएनएलचे नवीन टॉवर संस्थानचे जागेत बसविणेबाबत.

**प्रस्तावना–** श्री साई समाधी शताब्दीकरीता येणा-या साईभक्तांच्या कम्युनिकेशनसाठी बीएसएनएलचे नवीन टॉवर संस्थानचे जागेत बसविणेकामी मा.नगराध्यक्षा,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी तथा विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.२२/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदरचा विषय साईबाबा संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सादर करणेकामी विनंती केलेली आहे. तथापि उपरोक्त कामी संस्थानच्या जागेत नवीन टॉवर बसविणेकामी भारतीय दूरसंचार निगम लि. (बीएसएनएल) यांनी संस्थानकडे अद्यापपावेतो तशी मागणी केलेली नाही. तरीदेखील याकामी भारतीय दूरसंचार निगम लि. (बीएसएनएल) यांचेकडेस पत्रव्यवहार करता येईल. त्यात त्यांचेकडून खालील मुद्दयांवर माहीती मागविता येईल.

१) बीएसएनएलचे सद्यस्थितीत असलेले टॉवरवर साई समाधी शताब्दीकरीता येणा-या साईभक्तांच्या कम्युनिकेशनसाठी नेटवर्क वाढविता येईल किंवा कसे ?

२) नसल्यास नवीन टॉवर बसविता येईल किंवा कसे ?

३) नवीन टॉवर बसविणेचे झाल्यास संस्थानची सर्वार्थाने सुयोग्य अशी जागा कोणती निवडावी लागेल ?

४) नवीन टॉवर बसविणेकामी आवश्यक असणा-या कायदेशीर बाबी काय आहेत ?

५) नवीन टॉवर बसविणेस मान्यता मिळाल्यास त्यासाठीचे संस्थानला बीएसएनएल कडून जास्तीत जास्त मासिक भाडे किती मिळू शकेल ?

उपरोक्त माहीती भारतीय दूरसंचार निगम लि. (बीएसएनएल) यांचेकडून मागवून घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई समाधी शताब्दीकरीता येणाऱ्या साईभक्तांच्या कम्युनिकेशनसाठी बीएसएनएलचे नवीन टॉवर बसविणेसाठी प्रस्तवात नमुद केलेल्या मुद्दयांची माहिती त्यांचेकडून मागविणेत येऊन, त्यांना मोकळी जागा न देता इमारतीवर टॉवर बसविणेस परवागनी देण्यात यावी.**

**तसेच बीएसएनएल प्रमाणेच इतर कंपन्यांनी टॉवर बसविणेसाठी संस्थानकडे जागेची मागणी केल्यास त्यांनाही इमारतींवरील जागा उपलब्ध करुन देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.३१** **नवी दिल्ली व गुडगाव (हरीयाना) या दोन्ही ठिकाणी संस्थानचे माहिती केंद्र सुरु करणेसाठी साईसेवक नरेंद्र मिश्रा, ॲडमिनिस्ट्रेटर, हरि चाँद प्रकाश वाटी चॅरिटेबल मेमोरीयल ट्रस्ट, नवी दिल्ली यांनी पत्राद्वारे कळविलेली जागा विनामोबदला स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) मधील तरतूदीनुसार विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील.

**प्रस्ताव-** नवी दिल्ली व गुडगाव (हरीयाना) या ठिकाणी असलेल्या चॅरिटेबल धर्मशाळेतील जागेत श्री साईबाबा संस्थान कार्यकारी सदस्य व इतर सदस्य यांना वापरास देणेबाबत व दोन्ही ठिकाणी संस्थानचे माहीती केंद्र सुरु करणेबाबत साईसेवक नरेंद्र मिश्रा, ॲडमिनिस्ट्रेटर, हरि चॉंद प्रकाश वांटी चॅरिटेबल मेमोरीयल ट्रस्ट, नवी दिल्ली यांचे पत्र जा.नं.१०१/साई दि.०६/१०/२०१६ चे पत्राचे अनुषंगाने त्यांनी संस्थानला दोन्ही ठिकाणी माहीती केंद्रासाठी विनामोबदला वापरास देवू केलेल्या जागेची प्रकाशने विभागामार्फत समक्ष पाहाणी करणेबाबत.

**प्रस्तावना-** नवी दिल्ली येथे साई टेंपल प्लॉट नं.२ सिरी फोर्ट,हाउज खास व गुडगाव,हरीयाना येथे प्लॉट नं.१,आर-ब्लॉक,उप्पल साऊथ एंड कॉलनी,सोहना-गुडगाव रोड या ठिकाणी हरी चॉंद प्रकाश वांटी चॅरिटेबल मेमोरीयल ट्रस्ट, नवी दिल्ली यांच्या मालकीच्या मिळकती असून यापैकी एक हाउज खास, नवी दिल्ली या ठिकाणी चॅरिटेबल धर्मशाळेसह ४९ वातानुकूलीत खोल्या व दोन हॉल असून दुसरी सोहना-गुडगाव रोड, आमेक्स मॉलच्या समोर, गुडगाव, हरीयाना या ठिकाणी ५ रुम आहेत.

नवी दिल्ली हाउज खास धर्मशाळा येथील हॉल विविध बैठकांसाठी योगा,मेडीटेशन इ.साठी सुमारे २०० व्यक्ती बसू शकतील अशा पध्दतीचा आहे. सदर दोन्हीही ठिकाणी श्री साईबाबा संस्थानचे कार्यकारी सदस्य व इतर सदस्य यांना राहण्यासाठी,वापरण्यासाठी,बैठकीसाठी विनामोबदला देण्याची संस्थेची इच्छा आहे. संस्थानने यासाठी किमान १५ दिवस अगोदर त्यांचा कार्यक्रम कळविल्यास त्याप्रमाणे निवासव्यवस्था, बैठकव्यवस्था करता येईल वगैरेबाबत नमूद करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे दिल्ली व गुडगाव या दोन्ही ठिकाणी माहीती केंद्र सुरु करावे, त्यासाठी आवश्यक असणारी काही जागा उपलब्ध करुन देणेसाठी आमची सोसायटी संस्थानला मदत करेल, असेबाबत विषयांकित पत्रात नमूद केलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** नवी दिल्ली व गुडगाव (हरीयाना) येथे संस्थानचे कार्यकारी सदस्य व इतर सदस्य यांच्या बैठका आयोजित केल्या जात नाहीत,अशी इकडील धारणा आहे. तथापि सदर दोन्ही ठिकाणी उक्त ट्रस्ट (सोसायटी) ही संस्थानला संस्थानचे माहीती केंद्र सुरु करणेकामी आवश्यक ती जागा उपरोक्त दोन्ही ठिकाणी विनामोबदला उपलब्ध करुन देत असल्यास सदर ठिकाणी संस्थानचे माहीती केंद्र सुरु करता येतील व त्याबाबतची पुढील कार्यवाही संस्थानचे प्रकाशने विभागामार्फत करता येईल. (उदा. जागेची समक्ष पाहाणी करणे, आवश्यक ती जागा व योग्य ती जागा उपलब्ध आहे किंवा कसे याची खात्री करणे इ.)

तरी सदरचा प्रस्ताव उपरोक्त ट्रस्टने संस्थानच्या माहीती केंद्रासाठी विनामोबदला वापरासाठी देवू केलेल्या जागेची संस्थानचे प्रकाशने विभागामार्फत समक्ष पाहाणी करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईसेवक नरेंद्र मिश्रा, ॲडमिनिस्ट्रेटर, हरि चाँद प्रकाश वाटी चॅरिटेबल मेमोरीयल ट्रस्ट, नवी दिल्ली यांच्या प्रस्तावात नमुद केलेल्या नवी दिल्ली व गुडगाव (हरीयाना) या दोन्ही ठिकाणच्या जागा संस्थानचे माहिती केंद्र सुरु करणेसाठी विनामोबदला स्विकारणेत याव्या. तसेच या माहिती केंद्रावर संस्थान प्रकाशने विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.३२** **(अ) संस्थान कायम कर्मचाऱ्यांच्या जादा वैद्यकिय बीलाचा परतावा अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.–** १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक–** खालील संस्थान कर्मचा-यांची रु.१०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. १०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी–**

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | | |
| १ | वर्पे सविता चांगदेव विभाग-साईबाबा हॉस्पिटल हुद्दा- परिचारीका | आई | Diabetes & arthritis | डॉ.इंगळे | साईबाबा हॉस्पिटल | ६२२७.०० | ६२२७.०० | संस्थानच्या औषध भांडारात औषधे उपलब्ध नसलेमुळे बाहेरुन विकत घेतली आहे. |
| २ | श्री.सतिश गोंविद कासार विभाग-लेखाशाखा हुद्दा-वरिष्ठ लेखापाल | पत्नी व स्वंतः | Left Lobe Liver effusion & Diabetes | डॉ.वाघ | साईबाबा हॉस्पिटल | ५९०६.०० | ५९०६.०० | |
| ३ | श्री.दत्तात्रय आप्पासाहेब डांगे विभाग-श्री साईप्रसादालय, हुद्दा-मदतनीस | पत्नी | Poisoning | डॉ.जाधवर | साईबाबा हॉस्पिटल | ५९२८.०० | ५९२८.०० | |
| ४ | श्री.दत्तात्रय चंद्रकांत हजारे विभाग-विदयुत हुद्दा-तारतंत्री | वडिल | Ca | डॉ.राम नाईक | साईनाथ रुग्णालय | १६००.०० | १६००.०० | |
| | | | | | **एकूण** | **१९६६१.००** | **१९६६१.००** | |
| | **ब – संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते** | | | | | | | |
| ५ | श्री.दत्तात्रय चंद्रकांत हजारे विभाग-विदयुत हुद्दा-तारतंत्री | वडिल | Ca | डॉ.राम नाईक | प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी | ५५९७.०० | ५५९७.०० | अ.नं.५ ते १० करीता सदरचे उपचार हे संस्थानच्या रुग्णालयात होत नसलेमुळे संस्थानच्या मान्य यादीतील हॉस्पिटल मध्ये पाठविणेत आले आहे. |
| ६ | श्री.बाबासाहेब काशिनाथ थेटे विभाग-द्वारावती भक्तनिवास , हुद्दा – मदतनीस | स्वंतः | Ca | डॉ.देवरे | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | १६१४००.०० | १६१४००.०० | |
| ७ | सुरेखा राजु गायकवाड विभाग-श्री साईनाथ रुग्णालय, हुद्दा – परिचारीका | पती | Ca | डॉ.राम नाईक | टाटा मेमोरियल सेंटर,नाशिक | १४०१७.०० | ११२८४.०० | |
| ८ | श्री.सचिन शशिकांत कुलकर्णी विभाग-चौकशी निवासस्थान हुद्दा-मदतनीस | मुलां करीता | Black spot on tongue | डॉ.रचना साबळे | प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी | ३३१४२.०० | ३३१४२.०० | |
| ९ | श्री.काशिनाथ बबन हारदे विभाग-सा.भ.नि. हुद्दा-मदतनीस | मुलगा | Leg IPT Acute Hepatitis | डॉ.जाधवर | सहयाद्री हॉस्पिटल , नाशिक | १७७०९.०० | १४५८९.०० | |
| १० | सौ.शकुंतला शंकर मोहिते विभाग-साईनाथ रुग्णालय हुद्दा-परिचारीका | आई | Ca | डॉ.नितीन ताठे | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, मुंबई | ११५१९.०० | ११५१९.०० | |
| | | | | | **एकुण** | **२४३३८४/-** | **२३७५३१/-** | |
| | **क – संस्थानच्या यादीत रेफर केले होते परंतु निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार केले होते.** | | | | | | | |
| ११ | श्री.योगेश त्र्यंबक साळवी विभाग-लेखाशाखा हुद्दा-मदतनीस | स्वंतः | Ca | डॉ.खांदे | टाटा मेमोरियल, मुंबई व क्युरी मानवता कॅन्सर सेंटर,नाशिक | १७२४०.०० | १२५१४.०० | |
| | | | | | एकुण | **१७२४०.००** | **१२५१४.००** | |
| | **अ + ब+ क एकूण** | | | | | **२८०२८५/-** | **२६९७०६/-** | |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.२६९७०६/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन काही औषधे औषध भांडार विभागात उपलब्ध नव्हती तसेच रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतले.तसेच सदर ठिकाणी फोनद्वारे चौकशी करुन उपचार घेतलेले खात्री करुन घेतली व सदर पडताळणी करुन घेतले. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही.

तरी वरील प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून निर्णय होणेस विनंती.

---

**विषय नं.३२(B)** **संस्थान कायम कर्मचाऱ्यांच्या जादा वैद्यकिय बीलाचा परतावा अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – १)** जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९.
२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक –** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. १०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. १०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | | |
| १ | श्री.नवनाथ नरहरी मते<br>विभाग-श्री साईप्रसादालय<br>हुद्दा- लिपीक टंकलेखक | आई | Heart Attack | डॉ.मोरे डॉ. कांदळकर | साईबाबा हॉस्पिटल | २११०६.०० | १९७७९.०० | संस्थानच्या औषध भांडारात औषधे उपलब्ध नसलेमुळे बाहेरुन विकत घेतली आहे. |
| | | | | | **एकूण** | **२११०६.००** | **१९७७९.००** | |
| | **ब – संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते** | | | | | | | |
| २ | श्री.सुभाष मल्हारी बंदावणे<br>विभाग-ध्वनिक्षेपण<br>हुद्दा-विद्युत पर्यवेक्षक | मुला | Kidney Transpalnts | डॉ.देसाई | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | २८७६८.०० | २८७६८.०० | |
| | | | | | **एकुण** | **२८७६८.००** | **२८७६८.००** | |
| | **क-संस्थानचे मान्य यादीत रेफर केले होते परंतु उपचार न झाल्यामुळे खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतले.** | | | | | | | |
| ३ | श्री.योगेश त्रिंबक साळवी<br>विभाग-लेखाशाखा<br>हुद्दा –मदतनीस | स्वंतः | Ca | डॉ.खांदे | क्युरी मानवता कॅन्सर हॉस्पिटल, नाशिक | २४०७७.०० | १९२६२.०० | |
| | | | | | **एकुण** | **२४०७७.००** | **१९२६२.००** | |
| | **ड-संस्थानचे मान्य यादीत नसलेले व रेफर न केलेले परंतु रुगणाचे वास्तव्य बाहेरगांवी असलेले.** | | | | | | | |
| ४ | श्री.धिरज दिलीप जवंजाळ<br>विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल,<br>हुद्दा –फार्मासिस्ट | आई | Diabetes & Uretric calculus | डॉ.राणे | राणे हॉस्पिटल, अकलुज | ८७८३.०० | ६३५४.०० | |
| | | | | | **एकुण** | **८७८३.००** | **६३५४.००** | |
| | | | | | **अ + ब+ क+ड एकूण** | **८२७३४/-** | **७४१६३/-** | |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान-** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.७४१६३/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन काही औषधे औषध भांडार विभागात उपलब्ध नव्हती तसेच रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार

घेतले. तसेच सदर ठिकाणी फोनद्वारे चौकशी करुन उपचार घेतलेले खात्री करुन घेतली व सदर पडताळणी करुन घेतले. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही.

तरी वरील प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील अ व ब या दोन्ही प्रस्तावामध्ये नमुद कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून त्यांची सत्यता पडताळून पाहीलेली असल्यामुळे उपरोक्त तक्त्यामधील कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कमत्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३३** **सन २०१५-१६ मधील (Annual Rate Contract) वार्षिक खरेदीमधील मंजूरदराने औषधे, सर्जिकल व लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>अधिनियम २००४ मधील तरतूद:- १७ (२) ण</u>**

**<u>व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-</u>** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०/०१/२०१५ निर्णय क्रमांक २६ Clause No.9 अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठयापैकी रु.२५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची अतिरीक्त मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी/ माहितीस्तव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**<u>प्रास्ताविक:-</u>** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य खरेदीकामी सन २०१५-१६ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजुर दराने दि.२८/०७/२०१५ रोजी एकुण रक्कम रु.१६,७५,७२,९४७.४४ इतक्या रक्कमेचे आणि दि.१३/११/२०१५ रोजी रु.१६,३६,५५,५०८.२७ इतक्या रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे. त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे पुरवठाधारकांकडून मालाचा पुरवठा चालु आहे, तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादींचा औषधांचा भांडारात साठा शिल्लक नाही, सदर साठयाची वार्षिक मागणी पुर्ण झालेली आहे. तथापि सदरहू औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य हे दैनंदिन वापरासाठी आवश्यक असल्यामुळे तेंव्हा गरज पाहता काही औषधे / सर्जिकल साहित्य मंजुर दराने खरेदी करण्यात येत आहेत, तसेच काही औषधे खरेदी करण्यात आलेली आहेत, तर काही औषधे खरेदीचा प्रस्ताव आहे. सदर औषधे/ सर्जिकल साहित्य हे आपण जर मंजुर दराव्यतिरीक्त खरेदी केले तर त्यासाठी जास्त खर्च येऊन त्यात संस्थानचे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदर मटेरीयल हे मंजुर दरानेच खरेदीचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच बऱ्याच ठिकाणी मागील खप पाहता तसेच पुढील वार्षिक खरेदीचा कालावधी बघता वार्षिक मंजुर नग संख्या व्यतिरीक्त जास्त नग संख्याची मागणी करण्यात आलेली आहे.

सध्या डेंग्यु, चिकनगुण्या, गोचिड ताप, रक्त पेशीचे कमी-जास्त प्रमाण, थंडी-तापाचे संसर्गजन्य आजारामुळे शिर्डी व परिसरात जास्त प्रमाणात थैमान घातल्यामुळे प्रयोगशाळा विभागातील लॅब केमीकल्स व किट तसेच ॲन्टीबायोटीक इंजेक्शन तथा वेदनाशामक गोळयांची मागणी पाहता ती वार्षिक मागणीपेक्षा फारच जास्त प्रमाणात असून त्यामुळे दैनंदिन वापरातील औषधांवर त्याचा परिणाम होऊन त्यांचा तुटवडा भासत आहे. तेंव्हा वार्षिक खरेदीमधील मंजुर दराने प्रस्ताव ठेवण्यात येऊन मंजुरी मिळण्यापुर्वीच दैनंदिन वाढत्या पेशंटची गैरसोय होऊ नये म्हणून आधीच काही औषधे / लॅब केमीकल्स/ किट मागवून घेण्यात येत आहे. अपघात विभागातील दैनंदिन ३०-३५ पेशन्टची ओ.पी.डी. आज २०० ते २५० पेशन्ट दररोज येत आहेत. त्यामुळे पाच ते सहा पटीने दैनंदिन रुग्णांचे संख्येत वाढ होत आहे.

तसेच आपले संस्थानचे रुग्णालयांमार्फत येवला, मनमाड व श्री गंगागिरी महाराज यांच्या सप्ताहानिमित्ताने तांदुळनेर येथे कॅम्प व्दारे प्रथमोपचार करुन मोफत औषध वाटप करण्यात आलेले आहे आणि यापुढे सुध्दा अशाप्रकारचे कॅम्प आयोजित करण्यात येणार आहे. सदर कॅम्पसाठी मोफत औषध

वाटप करताना त्यासाठी लागणारे औषधे ही आपले मध्यवर्ती औषध भांडारातील साठयामधून दिले जातात. त्यामुळे वार्षिक खरेदीतील मंजुर औषधांची संख्या कमी पडते, त्यामुळे त्यासाठी सुध्दा मंजुर दराने जास्तीच्या खरेदीचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

सन २०१६-१७ या वर्षाकरीता लागणारे औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादी खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.४८,४१,००,१८३/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव दि.१०/०५/२०१६ रोजी मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला असून सदर प्रस्तावास मा.व्यवस्थापन समिती सभेची मान्यता मिळून त्याकामीची खरेदीबाबत पुढील कार्यवाही पुर्ण होऊन औषधे प्राप्त होण्यास कमीत कमी ३-४ महिन्यांचा कालावधी लागणार आहे, त्यामुळे रुग्णांना उपचारासाठी लागणाऱ्या औषधांची गैरसोय होऊ नये म्हणून सोबतच्या यादीतील औषधे सन २०१५-१६ या वर्षातील मंजुर दराने खरेदी करुन देता येतील व याकामी मंजुर दराने रक्कम रु.१,१८,९८,८३७/- (अक्षरी रु.एक कोटी अठरा लाख अठठयान्नव हजार आठशे सदोतीस मात्र) इतका खर्च येणार आहे.

दि.३०/०१/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.२६ अन्वये वार्षिक औषधे खरेदीमधील औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.५५,७३,३६,३९२/- चे खर्चास मान्यता मिळालेली असून त्यास मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाची सिव्हील अप्लीकेशन नंबर ३४९५ दि.१३/०३/२०१५ अन्वये ई-निविदा मागवून खरेदीस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.२८/०७/२०१५ व दि.१३/११/२०१५ अन्वये एकुण रक्कम रु.३३,१२,२८,४५५.७१ इतक्या रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले असून त्यान्वये आजपर्यंत रु.१९,०९,८९,०३९/- इतक्या रक्कमेचे औषधे / सर्जिकल साहित्य खरेदी करण्यात आलेले आहेत, म्हणजेच मंजुर रक्कम रु.५५,७३,३६,३९२/- पैकी रु.३६,६३,४७,३५३/- इतकी रक्कम शिल्लक आहे, त्यामुळे आपणास अतिरीक्त खरेदी ही शिल्लक रक्कमेतुन करता येणार आहे.

वार्षिक खरेदीमधील काही औषधे ही वार्षिक मागणीपेक्षा कमी लागतात तर काही औषधे ही मुळ मागणीपेक्षा जास्त लागतात, अशी औषधे मंजुर दराने (Annual Rate Contract) खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. सन २०१५-१६ या वार्षिक खरेदीमध्ये रक्कम रु.३३,१२,२८,४५५.७१ इतक्या मंजुर रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले असून त्यानुसार वार्षिक मंजुर दराने आतापर्यंत रु.७१,८५,३०२/- इतक्या रक्कमेचे अतिरीक्त औषधे खरेदी करण्यात येत आहेत.

**<u>मागणी –</u>** सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे.

**<u>संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-</u>** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-</u>** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्ण दाखल होत असतात. सदर योजनेअंतर्गत होणा-या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्ण पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यापासून १ वर्षासाठी औषधे मोफत दयावी लागतात, त्यामुळे औषधांचा खप हा कधी कधी अचानक वाढतो. राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांना दिलेल्या औषधांचा परतावा शासनाकडून संस्थानला मिळत असतो. त्यामुळे जशी जशी लागतील तशी तशी औषधे वार्षिक मंजुर दराने खरेदी करण्यात येतील. कारण एकाच वेळेस खरेदी करुन ठेवल्यास ती मुदतबाहय होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे संस्थानचे मोठे अर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते.

तसेच सन २०१६-१७ या वर्षाच्या पुढील वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादी खरेदीकामी बराच कालावधी लागणार आहे, त्यामुळे रुग्णांना उपचारासाठी लागणा-या औषधांची गैरसोय होऊ नये तसेच डेंग्यु सारखे संसर्गजन्य आजार व संस्थान रुग्णालयामार्फत आयोजित कॅम्पव्दारे लागणा-या औषधे खरेदीकामी सोबतच्या यादीतील औषधे सन २०१५-१६ या वर्षातील मंजुर दराने खरेदी करुन देता येतील. तसेच रुग्णालयात काही औषधांची तातडीने आवश्यकता असल्यामुळे मंजुर दराने आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात येत आहेत.

सन २०१६-१७ या वर्षाकरीता वार्षिक अंदाजपत्रकीय तरतुद ही औषधे/ सर्जिकल साहित्य व On Cosignment Basis Item करिता एकुण रक्कम रु.६०,००,००,०००/- (अक्षरी रु. साठ कोटी मात्र) असून त्यापैकी रक्कम रु.३५,००,००,०००/- (अक्षरी रु.पस्तीस कोटी मात्र) औषधे / सर्जिकल साहित्यांकरिता असून दि.३१/१०/२०१६ अखेर रक्कम रु.३०,४१,०६,६५४/- (अक्षरी रु. तीस कोटी एकेचाळीस लाख सहा हजार सहाशे चौपन्न मात्र) इतकी औषधांची अंदाजपत्रकीय तरतुद शिल्लक आहे. तसेच उपरोक्त खरेदीतील औषधांच्या किंमती हया बाजारभावापेक्षा कमी आहे याची खात्री करुनच खरेदी करण्यात येत आहे. तसेच सोबतच्या तक्त्यात नमुद केलेल्या औषधांची सध्या तातडीने आवश्यकता आहे, कारण सध्या संसर्गजन्य आजारांमुळे रुग्णांची संख्या खुपच वाढलेली आहे, तसेच राजीव गांधी रुग्णांना मोफत औषधे देणेकामी सध्या औषधे अपुरे पडत आहे.

तरी सोबतच्या तक्त्यातील औषधे/ सर्जिकल/ लॅबोरॅटरी साहित्य मंजुर दराने खरेदी करणेस व याकामी येणा-या पुर्णांकित रक्कम रु.१,१८,९८,८३७/- (अक्षरी रु.एक कोटी अठरा लाख अठठयान्नव हजार आठशे सदोतीस मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेस तसेच सदरचा प्रस्ताव नोंद घेणेकामी सविनय सादर.

**निर्णय क्र.९३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, तातडीची आवश्यकता म्हणून प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे औषधे/ सर्जिकल/ लॅबोरॅटरी साहत्य मागील मंजुर दराने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.१,१८,९८,८३७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**याचवेळी अशीही चर्चा करणेत आली की, पुढील वर्षासाठी वार्षिक औषधे, उत्पादक कंपन्यांकडूनच खरेदी करणेत यावी. त्यासाठी कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, वैद्यकिय संचालक यांनी १० नामांकित कंपन्यांची निवड करुन त्यांचेमध्येच ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३४** **श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटरकरीता Kerrison Punch खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाने दि.२६/०९/२०१६ रोजीचे मागणीपत्रान्वये Kerrison Punch Size No.2,3,5 प्रत्येकी २ नगांची मागणी केलेली आहे. सध्या वापरत असलेले Kerrison Punch हे सन २००७ मध्ये खरेदी करण्यात आले होते. सदरहू Kerrison Punch हे जुने झाल्यामुळे वापरुन खराब झालेले असून त्याचा Sharpness पुर्णपणे नाहीसा झालेला आहे. सदरचे Kerrison Punch हे मेंदुच्या व मणक्याच्या शस्त्रक्रिया करणेसाठी आवश्यक असतात. त्यामुळे त्यांनी नविन Kerrison Punch तातडीने मिळणेकामी मागणी केलेली आहे.

उपरोक्त प्रत्येकी दोन नग Kerrison Punch खरेदीकामी दुरुध्वनीवरुन ३ पुरवठाधारकांकडून दरपत्रक मागविण्यात आलेले आहे. त्यानुसार प्राप्त दरपत्रकांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| S. N. | Name of Item | Qty. | Kalelker Surgical Industries, Mumbai | | | **Dolphin Surgicals, Thane** | | Purnima Surgical Enterprises, Nashik | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Make/ Code | Rate in Rs. | Total in Rs. | **Rate in Rs.** | **Total in Rs.** | Rate Per in Rs. | Total in Rs. |
| 1 | Kerrison Punch No.2 | 2 | 22.J523.18 | 6918.00 | 13836.00 | **5277.75** | **11555.50** | 14375.00 | 28750.00 |
| 2 | Kerrison Punch No.3 | 2 | 22.J533.20 | 7179.00 | 14358.00 | **5277.75** | **11555.50** | 14375.00 | 28750.00 |
| 3 | Kerrison Punch No.5 | 2 | 22.J553.20 | 7179.00 | 14358.00 | **5277.75** | **11555.50** | 14375.00 | 28750.00 |
| | | | | Total - | 42552.00 | **Total -** | **34666.50** | Total - | 86250.00 |
| | | | | | | **Warranty** | **1 Year** | | |

उपरोक्त प्राप्त दरांचे तक्यात Kerrison Punch Size No.2,3,5 करीता M/s. Dolphin Surgicals, Thane यांचे दर निम्नत्तम येत आहेत. त्यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु.३४,६६७/- (अक्षरी रु.चौतीस हजार सहाशे सद्सुष्ट मात्र) इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Kerrison Punch Size No.2,3,5 प्रत्येकी दोन नग खरेदीकामी विहित पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे पुर्णांकित रक्कम रु.३४,६६७/- (अक्षरी रु.चौतीस हजार सहाशे सद्सुष्ट मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Kerrison Punch Size No.2,3,5 प्रत्येकी ०२ नग खरेदी करणेकामी विहित पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३४,६६७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३५** **सोनोग्राफि व कलर डॉपलर तपासण्यांवर इन्सेंन्टीव्ह दर वाढीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रेडीओलॉजी विभागात नियोजित कर्मचारी आकृतीबंधाप्रमाणे दोन सिनियर रेडीरओलॉजिस्ट व दोन ज्यु.रेडीओलॉजिस्ट अशी नियोजित पदे आहे. पैकी १ सिनीयर रेडीरओलॉजिस्ट पद भरले आहे व उर्वरीत ३ पदे रिक्त आहेत. ज्यु. रेडीरओलॉजिस्ट सोनोग्राफि व कलर डॉपलर या तपासण्या करतात व त्यांना एकुण बिल रक्कम २०% रक्कम मासिक वेतनाव्यतिरीक्त इन्सेन्टीव्ह म्हणुन देण्यात येते. ही रक्कम तुलनात्मक दृष्टया कमी असल्याने ज्यु. रेडीरओलॉजिस्ट सोडुन जातात, हे प्रमाण त्यामानाने मोठे आहे.

ज्यु. रेडीरओलॉजिस्ट नसल्याने श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये असलेले सोनोग्राफि तपासण्या बंद आहेत. हॉस्पिटलमध्ये राजीवगांधी योजना कार्यरत आहे. या योजनेअंतर्गत रुग्णांच्या सर्व तपासण्या करणे बंधनकारक आहे. श्री साईनाथ रुग्णालयामधील सोनोग्राफि मशिन सुध्दा रेडीरओलॉजिस्ट अभावी बंद आहे व त्यामुळे रुग्णालयात सोनोग्राफि व कलर डॉपलर तपासण्या होत नाहीत व रुग्णांची सोय होण्याच्या दृष्टीने तातडीची बाब डॉ.तृप्ती बाळासाहेब भिसे यांची व्हिजीटींग पध्दतीने तात्पुर्त्या स्वरुपात ज्यु. रेडीरओलॉजिस्ट म्हणुन दि.२७.०७.२०१६ रोजी मा.कार्यकारी अधिकारी यांचेमान्यतेने नियुक्ती करण्यात आली असुन मासिक वेतन नसल्याने सोनोग्राफि व कलर डॉपलर तपासण्यांवर रु.२५०/- व रु.५५०/- इतका इन्सेन्टीव्ह देण्यास मान्यता मिळाली आहे.

हॉस्पिटलमध्ये सोनोग्राफि दर रु.३५०/- व कलर डॉपलर दर १,१००/- असे दर आकारले जातात. ज्यु. रेडीरओलॉजिस्ट यांना मासिक वेतना व्यतिरीक्त प्रत्येकी रु.७०/- व रु.२२०/- अशी देण्यात येत आहे. सदर ज्यु. रेडीरओलॉजिस्ट यांची तातडीने तात्पुर्त्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येऊन त्यांना मासिक वेतन नसल्याने व्हिजीटींग पध्दतीने त्यांना रु.२५०/- व रु.५५०/- इन्सेंन्टीव्ह देण्याचे मान्य केले आहे. साधारणतः दर महा एक लाखापर्यंत रक्कम त्यांना मिळेल. माहे ऑगस्ट २०१६ मध्ये केलेल्या तपासण्यांवर त्यांना या सुधारीत दराने रु.९३,४००/- इतकी रक्कम इन्सेन्टीव्ह म्हणुन देय होत आहे.

ज्यु. रेडीओलॉजिस्ट यांची नियुक्ती झाल्याने हॉस्पिटलमधिल सोनोग्राफि तपासणी चालु झाली आहे. मासिक वेतन नसल्याने वाढीव इन्सेन्टीव्ह दराने होणारी रक्कम ही साधारणतः पुर्वीइतकी होत आहे तरी विहित

पध्दतीने ज्यु.रेडीओलॉजिस्ट नियुक्ती होईपर्यंत व्हिजीटिंग पध्दतीने नेमलेल्या ज्यु.रेडीओलॉजिस्ट यांना मासिक वेतन नसल्याने सोनोग्राफि व कलर डॉपलर तपासण्यांवर रु.२५०/- व ५५०/- या दराने इन्सेन्टीव्ह अदा करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे नोंद घेणेसाठी सादर.

**निर्णय क्र.९३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, विहित पध्दतीने ज्यु.रेडीओलॉजिस्टची नियुक्ती होईपर्यंत रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता व्हिजीटिंग पध्दतीने नेमलेल्या ज्यु.रेडीओलॉजिस्ट यांना मासिक वेतन नसल्याने सोनोग्राफि व कलर डॉपलर तपासण्यांवर अनुक्रमे रु.२५०/- व ५५०/- या दराने इन्सेन्टीव्ह अदा करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३६** **डॉ.बाळकृष्ण ईश्वरलाल मांगुकिया, आरएमओ यांची संस्थान सेवा संपुष्टात (टर्मिनेशन) आणणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि. २०/०८/२०१५ रोजी मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णयानुसार डॉ. बाळकृष्ण ईश्वरलाल मांगुकिया यांची आरएमओ या पदावर १ वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी जा.नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ १४५९/ २०१५ दि. २६/०८/२०१५ अन्वये नेमणूक करणेत आली होती त्यानुसार ते दि. १९/०९/२०१५ रोजी कामावर हजर झाले होते.

तदनंतर डॉ.मांगुकिया हे दि. ०१/०१/२०१६ ते दि. ०३/०१/२०१६ अखेर ०३ दिवस विनापरवानगी गैरहजर तसेच दि. २५/०१/२०१६ पासून कामावरुन विनापरवानगी गैरहजर असल्याने त्यांना जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/ ३७५/ २०१६ दि.२७/०४/२०१६ अन्वये गैरहजेरीबाबतचा लेखी खुलासा सादर करावा अन्यथा शिस्तभंगाची कार्यवाही करणेत येईल, असे कळविणेत आले होते. सदरचे पत्र डॉ. मांगुकिया यांना प्राप्त होऊनही ते कामावर हजर झाले नाहीत अथवा त्यांनी कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार इकडील कार्यालयाशी केलेला नाही.

तदनंतर, पुन्हा त्यांना जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/ २०४२/ २०१६ दि.२७/०७/२०१६ अन्वये गैरहजेरीबाबतचा लेखी खुलासा सादर करावा अन्यथा शिस्तभंगाची कार्यवाही करणेत येईल असे कळविणेत आले होते. सदरचे पत्र डॉ. मांगुकिया यांना प्राप्त होऊनही त्यांनी त्यानंतर कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नाही.

डॉ.मांगुकिया यांची नेमणूक १ वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी करण्यात आलेली आहे. त्यांचा परिविक्षाधिन कालावधी दि. १८/०९/२०१६ अखेर संपुष्टात आलेला आहे. डॉ. मांगुकिया यांना उपरोक्त प्रमाणे दोन वेळेस कळवुनही ते अद्यापपर्यंत कामावर हजर झालेले नाहीत. यावरुन त्यांना संस्थान सेवेत स्वारस्य नसल्याचे दिसून येते.

मा. विश्वस्त - श्री. वाकचौरे साहेब, श्री. भोसले साहेब, श्री. तांबे साहेब यांनी दि ०७/११/२०१६ रोजी श्री साईबाबा रुग्णालयात भेट देऊन तेथील वैद्यकीय अधिका-यांचे हजेरी रजिस्टर तपासले व त्यांनी त्यावर "डॉ. बाळकृष्ण ईश्वरलाल मांगुकिया एक वर्षापासून गैरहजर आहेत नियंत्रण अधिकारी यांनी काय कार्यवाही केली? खर तर संबंधित डॉक्टर यांना सेवेतुन तात्काळ कमी करावयास पाहिजे होते व त्यांचे जागी नवीन डॉक्टर नेमणुक करावयास पाहिजे होते. याबाबत भविष्यात असे घडणार नाही ह्यासाठी कार्यवाही करण्यात यावी" असे निर्देश दिलेले आहेत.

डॉ.बाळकृष्ण ईश्वरलाल मांगुकिया, आरएमओ हे त्यांच्या एक वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीमध्ये विनापरवानगी गैरहजर असल्याने त्यांचेशी याबाबत दोन वेळा पत्रव्यवहार करुनही त्यांनी कुठलाही प्रतिसाद न दिल्याने त्यांना संस्थान सेवेत स्वारस्य नसल्याचे दिसते. सबब, डॉ.मांगुकिया यांची संस्थान सेवा संपुष्टात (टर्मिनेशन) आणणेस व त्यांना तसे कळविणेकामी निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.९४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.बाळकृष्ण ईश्वरलाल मांगुकिया, आरएमओ हे परिविक्षाधीन कालावधीमध्ये विनापरवानगी गैरहजर आहेत व त्यांचेबरोबर पत्रव्यवहार करुनही ते प्रतिसाद देत नाही, यामुळे त्यांना संस्थान सेवेत स्वारस्य नसल्याचे दिसून येते. सबब, डॉ.बाळकृष्ण ईश्वरलाल मांगुकिया, आरएमओ यांची संस्थान सेवा संपुष्टात (टर्मिनेशन) आणणेत यावी. तसेच याबाबत त्यांना लेखी स्वरुपात कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३७** **ऑक्झीलरी नर्स हे पदनाम आकृतीबंधामध्ये समाविष्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयातील नर्स पदासाठी दि. ०८/११/१९८३ रोजी मुलाखती घेणेत आल्या होत्या सदर मुलाखतीतुन करुणा बबन गवई, एसएससी अनुत्तीर्ण, एएनएम-८२ (जन्मतारीख - ०२/०४/१९५९) यांची निवड करणेत आल्याने त्यांची जा.नं.एसएसएस/वशी०१/१२०६८/८३ दि. २५/१२/१९८३ अन्वये श्री साईनाथ रुग्णालयात परिचारिका म्हणून ६ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक करणेत आली होती त्यानुसार दि. ०२/०२/१९८४ रोजी कामावर हजर झालेल्या आहेत. तदनंतर त्यांचे नियत वेतनात वेळोवेळी वाढ करुन जा.नं.एसएसएस/वशी०१/३३९०/८६ दि. १०/०३/१९८६ अन्वये त्यांना वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. त्यानंतर त्यांना संस्थान नियमानुसार वार्षिक वेतनवाढी तसेच सेवेत १२ व २४ वर्ष पूर्ण झाल्यामुळे वरिष्ठ वेतनश्रेणी लागु करणेत आलेली आहे.

महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग निर्णय क्र. सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मंत्रालय, मुंबई दि. ०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा संस्थानचा आकृतीबंध मंजूर झालेला आहे. सदर आकृतीबंधात ऑक्झीलरी हे पदनाम सामाविष्ट नाही तथापि सदर पदावर आरक्षण कायदा लागू होण्यापूर्वीच एका कर्मचा-याची नेमणूक करण्यात आलेली आहे.

संस्थानसाठी आरक्षण कायदा लागू झाल्याने संस्थानचे अधिकारी / कर्मचा-यांची संवर्गनिहाय बिंदूनामावलीचे प्रारुप तयार करण्याचे काम मागासवर्ग कक्षामार्फत चालू असुन सदरची बिंदुनामावली मा. सहा. आयुक्त, मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेकडून करुन घ्यावयाची आहे.

मंजूर आकृतीबंधात ऑक्झीलरी नर्स हे पदनाम मंजूर नसल्याने परंतु सदरचे पद प्रत्यक्षात रुग्णालयाचे आस्थापनेवर भरलेले असल्याने मा. सहा. आयुक्त, मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेकडून बिंदूनामावली तपासणी करताना आकृतीबंधात सदर पदाच्यामंजूरीची आवश्यकता आहे.

सदर पद मंजूरीबाबत महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत श्री. त्र्यं.अ.खैरे, संस्थान आस्थापनाविषयक सल्लागार यांनी दि. २३/०९/२०१६ रोजी सुचना केलेल्या आहेत.

तथापि, श्रीमती करुणा बबन गवई ह्या संस्थानसाठी आरक्षण कायदा लागु होण्याच्या अगोदरच रुजू झालेल्या आहेत.

सबब, आता श्री. त्र्यं.अ.खैरे, संस्थान आस्थापनाविषयक सल्लागार यांचे सुचनेनुसार बिंदूनामावलीचे काम पूर्ण करणेसाठी ऑकझीलरी नर्स हे पदनाम श्री साईबाबा संस्थानचे आकृतीबंधात समाविष्ट करणेचा प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मंजुरीसाठी पाठविता येईल, त्यास मान्यता असावी.

मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.९४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. त्र्यं.अ.खैरे, संस्थान आस्थापनाविषयक सल्लागार यांचे सुचनेनुसार बिंदूनामावलीचे काम पूर्ण करणेसाठी ऑकझीलरी नर्स हे पदनाम श्री साईबाबा संस्थानचे आकृतीबंधात समाविष्ट करणेचा प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मंजुरीसाठी पाठविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३८** **श्री साईबाबा हॉस्पिटलचे आकृतीबंधामध्ये परफ्युजनिस्टचे आणखी एका पदाचा समावेश करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे मंजूर आकृतीबंधात परफ्युजनिस्टचे एक पद वाढविणेबाबतचा प्रस्ताव दि. १५/०९/२०१२ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र. ७५० खालीलप्रमाणे झाला आहे.

"श्री साईबाबा रुग्णालयाचे आकृतीबंधामध्ये परफ्युजनिस्ट या पदाचा समावेश करणेकामी शासनास प्रस्ताव सादर करणेत यावा."

उपरोक्त निर्णयास अनुसरुन, संस्थानकडून जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/२५१/२०१३ दि. १६/०४/२०१३ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यानुसार विधी व न्याय विभाग यांनी सासंवि-२०१४/ ८०/प्र.क्र.२५/का१६ दि. ०४/०८/२०१४ पत्रान्वये "सदर पद निर्मीतीमुळे श्री साईबाबा संस्थानास किती आर्थिक भार पडणार आहे व मा. उच्च न्यायालयाने सिव्हील ॲप्लीकेशन नं. १२०५६/२०१२ मधील दि. १६/१०/२०१२ रोजी दिलेल्या निर्देशानुसार सदर प्रस्तावास मान्यता देणे योग्य होईल किंवा कसे?" या बाबत शासनाने स्पष्टीकरण मागितले होते. सदर स्पष्टीकरण इकडील जा.नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर१८३०/ २०१४ दि. ०५/०८/२०१४ अन्वये सादर करण्यात आले होते. तदनंतर विधी व न्याय विभाग यांचेकडील सासंवि-२०१४/८०/प्र.क्र.२५/का.१६ दि.२५/०९/२०१४ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविण्यात आले आहे.

"श्री साईबाबा हॉस्पिटलच्या आस्थापनेवरील आकृतीबंधात परफ्युजनिस्टचे एक पद नव्याने समाविष्ट करण्यास मा. उच्च न्यायालयाने सिव्हील ॲप्लीकेशन नं. १२०५६/२०१२ मध्ये दि. १६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाची रितसर पूर्वमान्यता घेण्याच्या अटीवर शासनाची मान्यता देण्यात येत आहे".

उपरोक्त मान्यतेनुसार सदरचा विषय दि. ०८/०९/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्यीय समिती सभेसमोर सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. ३०६ खालीलप्रमाणे झाला आहे.

"श्री साईबाबा हॉस्पिटलच्या आकृतीबंधामध्ये परफ्युजनिस्टचे आणखी एका पदाचा समावेश करणेकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले."

तदनंतर विधी विभागाने मा. उच्च न्यायालयातील संस्थानचे काम करणारे वकील श्री. संजय चौकीदार यांचेमार्फत सिव्हील ॲप्लिकेशन नं १२४५९/२०१६ दाखल करणेत आले.

त्यानंतर शासनाकडून दि. २८/०७/२०१६ रोजीच्या आदेशाने संस्थानचा कारभार पाहणेसाठी नव्याने व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नियुक्ती केल्याने यापुर्वी मा उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी दाखल केलेले ३३ सिव्हील अज मागे घेणेबाबत विधी विभागाकडून खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आला.

मा.उच्च न्यायालयाने, जनहित याचीका क्र १८/२०११ मध्ये दि. १३/०३/२०१२ रोजीचे आदेशाने संस्थानचा कारभार पहाणेकामी मा त्रिसदस्य समितीची नियुक्ती केली होती जनहित याचीका क्र १८/२०११ मधील दि. १३/३/२०१२ व सिव्हील अर्ज क्र १२०५६/२०१२ मधील दि. १६/१०/२०१२ आदेशाने shall not take any major financial decision of whatsoever nature असे निर्देश दिलेले आहेत. प्रस्तुतचे निर्देशास अनुसरून व मा. त्रिसदस्य समितीने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार खर्चास/ कामास मा उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी 33 सिव्हील अर्ज संस्थान वकीलामार्फत मा उच्च न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत. सदरचे 33 सिव्हील अर्ज मा उच्च न्यायालयात पेंडींग आहेत.

शासनाने दि. २८/०७/२०१६ रोजीचे आदेशाने संस्थानचा कारभार पहाणेसाठी नव्याने मा व्यवस्थापन समितीचे सदस्यांची नियुक्ती केली आहे आता मा उच्च न्यायालयाने दि. १३/०३/२०१२ रोजीच्या आदेशाने गठीत केलेली मा त्रिसदस्य समिती संपुष्टात आलेले असल्याने, मा उच्च न्यायालयात खर्चास/ कामास परवानगी मिळणेकामी दाखल केलेले, परंतु मा कोर्टात पेंडींग  असलेले 33 सिव्हील अर्ज मा उच्च न्यायालयातून मागे घेऊन सदरचे विषयसंबंधीत विभागामार्फत पुन्हा मा व्यवस्थापन समितीचे सभेपुढे फेरसादर करून मा व्यवस्थापन समितीचा त्यावर निर्णय घेऊन निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करता येईल. तरी ३३ सिव्हील अर्ज  मा. उच्च न्यायालयातून मागे घेणेबाबतचे निर्णयार्थ सादर.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय क्र ५६६ खालीलप्रमाणे झाला आहे.

"तत्कालीन त्रीसदस्य समितीमध्ये वेळोवेळी झालेल्या निर्णयानुसार मा उच्च न्यायालयाचे परवानगीसाठी दाखल केलेले 33 सिव्हील अर्ज मागे (Withdrawn) घेण्यासा मान्यता देण्यात आली."

उपरोक्त निर्णयानुसार नमुद ३३ सिव्हील अर्जामध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलचे आकृतीबंधामध्ये परफ्युजनिस्टच्या आणखी एका पदाचा समावेश करणेबाबतचा विषय असल्याने प्रशासकीय अधिकारी, रुग्णालये यांनी जा. नं. एसएसएस/वशी-प्रअ/२१७०/२०१६ दि. ०९/०९/२०१६ चे पत्रान्वये व प्र. विधी अधिकारी यांनी जा.नं.एसएसएस/ वशी-विधी/१७४२/२०१६ दि. १६/०९/२०१६ चे पत्रान्वये मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी दाखल केलेले सिव्हील अर्ज मागे घेण्यात आलेले असल्याने सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे तातडीने सादर करणेची कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.

तरी, विधी व न्याय विभाग यांनी सासंवि-२०१४/८०/प्र.क्र.२५/का.१६ दि. २५/०९/२०१४ चे पत्रान्वये श्री साईबाबा हॉस्पिटलच्या आस्थापनेवरील आकृतीबंधात परफ्युजनिस्टचे एक पद नव्याने समाविष्ट करण्यास मा. उच्च न्यायालयाची रितसर पूर्वमान्यता घेण्याच्या अटीवर शासनाची मान्यता देण्यात येत आहे, असे कळविलेल्या आदेशावर उपरोक्त निर्णय क्र ५६६ ला अनुसरून आता पुन्हा मंजुरीसाठी मा. उच्च न्यायालयात जाण्याची आवश्यकता नाही, असे नम्र मत आहे.

सबब, श्री साईबाबा हॉस्पिटलच्या आस्थापनेवरील आकृतीबंधात परफ्युजनिस्टचे आणखी एक पद नव्याने समाविष्ट करण्यास शासनाने मान्यता दिलेली असल्याने त्याची नोंद घेणेस मान्यता असावी.

मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.९४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३९** **Leica Microsystems, Germany यांचेकडून Semi Automatic Rotary Microtome खरेदीकामी Custome Duty मध्ये सुट मिळणेसाठी कस्टम कार्यालयास अर्ज करणेस व संस्थान धर्मादाय असून पुरविण्यात येणाऱ्या सेवा मोफत/ ना नफा ना तोटा तत्वावर चालविणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.२३/०७/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र. २०४ (८) अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरिता १ नग Semi Automatic Rotary Microtome हे M/s. Leica Microsystems, Germany यांचेकडून ७९०० इतक्या Euro मध्ये खरेदीस मान्यता मिळालेली आहे, तसेच दि.०५/०५/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र. १४४ (१९) अन्वये श्री साईनाथ रुग्णालयातील हिस्टोपॅथ विभागाकरीता ०१ नग  Semi Automatic Rotary Microtome श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरिता खरेदी करण्यात येत असलेल्या मशिनचे मंजूर दराने खरेदी करणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार M/s. Leica Microsystems, Germany यांना इकडील पत्र क्र.२११६ दि.०४/११/२०१५ अन्वये ०२ नग Semi Automatic Rotary Microtome करीता १५८०० इतक्या Euro चा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

M/s. Leica Microsystems, Germany यांचे नावाने L/C No.1781031 उघडण्यात आलेली असून त्यांचे Custome Duty मध्ये सूट मिळणेकामी Custom Office सोबत पत्रव्यवहार चालु आहे. तथापि नाशिक येथील Custom Office यांनी दि.१९/०९/२०१६ रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग यांचेकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही धर्मादाय संस्था असल्याचे प्रमाणपत्र घेण्यात येऊन सदर प्रमाणपत्र Custom Office ला देण्यात यावे जेणेकरुन संस्थानची Custom Duty माफ करण्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल असे कळविलेले आहे. तथापि यापुर्वी दि.१८/०१/२००७ रोजी जानकी अरुणकुमार,

कमिशनर सेंट्रल एक्साईज अॅन्ड कस्टम, सिमाशुल्क कार्यालय, औरंगाबाद यांचेकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही धर्मादाय संस्था असल्याचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले आहे.

त्यानुसार इकडील पत्र जा.क्र.एसएसएस/ एसएसबीएच/ वशी-स्टोअर (पी/एस)/ १६५०/ २०१६ दि.२२/१०/२०१६ अन्वये महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग, मुंबई यांचेकडे प्रमाणपत्र मिळणेकामी पत्र पाठविण्यात आलेले आहे. त्यानंतर विधी व न्याय विभागातील खेडकर मॅडम यांनी दि.०७/११/२०१६ रोजी दुरुध्वनीवरुन संस्थान मार्फत करण्यात आलेली मागील ३ वर्षाच्या चॅरीटीची माहिती मागविलेली होती ती देखील त्यांना दि.०७/११/२०१६ रोजी ई-मेल व्दारे पाठविलेली आहे.

तथापि महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग, मुंबई यांनी जाक्र.सार्सवि-१०१६/प्र.क्र.१९३/का.१६ दि.११/११/२०१६ रोजीचे पत्रान्वये –

(०१) कस्टम डयुटीमध्ये सुट मिळविण्याकरीता कस्टम कार्यालयास अर्ज करण्याबाबतचा व्यवस्थापन समितीच्या ठरावाची मागणी केलेली आहे.

(०२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही धर्मादाय संस्था असून संस्थेकडून पुरविण्यात येणा-या सेवा मोफत / ना नफा ना तोटा या तत्वावर पुरविण्यात येत असल्याबाबत व्यवस्थापन समितीच्या ठरावाची मागणी केलेली आहे. त्यानुसार साईबाबा संस्थानच्या वार्षिक अहवाल व लेखापरिक्षण अहवालाच्या माहितीवरुन-

रुग्णालयामार्फत शिर्डी येथील वृध्दाश्रमातील रुग्णांना विनामुल्य वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन दिली जाते तसेच महिन्यातून दोन वेळेस वृध्दाश्रमात फिरते वैद्यकिय पथक पाठविले जाते.

वैद्यकिय शिबीरांचे आयोजन-

अहवाल सालात, खाली नमुद केलेप्रमाणे विविध वैद्यकिय शिबिरांचे यशस्वीरित्या आयोजन करणेत आले :

| अ.नं. | शिबिराचे नांव | शिबिर कालावधी | लाभार्थी रुग्ण संख्या |
|---|---|---|---|
| 01 | मोफत मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीर | दि. 05 सप्टेंबर, 2015 | **025** |
| 02 | मोफत मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीर | माहे ऑक्टोबर ते नोव्हेंबर, 2015 | **559** |
| 03 | किडनी स्टोन शिबीर | दि. 09 ते 12, ऑक्टोबर, 2015 | **057** |
| 04 | आयुर्वेदिक पध्दतीने हाडांची ठिसुळतेची यंत्राव्दारे तपासणी शिबीर | दि. 19 नोव्हेंबर, 2015 | **200** |
| 05 | किडनी स्टोन शिबीर | दि. 22 ते 24 जानेवारी, 2016 | **059** |

वरील सर्व शिबीरांमध्ये संस्थानचे वैद्यकीय अधिकारी, तांत्रिक कर्मचारी तसेच बाहेरील तज्ञ मानद डॉक्टर्सकडून आवश्यकतेनुसार सर्व सहाय्य दिले जाते. शिबीरांमध्ये उपचार करण्यात येणाऱ्या रुग्णांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क न आकारता त्यांना संपूर्ण वैद्यकीय सेवा, रहाण्याची व्यवस्था व जेवणाची व्यवस्था विनामूल्य पुरविली जाते.

**वैद्यकीय आर्थिक मदत व धर्मादाय सेवा**

गरीब आणि गरजू रुग्णांना भारतातील धर्मादाय संस्थांनी, निमशासकीय किंवा शासकीय संस्थांनी, सार्वजनिक संस्थांनी, सहकारी संस्थांनी चालविलेल्या रुग्णालयात शस्त्रक्रिया केल्यास / उपचार घेतल्यास एकूण खर्चाच्या 15 टक्के किंवा जास्तीत जास्त रुपये 25,000/- मात्र मदत रुग्णालयाचे नावे डिमांड ड्राफ्टव्दारे पाठविली जाते. खाली नमूद केलेल्या शस्त्रक्रियांसाठी / आजारावरील उपचारांसाठी संस्थान व्यवस्थापनामार्फत वैद्यकिय आर्थिक मदत (वैद्यकिय अनुदान) दिले जाते :

01. हृदयशस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
02. किडनी शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
03. मेंदुची शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
04. रक्तासंबंधीचे उपचार (उदा.हिमोफिलिया)
05. कर्करोग शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
06. मणका शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
07. Guillain Barre Syndrome
08. कॉक्लीअर इम्प्लांट

उपरोक्त आजारांपैकी नेत्ररोगासंबंधीत ज्या शस्त्रक्रिया संस्थानच्या रुग्णालयांमध्ये होऊ शकतात, त्याव्यतिरिक्त इतर नेत्रशस्त्रक्रियांसाठी वैद्यकिय अनुदान उपलब्ध करुन दिले जाते

संस्थानचे वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार रुग्णास गंभीर आजारासाठी फक्त एकदाच अनुदान देण्याची तरतूद आहे, परंतु मा.व्यवस्थापन समितीने गंभीर आजारासाठी रुग्णाने पाच वर्षांने मागणी केल्यास त्यास 05 वर्षानंतर पुन्हा वैद्यकिय अनुदान देणेबाबत निर्णय घेतलेला आहे.

गेल्या 03 अहवाल सालात गरजू रुग्णांना उपलब्ध करुन देणेत आलेल्या वैद्यकिय अनुदान रक्कमेचा व लाभार्थी रुग्णांचा गोषवारा खालीलप्रमाणे :

| अ.नं. | आर्थिक वर्ष | अनुदान लाभार्थी रुग्ण संख्या | अनुदान वाटपाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 01 | सन 2013-2014 | 2572 | 5,45,57,487/- |
| 02 | सन 2014-2015 | 1568 | 3,70,49,331/- |
| 03 | सन 2014-2015 | 0871 | 2,03,05,177/- |

तसेच रुग्णालयामार्फत आर्थिकदृष्टया दुर्बल, गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकिय उपचार बिलांमध्ये सवलती देणेत आलेल्या आहेत. गेल्या 04 अहवाल सालात वैद्यकीय आर्थिक सवलतीचा व लाभार्थी रुग्णांचा गोषवारा खालीलप्रमाणे–

| अ.नं. | आर्थिक वर्ष | अत्यंत गरीब (Indigent) | | कमकुवत (Weaker) | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रुग्ण संख्या | दिलेली सवलत रुपये | रुग्ण संख्या | दिलेली सवलत रुपये | रुग्ण संख्या | दिलेली सवलत रुपये |
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **(3+5)** | **(4+6)** |
| 01 | सन 2013-14 | 434 | 7,04,222 | 4631 | 21,76,640 | 5065 | 28,80,862 |
| 02 | सन 2014-15 | 429 | 3,19,932 | 4692 | 30,90,457 | 5121 | 34,10,389 |
| 03 | सन 2015-16 | 385 | 3,19,271 | 4931 | 35,45,676 | 5316 | 38,64,947 |

**रुग्णालयासाठी औषधे व इतर आवश्यक साहित्य:**

श्री साईनाथ व श्री साईबाबा या दोन्ही रुग्णालयांसाठी रुग्णांच्या रोगनिदान व उपचारांसाठी आवश्यक असलेली औषधे, उपकरणे आदि साहित्य खरेदीसाठी मध्यवर्ती औषध भांडार स्थापन करण्यात आलेले आहे. अहवाल सालात, अंदाजे रु.17.95 कोटी मात्रची औषधे, सर्जिकल इन्स्ट्रूमेंटस व इतर आवश्यक साहित्य आदि उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

तसेच दोन्ही रुग्णालयाकडील रुग्णांचे कपडे व इतर लिनन स्वच्छ करणे, धुणे व इस्त्री करणे यासाठी स्वतंत्र लॉन्ड्रीची व्यवस्था करण्यात आली आहे.

**रुग्णांना वैद्यकिय उपचार बिलातील सवलतीच्या विविध योजना:**

**(अ) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना सवलत:**

बी. पी. टी. ॲक्ट, 1950 व मा. उच्च न्यायालयाची योजना, विविध शासकीय योजना, मा. व्यवस्थापन समितीचे नियमानुसार, दारिद्रय रेषेखालील गरीब, गरजु व दुर्बल घटकातील रुग्णांना वैद्यकिय उपचार बिलात नियमानुसार सवलत देण्यात येत आहे. त्याचा गेल्या 03 वर्षाचा तपशील :

| अ.नं. | अहवाल वर्ष | लाभार्थी रुग्णांची संख्या | आर्थिक सवलत रुपये (कोटी) |
|---|---|---|---|
| 01 | सन 2013-2014 | 25,250 | 7.83 कोटी |
| 02 | सन 2014-2015 | 47,655 | 7.31 कोटी |
| 03 | सन 2015-2016 | 50,282 | 7.00 कोटी |

**परतावा-** तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 28 जुलै, 2007 रोजीचे निर्णयानुसार, रुग्णांना वैद्यकिय अनुदानाचे रक्कमेचा परतावा करणेत येतो. याबाबतची कार्यवाही रुग्णालय विभागांतर्गत असलेल्या जनसंपर्क कार्यालयामार्फत केली जाते. या परताव्याचा तपशील खालील प्रमाणे –

| अ.नं. | सन | जीवनदायी योजनेचे रुग्ण | | इतर रुग्ण | |
|---|---|---|---|---|---|
| | | रुग्ण संख्या | परतावा रु. | रुग्ण संख्या | परतावा रु. |
| 1 | 2013-14 | 41 | 23.62 लक्ष | 03 | 0.76 लक्ष |
| 2 | 2014-15 | 27 | 13.69 लक्ष | 03 | 0.50 लक्ष |
| 3 | 2015-16 | 05 | 03.73 लक्ष | -- | -- |

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात ना नफा ना तोटा तत्वावर वैद्यकिय सेवा पुरविण्यात येत असून त्याकरीता आलेला वार्षिक खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे-

**Year 2013-14**

| Sr. No. | Particulars | Amount | Amount |
|---|---|---|---|
| 1 | Opening Stock of Medicine | 50,690,005.42 | |
| 2 | Add : Purchase of Medicine | 338,363,850.17 | |
| | Add : Expenses of Hospital | 519,539,271.02 | |
| | **Total** | | **908,593,126.61** |
| 3 | Less : Hospital Receipt | 756,316,395.80 | |
| | Less: Closing Stock of Medicine | 30,495,920.98 | 786,812,316.78 |
| | **Deficit** | | **121,780,809.83** |

**Year 2014-15**

| Sr. No. | Particulars | Amount | Amount |
|---|---|---|---|
| 1 | Opening Stock of Medicine | 30,495,920.98 | |
| 2 | Add : Purchase of Medicine | 280,528,860.00 | |
| | Add : Expenses of Hospital | 515,258,241.05 | |
| | **Total** | | 826,283,022.03 |
| 3 | Less: Hospital Receipt | 603,097,172.97 | |
| | Less: Closing Stock of Medicine | 45,503,295.46 | 648,600,468.43 |
| | **Deficit** | | **177,682,553.60** |

**Year 2015-16**

| Sr. No. | Particulars | Amount | Amount |
|---|---|---|---|
| 1 | Opening Stock of Medicine | 45,503,295.46 | |
| 2 | Add : Purchase of Medicine | 180,221,108.66 | |
| | Add : Expenses of Hospital | 567,209,074.53 | |
| | **Total** | | **792,933,478.65** |
| 3 | Less : Hospital Receipt | 505,290,848.98 | |
| | Less : Closing Stock of Medicine | 48,737,292.96 | 554,028,141.94 |
| | **Deficit** | | **238,905,336.71** |

**इतर उपक्रम –**

**(अ) श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, शिर्डी. (आय. टी. आय.)**

शिर्डी व परिसरातील ग्रामीण भागातील विद्यार्थी- विद्यार्थीनींना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण मिळावे व त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा यादृष्टीने संस्थान व्यवस्थापनामार्फत शिर्डी येथे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करणेत आलेले आहे. अहवाल सालात, औद्योगीक प्रशिक्षण संस्थेत प्रगत व प्रचलित तंत्रज्ञानावर आधारीत बारा व्यवसाय असून या व्यवसायांच्या एकूण तेवीस तुकड्या आहेत. तसेच प्रशिक्षण केंद्रामार्फत महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचा शासनमान्य संगणक अभ्यासक्रमाचा (MS-CIT) उपक्रम व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे संगणक प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. या प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षित 33 निदेशकाकडून प्रशिक्षण देण्यात येत आहे.

गेल्या 03 अहवाल वर्षामध्ये या प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या व प्रत्यक्षात झालेल्या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे :

| अ.नं. | तपशील | प्रशिक्षणार्थी संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | अहवाल वर्ष - | सन 2013-14 | सन 2014-15 | सन 2015-16 |
| 01 | व्यवसाय प्रशिक्षणार्थी | 231 | 268 | |
| 02 | संगणक अभ्यासक्रम प्रशिक्षणार्थी | 034 | 029 | |
| | **प्रत्यक्षात झालेला खर्च** | २,९२,७३,४२६.४५ | ३,०१,४६,१४५.७९ | ३,१३,१७,१३७.२९ |
| | **प्रत्यक्षात होणारे अर्थिक नुकसान** | २,५२,९९,४७३.४५ | २,६०,९८,१८२.७९ | २,७२,५४,६४८.२९ |

**ब) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, शिर्डी.**

शिर्डी व शिर्डी परिसरातील ग्रामीण भागातील मुला-मुलींना इंग्रजी माध्यमाचे शिक्षण विनासायास प्राप्त व्हावे म्हणून संस्थान व्यवस्थापनामार्फत इंग्लिश मिडियम स्कूल सुरु करणेत आलेले आहे. या शाळेसाठी शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत वा अनुदान घेतले जात नाही. विद्यार्थ्यांकडूनही शैक्षणिक शुल्क आकारतांना ते आर्थिकदृष्ट्या सर्वसामान्यांना परवडेल, असेच ठेवण्यात आलेले आहे.

या इंग्लिश मिडियम स्कूल मध्ये, ज्युनिअर केजी ते इयत्ता दहावी पर्यंत वर्ग चालविले जातात. गेल्या 03 अहवाल वर्षात या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या व प्रत्यक्षात झालेल्या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे :

| अ.नं. | अहवाल वर्ष | विद्यार्थी संख्या | विद्यार्थिनी संख्या | एकूण संख्या | एस.एस.सी. निकाल | प्रत्यक्षात झालेला खर्च | प्रत्यक्षात होणारे अर्थिक नुकसान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | सन 2013-2014 | 1214 | 872 | 2086 | 100 % | २२६२१९५४.०० | १४२१९७१७.०० |
| 02 | सन 2014-2015 | 1296 | 945 | 2245 | 100 % | २५३९९९१६.७५ | १५१०८७०३.७५ |
| 03 | सन 2015-2016 | 1382 | 991 | 2373 | 100 % | २८०११४४३.६६ | १५८४८५५८.६६ |

**क) श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर, शिर्डी -**

श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर, शिर्डी या शैक्षणिक संकुलात राज्य शासनाच्या निर्णयानुसार विद्यार्थीनींना इयत्ता दहावीपर्यन्त मोफत शिक्षण देणेत येत असून, त्यांचेकडून कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक शुल्क आकारले जात नाही. तसेच या विद्यालयासाठी शासनाकडून आर्थिक मदत वा अनुदान घेतले जात नाही.

श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरमध्ये गेल्या 03 अहवाल वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीनीची संख्या व प्रत्यक्षात झालेल्या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे :

| अ.नं. | अहवाल वर्ष | विद्यार्थिनी संख्या | एस.एस.सी. निकाल | प्रत्यक्षात झालेला खर्च | प्रत्यक्षात होणारे अर्थिक नुकसान |
|---|---|---|---|---|---|
| 01 | सन 2013-2014 | 736 | 99.06 % | ११९३६६१३.०० | ११९३२४५८.०० |
| 02 | सन 2014-2015 | 710 | 100 % | १२७२५७२५.३१ | १२७२३३७५.३१ |
| 03 | सन 2015-2016 | 690 | 97.30 % | १२८३३१७८.५० | १२८२३३३८.५० |

**(ड) श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी.**

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी या शैक्षणिक संकुलात विद्यार्थी / विद्यार्थीनींना विज्ञान, कला व वाणिज्य या तीनही शाखेतील शिक्षण देणेत येत असून, शासन निर्णयानुसार मुलींना मोफत शिक्षण देणेत येत आहे. तसेच या विद्यालयासाठी शासनाकडून आर्थिक मदत वा अनुदान घेतले जात नाही. तूर्त सदर कनिष्ठ महाविद्यालय हे जागेच्या कमतरतेमुळे संस्थानने जिल्हा परिषद, अहमदनगर यांना बांधून दिलेल्या प्राथमिक शाळेच्या इमारतीमध्ये भरविण्यात येत आहे. श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात, गेल्या 03 अहवाल वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या खालील प्रमाणे :

| अ.नं. | अहवाल वर्ष | विद्यार्थी / विद्यार्थिनी संख्या | एच.एस.सी. निकाल | प्रत्यक्षात झालेला खर्च | प्रत्यक्षात होणारे अर्थिक नुकसान |
|---|---|---|---|---|---|
| 01 | सन 2013-2014 | 1222 | 98.00 % | १५९१८२२५.०० | १५०७२२०६.०० |
| 02 | सन 2014-2015 | 1392 | 97.00 % | १७५६२४८४.०० | १७०२२८८३.०० |
| 03 | सन 2015-2016 | 1354 | 91.93 % | १९३१५२५२.०० | १८७७४६९९.०० |

**अल्पोपहार सुविधा -**

संस्थान परिसरातील तसेच दर्शन रांगेतील भक्तांना उपहारगृहाव्दारे (कॅन्टीन) 24 तास चहा, कॉफी, दूध, बिस्किटे व मिनरल वॉटर सुविधा पुरविली जाते. तसेच सकाळी 06 ते 10 यावेळेत नाष्टा पाकिटे महिला बचत गटामार्फत तयार करुन घेऊन साईभक्तांना उपलब्ध केली जातात. उपहारगृहामार्फत उपलब्ध करुन देणेत येणारे सर्व पदार्थ सवलतीच्या व वाजवी दरामध्ये भक्तांसाठी उपलब्ध आहेत. नाष्टा पाकिटाच्या एका पाकिटात पुऱ्या, सुकी भाजी, मिष्टान्न असे पदार्थ उपलब्ध करुन दिले जातात. उपहारगृहात पार्ले, ब्रिटानिया, सनफिस्ट आदि कंपन्यांची बिस्किटे कंपनी दरात उपलब्ध करुन दिली जातात.

**प्रसाद लाडू सुविधा -**

श्री साईबाबांचा प्रसाद म्हणून साईभक्तांना प्रत्येकी सुमारे 50 ग्रॅमचे 03 मोतीचूर लाडूचे पाकिट रुपये 20/- या सवलतीच्या दरामध्ये उपलब्ध करुन देण्यात येते. मोतीचूर लाडू शुध्द गावरान तूपात काजू, बेदाणे, वेलची आदि सुकामेव्यांसह बनविले जात असल्याने, ते अत्यंत चविष्ट असतात. भक्तांना लाडू प्रसाद सोबत घेऊन जाणे सोयीचे व्हावे यासाठी हे लाडू चांगले सुकवून पेपर पिशवीत पॅक केले जातात. यामुळे प्रसाद लाडूंना साईभक्तांकडून मोठया प्रमाणावर मागणी असते. प्रतिदिनी सरासरी 30 ते 35 हजार लाडू पाकिटांची मागणी होत असल्याने, साईभक्तांना ते सुलभपणे उपलब्ध व्हावेत म्हणून दोन स्वतंत्र कंत्राटदारांमार्फत प्रसाद लाडू तयार करुन घेणेत येत आहेत.

याकामी लाडू प्रसाद निर्मिती विभाग हा स्वतंत्ररित्या कार्यान्वीत करणेत आलेला असून, उपहारगृह (कॅन्टीन) विभागाचे समन्वयाने लाडू व बुंदी प्रसाद पाकिटांचे विहित पध्दतीने वितरण केले जात आहे.

अहवाल सालात, गेल्या वर्षाचे तुलनेत उपहारगृह विभागामार्फत भक्तांना संस्थान परिसरात विविध ठिकाणी (09 जागी) उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या सोयीमुळे प्रसाद लाडू चहा, कॉफी, दूध, विक्रीमध्ये मोठी वाढ झालेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.नं. | अहवाल वर्ष | तपशिल | झालेला खर्च | विक्रीतून जमा रक्कम | अनुदानित (तोटा) खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 01 | सन 2013-2014 | चहा | ४१३०२८५१ | १४६४६४०१ | २६६५६४५० |
| | | कॉफी | १०२४७१३५ | ४९२६५०७ | ५३२०६२८ |
| | | दुध | १२६६६५८७ | ४९६०८०५ | ७७०५७८२ |
| | | अन्न पाकीटे | ४६९३८३८० | १४१२७४२८ | ३२८१०९५२ |
| | | प्रसाद लाडु | २९२७८८३२५ | १२४९९४०१० | १६७७९४३१५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रसाद बुंदी | १५७७७३९७८ | - | १५७७७३९७८ |
| 02 | सन 2014-2015 | चहा | २४०८५५४४ | १७०८१९४६ | ७००३५९८ |
| | | कॉफी | ५४४५३८० | ५२३५९४२ | २०९४३८ |
| | | दुध | ६५६१४५६ | ५१३९५२२ | १४२१९३४ |
| | | अन्न पाकीटे | ४९४७०९२२ | १४८८९६६८ | ३४५८१२५४ |
| | | प्रसाद लाडु | ३२४३५४४३३ | १६४४२९०८० | १५९९२५३५३ |
| | | प्रसाद बुंदी | २२२७२५७८६ | - | २२२७२५७८६ |
| 03 | सन 2015-2016 | चहा | ३१९६१४१२ | २२६६७६६८ | ९२९३७४४ |
| | | कॉफी | ७७६७१४० | ७४६८४०४ | २९८७३६ |
| | | दुध | ८५७१७७० | ६७१४१८० | १८५७५९० |
| | | अन्न पाकीटे | ४७७४७८६० | १५४८६७०६ | ३२२६११५४ |
| | | प्रसाद लाडु | ३५४७१६९४२ | १५८१९६००० | १९६५२०९४२ |
| | | प्रसाद बुंदी | २४२१५५७६४ | - | २४२१५५७६४ |

या व्यतिरिक्त उपहारगृहामार्फत (कॅन्टीन) अहवाल सालात, संस्थानमार्फत आयोजित करणेत येणा-या वैद्यकिय शिबीरे, प्रथमोपचार केंद्रे, विद्यार्थी-पालक मेळावे व इतर कार्यक्रम-समारंभासाठी चहा, कॉफी, दूध आदिची विनामुल्य व्यवस्था करणेत आली.

**प्रसादालय भोजन सुविधा -**

(माहे सप्टेंबर, 2013 मध्ये ISO-२२०००-२००५ मानांकन प्राप्त सुविधा)

शिर्डीत येणाऱ्या साईभक्तांच्या सुविधेसाठी, मुलभूत सेवेपैकी दुसरी आवश्यक अशी प्रसाद भोजनाची सुविधा आहे. श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देणाऱ्या साईभक्तांना प्रसाद भोजनाची सुविधा विनासायास, विनाविलंब प्राप्त व्हावी, या दृष्टीने, तळमजल्यावरील व पहिल्या मजल्यावरील भोजनकक्ष मिळून एकाच वेळेस 5500 भक्त प्रसाद भोजन घेऊ शकतील अशा क्षमतेची **" श्री साई प्रसादालय "** ही सर्व सोयी-सुविधांयुक्त अद्ययावत इमारत भक्तांच्या सोयीसाठी दिनांक 08 जानेवारी, 2009 पासून पूर्ण क्षमतेने उपलब्ध करुन देण्यात आली आहे. प्रसाद भोजन जलद व चवदार बनविणेसाठी खालील देशी-विदेशी बनावटीच्या यंत्रणा व मशिनरीचा उपयोग करुन घेणेत येत आहे :

| | | | |
|---|---|---|---|
| 01. | चपाती मशिन्स | 02. | आटा मळणी यंत्र |
| 03. | डिश वॉशिंग मशिन | 04. | मसाला ग्राईंडर |
| 05. | व्हेजिटेबल / राईस वॉशर | 06. | व्हेजीटेबल प्रोसेसर मशिन |
| 07. | ओनियन पिलर मशिन | 08. | गार्लिक पिलर मशिन |
| 09. | बटर मिक्सर | 10. | ऑनलाईन चक्की युनिट |
| 11. | स्टीम बॉयलर | 12. | सोलर स्टीम कुकींग सिस्टिम |
| 13. | थर्मिक फ्लुईड हिटींग यंत्रणा | 14. | आर. ओ. प्लँन्ट |
| 15. | माऊंटेड एल. पी. गॅस प्लॅन्ट | 16. | भाजीपाला व ड्रायफुट कोल्ड स्टोअरेज |
| 17. | फायर हायड्रन्ट यंत्रणा | 18. | हायड्रोलिक ट्रॉलीज् |

प्रसाद भोजन बनविणसाठी वर नमुद केलेल्या मशिनरींचा वापर केल्याने, मानवी श्रमांत बचत तर झालीच आहे, त्याबरोबर कमी वेळेत भक्तांना स्वच्छ व स्वादिष्ट प्रसाद भोजन उपलब्ध होत आहे. सध्या दररोज सकाळी 10 वाजेपासून ते रात्रौ 10 वाजेपर्यंत अशी अविरत 12 तास, प्रौढांना रु.10/- व लहान मुलांना रु.5/- या सवलतीच्या दरात पोटभर प्रसादभोजन उपलब्ध करुन देण्यात येत आहे. प्रसाद भोजनात भात, वरण, चपाती व दोन भाज्या, मिष्टान्न असे पदार्थ देण्यात येतात. प्रसाद भोजनातील चपात्या कंत्राटदाराकडून बनवून घेण्यात येतात, तसेच चपाती मशिन्सचाही वापर करणेत येत आहे.

प्रसादालयासाठी आवश्यक असणारा ताजा भाजीपाला हा शिर्डी, राहाता येथील बाजारातून लिलाव पध्दतीने खरेदी करुन आणला जातो. या व्यतिरीक्त संस्थानच्या शेतीमधून उपलब्ध होणारा ताजा भाजीपाला देखील वापरला जातो. प्रसादालयासाठी आवश्यक किराणामाल, कडधान्य, मसाला वगैरे माल खरेदी विभागामार्फत स्वतंत्रपणे निविदा मागणी करुन, वार्षिक दर निश्चित करुन खरेदी करणेत येतो. प्रतिदिनी साधारणपणे 40 हजारापर्यंत साईभक्त प्रसादालयामध्ये प्रसाद भोजनाचा लाभ घेतात. उत्सव व गर्दीच्या काळात ही संख्या प्रतीदिन 65 हजारापर्यन्त जाते. गेल्या तीन वर्षात प्रसाद भोजन घेणाऱ्या भक्तांच्या संख्येत होणारी वाढ दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे :

| अ.नं. | वर्ष | वर्षभरात प्रसादभोजन घेणाऱ्या भक्तांची संख्या | प्रतिदिन प्रसादभोजन घेणाऱ्या भक्तांची सरासरी संख्या |
|---|---|---|---|
| 01 | माहे एप्रिल,2013 ते मार्च,2014 | 1,31,10,263 | 35,919 |
| 02 | माहे एप्रिल,2014 ते मार्च,2015 | 1,29,46,618 | 35,470 |
| 03 | माहे एप्रिल,2015 ते मार्च,2016 | 1,31,83,589 | 36,119 |

प्रसादालयात अन्नपदार्थ तयार करणेसाठी खरेदी केलेला किराणा माल व अनुषंगिक साहित्य, अन्न व औषध प्रशासनाच्या मानकाप्रमाणे तपासणीकामी स्वतंत्र प्रयोगशाळा उभारणी करणेत आलेली असून, सदरची प्रयोगशाळा कार्यान्वीत करणेत आलेली आहे.

**अन्नदान सुविधा -**

जो भक्त शिरडीत येईल तो कधीही भुकेला किंवा उपाशी राहू नये यासाठी श्री साईबाबा स्वतः च्या हातांनी व्दारकामाईमध्ये भोजन तयार करीत व गरीब, भुकेल्या भक्तांना जेऊ घालीत असत. ही शिकवण लक्षात ठेवून, प्रतिदिनी सुमारे 1500 गरीब, गरजू व अपंग व्यक्तींना प्रसादालयाजवळील स्वतंत्र अन्नदान कक्षात दिवसातून दोन वेळेस मोफत अन्नदानाची व्यवस्था केलेली आहे. याव्यतिरिक्त परिसरातील मुकबधीर, अंध, अपंग शाळेतील विद्यार्थ्यांना, वृध्दाश्रमातील वृध्द आदिंना विनामुल्य अन्नदान करणेत येत आहे.

**प्रसादालयामार्फत जेवणापासून मिळणारे उत्पन्न व प्रत्यक्षात झालेला खर्चाचा तपशिल-**

| **अ.नं.** | **तपशील** | **प्रसादालयात भक्तांकरीता भोजनासाठी प्रत्यक्षात येणारी रक्कम (रुपये कोटीत)** | **प्रसादालयात भक्तांकरीता भोजनासाठी होणारा प्रत्यक्षात खर्च रक्कम (रुपये कोटीत) (१ वर्षाकरीता)** |
|---|---|---|---|
| 04 | प्रसादालय | 38.95 | 71.36 |

| अ. नं. | अर्थिक वर्ष | जेवण तयार करणेकामी येणारा प्रती ताटानुसार येणारा खर्च रु. | विक्री करण्यात आलेल्या ताटांची संख्या | प्रत्यक्षात ताटानुसार येणारा वार्षिक खर्च | प्रत्यक्षात प्राप्त होणारे एकुण उत्पन्न | उत्पन्नापेक्षा झालेला जास्तीचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सन २०१३-१४ | २२.९७ | १३११०२६६ | ३०,१०,९५,२६२.११ | १३,११,०२,६६०.०० | १६,९९,९२,६०२.११ |
| ०२ | सन २०१४-१५ | २३.७२ | १२८४६६१८ | ३०,४७,५६,३२५.२५ | १२,८४,६६,१८०.०० | १७,६२,९०,१४५.२५ |
| ०३ | सन २०१५-१६ | २४.८१ | १३१८३५८९ | ३२,७०,७१,९९७.५२ | १३,१८,३५,८९०.०० | १९,५२,३६,१०७.५२ |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम 2004 मधील सुधारित कलम 29(1) अन्वये, विश्वस्तव्यवस्थेकडून ज्या संस्थांना / व्यक्तींना वित्तीय सहाय्य, वस्तुरुपाने अनुदाने देण्यात आली आहेत अशा संस्थांची नांवे, अनुदान रक्कम व अनुदान देणेमागील उद्देश दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे :

**अहवाल वर्ष २०१५-१६**

| **अ.नं.** | **लाभार्थीचे नांव** | **रक्कम** | **उद्देश / बाबी** |
|---|---|---|---|
| **( अ ) रोख रक्कमेच्या स्वरुपातील अनुदान** | | | |
| 01 | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | 5,25,00,000/- | पाणीपुरवठा योजना |
| 02 | महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ | 2,48,62,925/- | शिर्डी बसस्थानक तथा यात्री निवास बांधकाम |
| 03 | महाराष्ट्र शासन | 34,00,00,000/- | महाराष्ट्र जलयुक्त शिवार अभियान |
| 04 | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | 94,58,031/- | शिडी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना |
| 05 | जिल्हा परिषद, अहमदनगर | 99,94,404/- | हेलिपॅड लिंक रस्ता |
| | **एकूण ( अ )** | **43,68,15,360/-** | |
| **( ब ) विविध रुग्णालये आणि गरीब / गरजू रुग्णांकरीता अनुदान** | | | |
| 01 | गरीब व गरजू रुग्णांना अनुदान | 1,83,39,087/- | गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत |
| 02 | गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत | 8,60,05,204/- | गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत |
| | **एकूण ( ब )** | **10,43,44,291** | |
| | **एकूण (अ + ब )** | **54,11,59,651/-** | |

**सन २०१५-१६ : सिंहस्थ कुंभमेळा उत्सव**

सन 2015-16 मध्ये श्री क्षेत्र नाशिक-त्र्यंबकेश्वर येथील सिंहस्थ कुंभमेळा उत्सवादरम्यान शाही पर्वणी कालावधीमध्ये म्हणजेच, दिनांक 28 ऑगस्ट, 2015 ते दिनांक 30 सप्टेंबर, 2015 या कालावधीत शिर्डीमध्ये श्री साईबाबा समाधी दर्शनासाठी मोठया प्रमाणावर गर्दी झाली. सदरहू कालावधीत श्री साईबाबा संस्थान व जिल्हा प्रशासनामार्फत साईभक्तांसाठी खालील विविध प्रकारच्या सोयी-सुविधा पुरविण्यात आल्या होत्या.

वाहनतळ
अतिरिक्त दर्शनरांग
आरोग्य सेवा
बससेवा
प्रसादभोजन व्यवस्था
नाष्टापाकिटे व बुंदीप्रसाद पाकिटे विक्री / बुंदीप्रसाद व उदीवाटप व्यवस्थापन
आपत्ती, निवारण वाहन व्यवस्थापन
उद्घोषणा व्यवस्थापन
डिजीटल स्क्रिन व्यवस्था
निवासव्यवस्था / वाढीव (जादा) निवास व्यवस्था
मुख्य नियंत्रण / उपनियंत्रण कक्ष
हेल्पलाईन सुविधा

सन 2015 मध्ये श्री क्षेत्र नाशिक-त्र्यंबकेश्वर येथील सिंहस्थ कुंभमेळा उत्सव कालावधीत शिर्डी येथे श्री साई समाधी दर्शनासाठी येणारे भक्तांना सुलभतेने दर्शन, प्रसाद, निवासव्यवस्था व इतर मुलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून वर नमुद केलेप्रमाणे उपलब्ध करुन देणेत आलेल्या अनुषंगिक सोयी-सुविधांसाठी संस्थान व्यवस्थापनामार्फत रक्कम रुपये 10,33,02,129/- मात्र खर्च करणेत आला.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे संस्थानमार्फत वेगवेगळया चॅरीटी करण्यात येत आहे. तरी श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता Semi Automatic Rotary Microtome खरेदीकामी Custom Duty मध्ये सूट मिळणेकामी Custom Office ला अर्ज करणेस व संस्थान ना नफा ना तोटा तत्वावर चालविणेत येत असलेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता Semi Automatic Rotary Microtome खरेदी करतेवेळी Custom Duty मध्ये सूट मिळणेबाबतचा Custom Office ला अर्ज करणेस व प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानची दोन्हीही रुग्णालये ना नफा ना तोटा तत्वावर श्री साईबाबा संस्थानमार्फत चालविणेत येत आहेत. तसेच दि.०१ जानेवारी, २०१७ पासुन गोरगरीब रुग्णांसाठी श्री साईनाथ रुग्णालय पुर्णपणे मोफत करणेबाबतचा आजचे सभेमध्ये निर्णय घेण्यात आलेला आहे. याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कळविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४०** **चिकन गुणिया व गोचिड ताप तपासणी दर आकारणीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयामध्ये गेल्या दोन महिन्यापासुन चिकन गुनिया व गोचिड ताप या सारख्या आजाराने त्रस्त रुग्ण उपचारासाठी व भरतीसाठी दाखल होत आहेत. तरी अशा रुग्णांचे योग्य ते निदान होणे कामी आवश्यक त्या रक्ताच्या चाचण्या नव्याने श्री साईनाथ रुग्णालयामध्ये उपलब्ध झालेले आहेत.

उपरोक्त उपलब्ध चाचण्यांचे दर साईनाथ रुग्णालयाकडील पुर्वीचे इतर आजारावरील दर पत्रकात नमुद नाहीत, करिता सदर बाबीचा विचार करता.

(१) चिकन गुनिया या आजाराला लागणारी किटची किंमत रु. २,८००/- इतकी आहे. तसेच एका किटमध्ये साधारण ७० तपासण्या होतात. तसेच तपासणीसाठी इतर अनुषंगीक सिरींज वगैरेचा खर्च धरला तर, प्रत्येक टेस्टची किंमत रु. ३००/- मात्र आकारण्यास हरकत नाही असे मत आहे. याच तपासणीसाठी श्री साईबाबा रुग्णालयात तपासणी दर हा रु. ६१०/- मात्र आकार घेतला जातो.

(२) तसेच गोचिड ताप या आजारासाठी लागणा-या संपुर्ण किटची (weil felix) किंमत रु. ४,३००/- इतकी आहे. एका किटमध्ये साधारण १०० तपासण्या होतात. तसेच इतर अनुषंगीक खर्च धरुन साधारण प्रत्येक तपासणीसाठी रु. ५०/- इतका दर आकारण्यास हरकत नाही. याच तपासणी कामी श्री साईबाबा रुग्णालयात सदर तपासणीसाठी रुपये २५०/- इतका दर आकारणी केला जातो.

श्री साईनाथ रुग्णालयात उपचारासाठी येणारे रुग्ण हे सर्व ग्रामीण भागातुन येत असतात. व ते जवळपास आर्थिक परिस्थितीने ग्रासलेले असतात. या परिस्थितीचा विचार करता चिकन गुनिया व गोचिडताप तपासणीसाठी खालील प्रमाणे तपासणी दर आकारणी करता येईल.

१) चिकन गुनिया तपासणी दर रु. ३००/- मात्र
२) गोचिडताप (weil felix) तपासणी दर रु. ५०/- मात्र

तरी उपरोक्त चिकन गुनिया व गोचिडताप तपासणी दर आकारणीस मान्यता मिळणे कामी व पुर्वीचे चाचणी दर पत्रकात समाविष्ट करणे कामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.९४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालय हे धर्मदाय रुग्णालय म्हणून संस्थानमार्फत चालविले जात असून त्याचा जास्तीत जास्त फायदा गोरगरीब रुग्णांना होत आहे. यासाठी प्रस्तावात नमुद केलेल्या चिकन गुनिया व गोचिडताप या तपासण्या श्री साईनाथ रुग्णामध्ये मोफत करण्यात याव्यात, असे ठरले.**

**याचवेळी अशीही चर्चा करणेत आली की, श्री साईबाबांनी त्यांच्या हयातीमध्ये स्वतःच्या हाताने अनेक रुग्णांची सेवा-सुश्रुषा करुन त्यांच्या व्यधी बऱ्या केलेल्या आहेत. श्री साईबाबांनी सुरु केलेले हे रुग्णसेवेचे कार्य संस्थान व्यवस्थापनाने अविरतपणे पुढे सुरु ठेवलेले आहे. हे रुग्णसेवेचे कार्य असेच पुढे चालू ठेवून त्याची व्याप्ती वाढविणेकरीता दि.०१ जानेवारी, २०१७ पासुन श्री साईनाथ रुग्णालयामध्ये होत असलेले सर्व प्रकारचे वैद्यकिय उपचार सर्वांसाठी मोफत करणेत यावे. याबाबतचा धोरणात्मक निर्णय आजचे सभेत घेण्यात आला. तसेच श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांकडून प्रवेशासाठी फक्त रु.१०/- मात्र पुर्वीप्रमाणेच आकारणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक)

---

**विषय नं.४१** **संस्थानमार्फत रुग्णांना इतर रुग्णालयांमध्ये शस्त्रक्रिया/ उपचार करण्यासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाबाबतचा पडताळणी अहवाल.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान मार्फत जे रुग्ण संस्थानचे रुग्णालयात येऊन, वैद्यकिय उपचार घेऊ शकत नाही व ज्या आजारांवर संस्थान रुग्णालयात उपचार होत नाही. अशा रुग्णांना, रुग्णाचा अनुदान मागणी अर्ज, रेशनकार्ड प्रत, मा.तहसरलदार सो. यांचा उत्पन्नांचा दाखला (रू.१,००,०००/- चे आतील), रुग्णालयाचा खर्चाबाबतचा दाखला (Estimeted Certificate) व सदर माहिती खरी असलेबाबतचे रुग्णाचे स्टॅंप पेपरवर प्रतीज्ञापत्र, या कागदपत्रांच्या आधारे एकूण खर्च दाखल्याच्या १५% व जास्तीत जास्त रू.२५,०००/- इतके आर्थिक अनुदान रुग्णास वरील सर्व कागदपत्रांची पडताळणी झालेनंतर व प्रशासकिय मान्यता घेऊन त्यासंबंधीत रुग्णालयांचे नावे चेक-डीडी/ आर.टी.जी.एस. व्दारे पाठविण्यात येते.

अशाप्रकारे रुग्णांस अनुदान पाठविणेबाबत शासनाची मान्यता आहे. त्यानुसार संस्थान पॅनलवर असलेले एकूण ८६ रुग्णालयांपैकी, रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयांमध्ये आर्थिक मदत पाठविली जाते. वैद्यकिय मदत मिळणेसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे, संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत बसत असलेले आजार संस्थानचे Web Site वर प्रदर्शीत करण्यात आली आहेत. अनुदान देण्यासाठी स्वतंत्र अनुदान विभाग कार्यरत आहे. व पाठविलेली आर्थिक मदत रुग्णांना, रुग्णालयांना प्रत्यक्षात प्राप्त झाली आहे अथवा नाही. तसेच विनियोग न झालेली रक्कम परत संस्थानला पाठविण्यात येते अथवा नाही, याबाबत २४ / २५ ऑक्टोबर २०१६ रोजी पुणे येथिल खालील पाच रुग्णालयांना व काही अनुदान लाभार्थीना प्रत्यक्ष भेटी देण्यात आल्या आहेत.

१) ग्रॅन्ट मेडिकल फाऊंडेशन रुबी हॉल क्लिनीक, पुणे
२) इनलॅक्स ॲन्ड बुधराणी हॉस्पिटल, पुणे
३) दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, पुणे
४) सह्याद्री स्पेसिलीटी हॉस्पिटल, पुणे
५) के. ई. एम. हॉस्पिटल, पुणे

वरील पाचही रुग्णालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन, पाठविणेत येत असलेल्या अनुदानाबाबत खालील प्रमाणे पडताळणी केली आहे.

१) संस्थान मार्फत पाठविलेली आर्थिक मदत रुग्णास व रुग्णालयास प्राप्त झाले बाबत.
२) विनीयोग न झालेली रक्कम संस्थान खाती परत पाठविण्यात येत असले बाबत.
३) अनुदान लाभार्थीना रक्कम वापरलेबाबत उपयोगीता प्रमाणपत्र, Stamped Receipt, रुग्णांचे Detail Bill इत्यादी बाबत
४) अनुदानाची आर्थिक मदत प्राप्त झालेबाबत रुग्ण व रुग्णालयाचे अभीप्राय बाबत.

वरील प्रमाणे माहिती बाबत प्रत्यक्ष भेटी अंती खातरजमा करून घेण्यात आली असून, दि. १०/१०/२०१६ रोजी चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्देषानुसार पडताळणी करण्यात आली असून, सोबत रुग्णालये भेटीचा सविस्तर अहवाल जोडला असून, प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे माहितीस्तव सादर.

**निर्णय क्र.९४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत रुग्णांना इतर रुग्णालयांमध्ये शस्त्रक्रिया/ उपचार करण्यासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाबाबतचा पडताळणी अहवाल वेळेवर उपलब्ध होऊ शकला नाही. याकरीता या अहवालासह सदरहू प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

**तसेच वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीमध्ये डॉ.हेगडेवार रुग्णालय, औरंगाबाद, स्वामी विवेकानंद रुग्णालय, लातुर व श्री गुरुजी रुग्णालय, नाशिक या रुग्णालयांचा समावेश करणेसाठीचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, अशा सुचना केल्या.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **गायत्री परिवार, मुंबई यांचे दिनांक ०२/०५/२०१७ ते दिनांक ०७/०५/२०१७ रोजी साईआश्रम भक्तनिवास येथे "कन्या कौशल्य शिबीर" मेगा कार्यक्रमाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:- २१ (१) (ग) " भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम (१) (ख) " भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

**मा.व्यवस्थापन समिती ठरावः-**निरंक.

**प्रस्ताविकः-** गायत्री परिवार, मुंबईचे श्री.के.एल.मोदी यांनी दि.१७/१२/२०१६ रोजी इकडील विभागाकडे पत्र व ई-मेलव्दारे दि.०२/०५/२०१७ ते दि.०७/०५/२०१७ रोजी कन्या कौशल्य शिबीर मेगा कार्यक्रमाचे शिर्डी येथे आयोजन केले असून, त्यासाठी ५,००० मुलीं + १,००० स्वयंसेवक ०६ दिवसांकरीता सहभागी होणार असून, कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवसी २०,००० व्यक्ती हजर राहणार आहेत.

त्यांनी युग निर्माण योजना आणि विचार क्रांती अभियान साठी खालील प्रमाणे मागणी केली आहे.

१. साईआश्रम भक्तनिवास मध्ये गायत्री परिवार कार्यक्रमातील सहभागी आणि स्वयंसेवक अशा ६,००० व्यक्तींची सहा दिवसांसाठी ८०० रुम निवासासाठी देणे.
२. कार्यक्रमासाठी साईआश्रम जवळ मोकळे मैदान उपलब्ध करुन देणे.
३. सहा दिवस ६,००० सहभागीदारांना / स्वयंसेवकांना नाष्टा, दुपारचे व रात्रीचे जेवण पुरविणे.
४. यासाठी तुम्ही सवलतीच्या दरात दिलेले रक्कम आम्ही अदा करण्यास तयार आहोत. अशी विनंती ई-मेलव्दारे केली आहे.

**मागणीः-** साईआश्रम भक्तनिवास विभागातएकूण १५३६ खोल्या असून, एका रुमची भक्त निवास क्षमता ०३ + ०२ आहे.एका खोलीमधील कॉट संख्या ०३ असून, २४ तासांकरीता विना वातानुकूलीत रुमचे दर रु.२००/- व वातानुकूलीत रुमचे दर रु.५००/- तसेच जादा व्यक्तीसाठी प्रती गादी रु.५०/- सेवा आकार आकारण्यात येते. तसेच या विभागातील एकूण खोल्यांपैकी ७५ % खोल्या ऑनलाईन आरक्षणासाठी ठेवण्यात आलेल्या आहेत.

या विभागात गर्दीचा अंदाज घेऊन भक्तांना निवासासाठी कमीत कमी २४ तास व जास्तीत जास्त ४८ तासांसाठी रुम दिली जाते. तसेच मागणीनुसार एक किंवा दोन दिवसांसाठी मुदतवाढ, अशी चार दिवसांसाठी निवासव्यवस्था करणेत येते. तसेच अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार संस्थान एक तीर्थक्षेत्र असल्याने श्रींच्या दर्शनासाठी आलेल्या साईभक्तांना सेवा सुविधा पुरविणे हे संस्थानचे प्रमुख उदिष्ट आहे. इतर खाजगी कार्यक्रमांसाठी किंवा उपक्रमांसाठी जास्त कालावधीसाठी खोल्या दिल्या जात नाही. तशी तरतुद संस्थानच्या अधिनियमात नमूद नाही.

सदरच्या कार्यक्रमासाठी गायत्री परिवार मुंबई यांचे ईमेल नुसार ६,००० व्यक्तींसाठी राहण्यासाठी ८०० खोल्यांची मागणी केली आहे परंतू इकडील विभागातील एका खोलीची भक्त निवास क्षमता ०३+०२ = ०५ अशी आहे. त्यामुळे ६,००० व्यक्तींसाठी १२०० खोलीची आवश्यकता आहे. या विभागातील नॉन एसी ११५२ खोल्यांपैकी ११०० व एसी ३८४ खोल्यांपैकी १०० खोल्यादेता येतील. त्यासाठी होणारी सेवा आकाराची रक्कम खालील तक्तया दर्शविलेप्रमाणे आकारुन करता येईल.

| अ.नं | **खोली प्रकार** | भक्त निवास क्षमता | **खोल्यांची संख्या** | ०५ व्यक्तींसाठी एक दिवसासाठी (२४ तासांकरीता) एक खोलीसाठी शुल्क रु. | एक दिवसांसाठी(२४ तासांकरीता) होणारी रक्कम रु. | **सहा दिवसांसाठी होणारी एकूण रक्कम रु.** |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | **नॉन एसी** | ३ + २ =५ | **११००** | ३००/- | ३,३०,०००/- | **१९,८०,०००/-** |
| ०२. | **एसी** | ३ + २ =५ | **१००** | ६००/- | ६०,०००/- | **३,६०,०००/-** |
| | | | | **एकूण** | ३,९०,०००/- | **२३,४०,०००/-** |
| | | | | | | अक्षरी रु. तेवीस लाख चाळीस हजार मात्र. |

सदर कालावधीत दि.०२/०५/२०१७ ते दि.०७/०५/२०१७ अखेर साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील खोल्यांचे ऑनलाईन आरक्षण ०२ महिने आगोदर (दि.०१/०५/२०१७ ते दि.०७/०८/२०१७ कालावधीसाठी) बंद ठेवावे लागेल, त्याप्रमाणे माहिती तंत्रज्ञान विभागास सुचीत करावे लागेल.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमानः-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कार्यवाही करता येईल.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्रायः-** १) श्री साईबाबा देवस्थान हे आंतरराष्ट्रीय देवस्थानामध्ये गणले जात असल्याने देश भरातून अनेक साईभक्त रुमची मागणी करत असतात. जर संबंधीत अर्जदार यांना अशा प्रकारे रुम उपलब्ध करुन दिल्यास इतर साईभक्त खाजगी कार्यक्रमासाठी रुमची मागणी करतील.

२) गायत्री परिवार, मुंबई यांचेसाठी सदर कार्यक्रमासाठी इकडील विभागातील नॉन एसी ११०० खोल्या व एसी १०० खोल्याअशा एकूण १२०० खोल्यांसाठी सहा दिवसासाठी खोली सेवा आकार रक्कम रु.२३,४०,०००/- अक्षरी रु. तेवीस लाख चाळीस हजार मात्र शुल्क आकारुन निवास व्यवस्थेसाठी देता येईल.

३) शेवटचे दिवशी दि.०७/०५/२०१७ रोजी सदर कार्यक्रमास २०,००० व्यक्तींचा अंदाज सांगितला आहे यासाठी मोकळी जागा/मैदान मागणी केली आहे त्यासाठी बांधकाम विभागामार्फत संबंधीत गायत्री परिवार मुंबई यांचेकडून शुल्क आकारुन मंडप व्यवस्था, स्टेज व्यवस्था, लाईट, पाणी व स्वच्छता इत्यादी व्यवस्था करता येईल.

४) नाष्टा, दुपारचे व रात्रीचे जेवणांची व्यवस्था शुल्क आकारुन प्रसादालयामार्फत करता येईल.

५) चहा, कॉफीव दुध इ.ची व्यवस्था शुल्क आकारुन कॅन्टीन विभागामार्फत करता येईल.

६) इतर अपेक्षित कामे संबंधीत विभागाकडून प्रशासकीय मान्यतेने करुन घेता येईल.

या विभागामध्ये यापूर्वी अशा प्रकारे कोणत्याही शिबीर /खाजगी कार्यक्रमांसाठी निवासव्यवस्था करणेत आलेली नाही, तसेच याबाबतची तरतुद संस्थानच्या अधिनियमामध्ये नाही.

सदरची बाब धोरणात्मक असल्याने सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभे समोर निणर्यास्तव सादर.

**निर्णय क्र.९४६** **आजचे सभेत गायत्री परिवार, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री.व्यास हे उपस्थित होते. त्यांनी सभेस कन्या कौशल्य शिबीर कार्यक्रमाविषयी माहिती दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, गायत्री परिवार, मुंबई यांच्या मागण्यांपैकी त्यांना 'कन्या कौशल्य शिबीर' या मेगा कार्यक्रमासाठी येणाऱ्या ५,००० मुलीं + १,००० स्वयंसेवक यांना साईआश्रम भक्तनिवास विभागातील ११०० साध्या व १०० वातानुकुलीत खोल्या सहा दिवसासाठी सशुल्क उपलब्ध करुन देण्यात याव्या. तसेच दि.०१ जानेवारी पासुन सर्वांसाठी श्री साईप्रसादालयामध्ये मोफत प्रसाद भोजन सुरु करण्यात येणार आहे. तेथे त्यांची भोजन व्यवस्था करणेत यावी, असे ठरले व त्यांच्या इतर मागण्या अमान्य करणेत आल्या.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२** **श्री.काशिनाथ गोविंद पाटील, कोपरी, ता.वसई-विरार (पुर्व) जिल्हा ठाणे यांची मौजे निघोज, तालुका राहाता येथील गट नंबर १७७, १७८, २८२/१, २८४ व २८८ मधील भुखंडक्रमांक १ मधील इमारत बी व डी विनामोबदला हस्तांतर करणे व त्याठिकाणी संस्थानमार्फत आय.ए.एस. अकॅडमी सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद –** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(ट) यात विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडणेसाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव-** मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७,१७८,२८२/१,२८४ व २८८ मधील भूखंड क्रं.१ मधील इमारत बी व डी भूखंडासह विनामोबदला विना अटी व शर्तीवर स्विकारणेकामीची कार्यवाही सुरु करणेबाबत..

**प्रस्तावना-** मौजे निघोज,ता.राहाता येथील गट नं.१७७,१७८,२८२/१,२८४ व २८८ मधील भूखंड क्रं.१ मधील इमारत बी व डी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना विनामोबदला हस्तांतर करणेबाबत श्री.काशिनाथ गोविंद पाटील,रा.अविनाश अपार्टमेंट,चंदनसार,कोपरी,ता.वसई,विरार (पूर्व),जि.ठाणे यांनी इकडेस विषयांकित अर्ज सादर केला असून सदर भूखंड मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडील आदेश क्रं.मह/ कार्या/ ३ब/ एनएएसआर/२८२/२००८ दि.२७/०२/२००९ अन्वये रहिवास व वाणिज्य प्रयोजनासाठी बिनशेती करणेत आलेला आहे. सदर भूखंडामध्ये इमारत क्र.बी चे तळमजल्याचे क्षेत्रफळ ६५८.४४ चौमी (स्टिल्ट) व त्यावरील ४ मजले त्यांचे एकूण क्षेत्रफळ २६३३.७६ चौमी असे आहे. सदरच्या इमारतीमध्ये एकूण ६४ खोल्या असून प्रत्येक खोलीस स्वतंत्र स्वच्छतागृह आहे. संपूर्ण ६४ खोल्या हया वातानुकूलीत (स्पिलट ए.सी.) आहेत. सदर इमारत क्रं.बी ही विनामोबदला त्वरीत हस्तांतरीत करण्यास योग्य असून इमारत क्रं.डी चे बांधकाम अपूर्ण आहे. ते अर्जदार हे लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहेत. इमारत क्रं.डी चे प्रस्तावित बांधकाम तळमजल्याचे क्षेत्रफळ ११९१.४४ चौमी (स्टिल्ट) व त्यावरील ६ मजले याचे एकूण क्षेत्रफळ ७१४८.६८ चौमी एकूण सुमारे १५० खोल्या असे आहे. सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण करुन बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध झालेनंतर सदर इमारत क्रं.डी ही हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया उभयतांनी पूर्ण करावयाची आहे. उपरोक्त इमारती संस्थानकडे हस्तांतरीत झालेनंतर त्याचे सर्व देखभाल खर्च (मेंटेनन्स खर्च) सर्व प्रकारचे कर व इतर आवश्यक खर्च संस्थानने करावयाचा आहे. साई पालखी निवाराचे प्रवेशद्वाराजवळ संस्थानचा फलक असावा तसेच त्या दिशेने येणारे साईभक्त व पदयात्री यांना सदर इमारतीमध्ये राहण्यासाठी प्राधान्य द्यावे. त्याचप्रमाणे सर्व साईभक्तांना प्रवेशद्वारापासून ते मंदिरापर्यंत ने-आण करणेची सोय करावी. दोन्हीही इमारती हस्तांतरण करणेकामी अर्जदार संस्थानला योग्य ती मदत करतील व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांवर सहया करतील, वगैरेबाबतचा मजकूर अर्जात नमूद केलेला आहे.

**विभागाचे अभिप्राय-** १) अर्जदार श्री.काशिनाथ गोविंद पाटील,रा.कोपरी,ता.वसई यांनी अर्जात जागेसह इमारत बी व डी विनामोबदला हस्तांतर करणेबाबतचा उल्लेख केलेला नाही. फक्त इमारत बी व डी

विनामोबदला हस्तांतर करणेबाबत उल्लेख केलेला आहे. याबाबत अर्जदार यांचेकडून ते जागेसह उक्त इमारती विनामोबदला हस्तांतर करणार किंवा कसे याबाबत खुलासा घेता येईल.

२) अर्जदार यांचेकडून उपरोक्त भूखंडाचे संबंधीत कागदपत्रे प्राप्त करुन घेवून कायदेशीर बाबी पडताळणी करणेकामी संस्थान पॅनलवरील वकील अॅड.श्री.जे.के.गोंदकर यांचेकडून सर्च रिपोर्ट प्राप्त करुन घेता येईल.

३) उक्त भूखंडात जाणे-येणेसाठीचा रस्ता, उक्त दोन्ही इमारतीखालील भूखंडाचे क्षेत्र किती होईल, उक्त इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट तसेच मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर, मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग, शिर्डी यांचे आदेशाप्रमाणे अर्जदार यांनी सर्वांगिण पूर्तता केली आहे किंवा कसे तसेच मा.सहायक संचालक, नगररचना, अहमदनगर यांचे उक्त भूखंडांचे रेखांकन आराखडयावरील अभिप्रायानुसार अर्जदार यांनी बांधकाम केलेले आहे किंवा कसे वगैरेबाबतची खात्री संस्थानच्या बांधकाम विभागामार्फत करुन घेता येईल व संस्थानचे बांधकाम विभागाचे अभिप्राय प्राप्त करुन घेता येईल.

४) सदर भूखंड इमारतींसह दान स्वरुपात स्विकारण्यासाठी सदर भूखंडांची शासकीय मोजणी मा.उपअधिक्षक, भूमी अभिलेख, राहाता यांचेमार्फत करुन घेवून भूखंडाच्या हद्दी निशाण्या कायम करुन घेता येतील व संस्थान मालकीचे होणारे प्रस्तावित भूखंडाचे विभक्त ७/१२ उतारे/अधिकार अभिलेख शासकीय पातळीवरुन पूर्ण करुन घेता येतील.

५) दानपत्र नोंदणीकृत करण्यासाठी येणा-या शासकीय खर्चाबाबतची माहीती मा.दुय्यम निबंधक,राहाता यांचेकडून प्राप्तकरुन घेता येईल.

६) उक्त भुखंड इमारतींसह विना अटी व शर्तीवर दान स्वरुपात स्विकारल्यास त्याठिकाणी संस्थानला आ.ए.एस अॅकेडमी सुरु करता येईल.

तरी उक्त इमारती, त्याखालील भूखंडासह व वहीवाटीच्या रस्त्याच्या हक्कांसह विना अटी व शर्तीवर स्विकारणेबाबत प्रशासकीय मान्यता मिळणेकामीच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.काशिनाथ गोविंद पाटील, कोपरी, ता.वसई-विरार (पुर्व) जिल्हा ठाणे यांची मौजे निघोज, तालुका राहाता येथील गट नंबर १७७, १७८, २८२/१, २८४ व २८८ मधील भुखंड क्रमांक १ मधील इमारत बी व डी विनामोबदला हस्तांतर करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच या इमारतींमध्ये राज्यातील गोर-गरीब, आदिवासी, वंचित, दुर्बल विद्यार्थ्यांसाठी राज्य लोकसेवा आयोगाच्या परिक्षेची तयारी करुन घेणे व त्यांना प्रशासकी सेवेचा लाभ मिळवून देणेकामी निवृत्त राजपत्रीत अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली आय.ए.एस. अकॅडमी सुरु करणेचा अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३** **शिर्डी येथील साईआश्रम १ लगत असलेली जमीन सर्व्हे नं.१०७/६, १०७/४, १०७/१०, १०७/११, १०७/१४ असे एकूण क्षेत्र ०३.१२.३० आर ही जमीन संस्थानला कायम खरेदी करणेसाठी श्री.कैलास गोविंदराव कोते, रा.शिर्डी व इतर यांचे दि.१५.०२.२०१६ रोजीचे अर्जावर निर्णय घेणेसाठी श्री.कैलास गोविंदराव कोते यांचेबरोबर चर्चा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) यात विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडणेसाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव-** शिर्डी येथील साईआश्रम-१ लगत असलेली जमीन सर्वे नं.१०७/६, १०७/४, १०७/१०,१०७/११, १०७/१४ चे एकूण क्षेत्र ०३.१२.३० आर हया जमीनीचे दर निश्चिती करुन ही जमीन संस्थानला कायम खरेदी करणेबाबत.

**प्रस्तावना-** श्री.कैलास गोविंदराव कोते,श्री.नितीन भानुदास औताडे व श्री.विठ्ठल तुकाराम गोंदकरआणि श्री.प्रभाकर गोविंदराव कोते, श्री.कैलास गोविंदराव कोते, सौ.सुमित्रा कैलास कोते,रा.शिर्डी यांनी त्यांचे मालकीच्या मौजे शिर्डी येथील खालील नमूद केलेल्या जमीनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना कायमस्वरुपी खरेदी देणेकामी दि.१५/०२/२०१६ रोजी अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.नं. | सर्वे नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु. पैसे | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १) | १०७/६ पै. | ०.६०.०० | १=६० | श्री.कैलास गोविंदराव कोते व श्री.नितीन भानुदास औताडे. |
| २) | १०७/६ पै. | ०.४२.२५ | १=१५ | श्री.विठठल तुकाराम गोंदकर |
| ३) | १०७/४ | ०.२६.०४<br>पोख ०.०४.०० | ०=६० | सौ.सुमित्रा कैलास कोते. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४) | १०७/१० | ०.४९.८८<br>पोख ०.०७.०० | १=४० | सौ.सुमित्रा कैलास कोते. |
| ५) | १०७/११ | ०.६१.००<br>पोख ०.०६.०० | १=५५ | श्री.कैलास गोविंदराव कोते |
| ६) | १०७/१४ | ०.५६.१३<br>पोख ०.०४.०० | १=३५ | श्री.प्रभाकर गोविंदराव कोते. |
| | एकूण | ०३.१२.३० | | |

सदर अर्जासंबंधातील प्रस्तात्र मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/०७/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत सादर करणेत आले. त्यास अनुसरुन निर्णय क्रं.४३२ व ४३३ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेले आहेत.

यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावित जमीन संस्थान मिळकतीच्या लगतची असल्यामुळे ती विकत घेणे संस्थानसाठी फायदेशीरच ठरेल. परंतु सदरहू जमीन विकत घेणेपूर्वी जमीन मालकांशी, जमीनीच्या दरांबाबत चर्चा करुन अंतिम रक्कम ठरवून घेण्यात यावी व सदरहू खर्चास मान्यता घेणेकामी संस्थान वकीलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील अर्ज दाखल करणेबाबतचा प्रस्ताव मंजूरीसाठी समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

तद्नंतर सदर निर्णयाप्रमाणे जमीन मालक यांचेशी जमीनीचे दराबाबत चर्चा करुन अंतिम रक्कम ठरविणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०९/२०१६ रोजीचे बैठकीत प्रस्ताव सादर करणेत आला. त्यास अनुसरुन निर्णय क्रं.६८४ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित मिळकती खरेदी करणेबाबत दि.१४/०७/२०१६ रोजीचे सभेतील निर्णयास अनुसरुन व्यवस्थापन समितीचे सध्याचे मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांनी जमीन मालकांशी चर्चा करुन जमीनीची किंमत अंतिम करावी,असे ठरले.

उपरोक्त श्री.कैलास गोविंदराव कोते व इतर १ यांचे सर्व्हे नं.१०७/६ पैकी क्षेत्र ६००० चौमी या क्षेत्राचा हॉटेल या वाणिज्य उपयोगीतेसाठीचा रेखांकन आराखडा मा.सहायक संचालक,नगररचना, अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.अभिन्यास मंजूरी/ मौजे शिर्डी, ता.राहाता/ सर्वे नं.१०७/६ पै./ सशंअ/ ३४६१ दि.३१/१०/२०१२ मधील अटीस अधीन राहून मंजूरीची शिफारस केलेली आहे. तथापि अर्जदार यांनी सदर पत्राची प्रत प्रकरणात सादर केलेली नाही. सदर रेखांकन आराखडयास सहायक संचालक,नगररचना, अहमदनगर यांचे शिफारसपत्रानुसार मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.०३/०६/२०१३ रोजीच्या पत्रानुसार बिनशेतीकामी

रेखांकनास प्राथमिक मंजूरी दिलेली आहे. उक्त अभिप्रायानुसार सदर पत्राची प्रत अर्जदार यांनी प्रकरणात सादर केलेली नाही. तहसिलदार,राहाता यांनी प्रस्तुत प्रकरणात त्यांचेकडील क्रं.कावि/ जमीनी/ नाहरकत/ एसआर/९/२०१६ दि.२८/०७/२०१६ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४२-अ(१) मधील तरतूदीअन्वये जमीनीचा भोगवटा,वर्ग व भार याच्या विनिश्चितीचे बाबतचे प्रमाणपत्र निर्गत केलेले आहे.

तसेच श्री.विठ्ठल तुकाराम गोंदकर यांचे सर्वे नं.१०७/६ पैकी क्षेत्र ४२२५ चौमी या क्षेत्राचा रहिवास उपयोगीतेसाठीच्या रेखांकन आराखडयास मा.सहायक संचालक,नगररचना,अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.बिशेप/ मौशिर्डी, ता.राहाता/गन.१०७/६ पै./ससअ/३६०९ दि.२८/११/२०१३ च्या पत्रामधील अटीस अधीन राहून मंजूरीची शिफारस केलेली आहे. तथापि सदर पत्राची प्रत अर्जदार यांनी प्रकरणात सादर केलेली नाही. सदर रेखांकन आराखडयास मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील नपं/बांध/टिक्र/२/४३७/२०१४ दि.०७/०२/२०१४ नुसार बिनशेती रेखांकनास प्राथमिक मंजूरी दिलेली आहे तथापि सदर पत्राची प्रत अर्जदार यांनी प्रकरणात सादर केलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात उपरोक्तप्रमाणे हॉटेल या वाणिज्य कारणासाठी व रहिवास कारणासाठीच्या रेखांकन आराखडयास मंजूरी देण्यात आलेली दिसते. तथापि सदर रेखांकन आराखडयाचा व प्रयोजनाचा संस्थानला उपयोग होईल असे वाटत नाही. शिवाय सध्यस्थितीतील ७/१२ उतारे पाहता त्यावर उक्त क्षेत्र बिगरशेतीकडे वर्ग झालेचे दिसून येत नाही. तसेच त्यास बिगरशेतीचा आकार देखील बसविलेला दिसून येत नाही. म्हणजेच सदरचे संपूर्ण क्षेत्र आज मितीस खरेदी करावयाचे झाल्यास शेतजमीन म्हणूनच संस्थानला खरेदी करावे लागेल, असे इकडील नम्र मत आहे.

तसेच उपरोक्त अर्जदार श्री.प्रभाकर गोविंदराव कोते व इतर यांचे उक्त सर्वे नं.१०७/४,१०७/१०, १०७/११,१०७/१४ एकूण क्षेत्र २.१०.०५ आर या क्षेत्राचा हॉटेल व रेस्टॉरंट या वाणिज्य उपयोगीतेसाठीचा रेखांकन आराखडा मा.सहायक संचालक,नगररचना, अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.अभिन्यास मंजूरी/मौजे शिर्डी, ता.राहाता/ सर्वे नं.१०७/४+१०+११+१४ पै./१०६/२०१२ दि.०७/०१/२०१२ मधील अटीस अधीन राहून मंजूरीची शिफारस केलेली आहे. तथापि अर्जदार यांनी सदर पत्राची प्रत प्रकरणात सादर केलेली नाही व छायांकित रेखांकन आराखडा प्रकरणात सादर केलेला आहे सदर रेखांकन आराखडयास सहायक संचालक, नगररचना, अहमदनगर यांचे शिफारसपत्रानुसार मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील

दि.१०/०७/२०१२ रोजीच्या पत्रानुसार बिनशेतीकामी रेखांकनास प्राथमिक मंजूरी दिलेली आहे उक्त अभिप्रायाची पत्राची प्रत अर्जदार यांनी प्रकरणात सादर केलेली नाही.

उपरोक्त २१००० चौमी इतके क्षेत्रास मा.अप्पर जिल्हाधिकारी,अहमदनगर यांनी त्यांचेकडील आदेश क्रं.मह.कार्या/ ३ब/ एनएएसआर/४०९/२०१२ दि.२०/१२/२०१२ अन्वये वाणिज्य प्रयोजनासाठी अकृषीक वापरास अटी व शर्तीवर परवानगी आदेश निर्गत केलेला आहे. सदर आदेशातील अटीं व शर्तीचे अवलोकन केले असता त्यात प्रामुख्याने, ज्या प्रयोजनासाठी बिनशेती परवानगी देण्यात आली त्याच प्रयोजनासाठी अर्जदाराने प्रश्नाधीन क्षेत्राचा वापर करावा, अर्जदाराने प्रस्तुतच्या जमीनीत सदरच्या आदेशाच्या तारखेपासून एक वर्षाचे आत बिनशेतीचा वापर सुरु करावा अन्यथा सदरची परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल, मंजूर रेखांकन आराखडयात मा.अप्पर जिल्हाधिकारी यांचे आगावू परवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही वगैरेबाबतच्या अटी नमूद केलेल्या आहेत.

सदर आदेशाप्रमाणे उक्त जमीनीच्या ७/१२ उता-यावर बिगरशेतीची नोंद झालेली नसून बिगरशेती आकार बसविलेला नसलेचे ७/१२ उता-यावरुन दिसून येते. म्हणजेच सदरचे क्षेत्रास बिनशेती वापरास अर्जदार यांनी फक्त परवानगी मिळविलेली आहे. मात्र सध्यस्थितीत त्याप्रमाणे जमीनीचा उपयोग होत नाही.

उपरोक्त आदेशातील अटीप्रमाणे सदर क्षेत्राचा बिनशेतीचा वापर आदेशाच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत सुरु केला नसल्याने सदर बिनशेती वापराची परवानगी आदेश आपोआप रद्द होतो. शिवाय सदर रेखांकन आराखडयाचा व प्रयोजनाचा संस्थानला उपयोग होईल असे वाटत नाही. म्हणजेच संस्थानला सदरचे क्षेत्र खरेदी करावयाचे झाल्यास शेतजमीन म्हणूनच खरेदी करावे लागेल,असे इकडील नम्र मत आहे.

उपरोक्त दोनही प्रकरणी इकडील दि.२१/१०/२०१६ रोजीच्या कार्यालयीन टिपणीप्रमाणे संस्थान पॅनलवरील वकील ॲड.जे.के.गोंदकर यांचेकडून इकडील पत्र क्र.एसएसएसटी/मालमत्ता/३९१०/२०१६ व ९११/ २०१६ दि.२५/१०/२०१६ अन्वये उपरोक्त जमीनींचे सर्च रिपोर्ट मागविण्यात आले त्यास अनुसरुन श्री.जे.के. गोंदकर यांनी त्यांनी त्यांचेकडील दि.०५/११/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दोनही प्रकरणात सर्च रिपोर्ट सादर केलेले आहेत.

सदर सर्च रिपोर्टचे अवलोकन केले असता ॲड.जे.के.गोंदकर यांनी खरेदी खत करणे अगोदर खालीलप्रमाणे पुर्तता जमीनीचे मालकाकडून करवून घ्यावी लागेल.

१) सदर जमीन सर्व्हे १०७/६ चे ७/१२ उता-यांत इतर हक्कात असलेली बिनकब्जा वारस अशी नोंद कमी करुन घेणे.

२) सदर सर्वे नं.१०७/६ चे ७/१२ उता-यात इतर हक्कात शिर्डी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी इ.क.प. घेतले, ही नोंदही कमी करुन घेणे व मिळकत निर्वेध करणे जरुरीचे आहे.

३) सदर सर्वे नं.१०७/६ चे ७/१२ उता-यात इतर हक्कात "जलकुंभाकरीता आरक्षित" अशी नोंद कमी करुन घेणे जरुरीचे आहे.

४) सदर मिळकतीपैकी ०.६० आर ही मिळकत श्री.कैलास गोविंदराव कोते व श्री.नितीन भानुदास औताडे यांचे खरेदी मालकीची असली तरी त्यांचे कुटूंबातील सर्व सदस्यांची संमती त्यांना खरेदीखतात पक्षकार करुन घेणे आवश्यक आहे. तसेच उक्त मिळकतीपैकी ४२२५ चौमी. ही मिळकत श्री.विठ्ठल तुकाराम गोंदकर यांच्या वडीलोपार्जित मालकीची असल्याने त्यांचे कुटूंबातील सर्व सदस्यांची संमती त्यांना खरेदीखतात पक्षकार करुन घेणे आवश्यक आहे.

५) सदर सर्वे नं.१०७/६ पैकी क्षेत्र ६००० चौमी व ४२२५ चौमी हे क्षेत्र बांध व हद्दी डी.पी.प्लॅनप्रमाणे निश्चित होणे जरुरीचे आहे. त्यासाठी सदर खरेदी घ्यावयाच्या क्षेत्राची मे.उपअधिक्षक,भूमी अभिलेख, राहाता यांचेकडून सरकारी मोजणी करुन घेवून क्षेत्र व हद्दी निश्चित करुन व त्याची खात्री करुन घेण्यात यावी.

तसेच श्री.प्रभाकर गोविंदराव कोते व इतर यांचे प्रकरणात

१) सदर मिळकतींचे ७/१२ उता-यात इतर हक्कात शिर्डी विकास सोसायटी इ.क.प.घेतले,ही नोंदही कमी करुन घेणे व मिळकत निर्वेध करणे जरुरीचे आहे.

२) सदर मिळकती हया श्री साई सिध्दीविनायक सहकारी पतसंस्था,शिर्डी तसेच पोहेगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.पोहेगाव शाखा शिर्डी यांची कर्जफेड करुन त्या निर्वेध करणेसाठी प्रत्यंतरण पत्र नोंदणीकृत करुन घ्यावे व ७/१२ उता-यातून त्यांचे नाव कमी करुन त्याबाबत फेरफार व नवीन ७/१२ उतारे घ्यावेत.

३) सदर मिळकतींचे मालकांचे कुटूंबातील सर्व सदस्यांची संमती घेवून त्यांना खरेदीखतात पक्षकार करुन घेणे आवश्यक आहे.

४) तसेच वरील मिळकती खरेदी घ्यावयाच्या असल्याने त्यांचे क्षेत्र व बांध हद्दी डी.पी.प्लॅनप्रमाणे निश्चित होणे जरुरीचे आहे. त्यासाठी सदर खरेदी घ्यावयाच्या क्षेत्राची मे.उपअधिक्षक,भूमी अभिलेख, राहाता यांचेकडून सरकारी मोजणी करुन घेवून क्षेत्र व हद्दी निश्चित करुन व त्याची खात्री करुन घेण्यातयावी.

५) उपरोक्त दोनही प्रकरणात जादा खबरदारी म्हणून उपरोक्त खरेदी घ्यावयाच्या मिळकतीबाबत दोन दैनिक वृत्तपत्रात टायटल व्हेरीफिकेशनसाठी जाहीर नोटीसा प्रसिध्द करण्यात याव्यात व त्या प्रसिध्द

झाल्यानंतर कायमचे खरेदीखत जमीन मालकांकडून वर नमूद केलेप्रमाणे करुन घेणेस अडचण येणार नाही.

वरीलप्रमाणे पुर्तता झाल्यानंतर मिळकतीचे खरेदी खत मे.दुय्यम निबंधक,राहाता यांचेकडेस आपणांस नोंदविता येईल असे बाबत ॲड.जे.के.गोंदकर यांनी अभिप्राय दिलेले आहेत.

अर्जदार यांनी उक्त जमीनीचे सन २०१६-१७ चे मा.दुय्यम निबंधक,राहाता यांचेकडील मुल्यांकन पत्र सादर केलेले आहे. तसेच इकडील पत्र क्र.एसएसएस/मालमत्ता/१७९०/२०१६ दि.१३/०७/२०१६ अन्वये उक्त जमीनीचे मुल्यांकन कळविणेकामी मा.दुय्यम निबंधक,राहाता यांना कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडील जा.नं.मुल्यांतकन/१८५/२०१६ दि.१३/०७/२०१६ अन्वये मौजे शिर्डी ता.राहाता येथील सर्व्हे नं.१०७ हा बाजार मुल्यदर २०१६-१७ च्या विभाग क्र.१/६०अ मध्ये सामाविष्ट असून सदर विभागात जमीनीचे प्रती चौ.मी.दर ९३००/- इतका देण्यात आलेला आहे. तरी प्रती आर (१०० चौरस मिटर) हे मुल्यांकन रु.९३००००/- (अक्षरी रुपये नऊ लाख तीस हजार) इतके कळविलेले आहे. म्हणजेच उपरोक्त खरेदी करावयाचे एकूण क्षेत्र ०३.१२.३० आर या क्षेत्राची शासनाच्या मुल्यांकन पत्रकाप्रमाणे एकूण किंमत रु.२९,०४,३९०००/- (अक्षरी रुपये एकोणतीस कोटी चार लाख एकोणचाळीस हजार) इतकी होत आहे.

**विभागाचा अभिप्राय-** उक्त जमीनी संस्थानला कायम खरेदी करावयाच्या झाल्यास ॲड.जे.के.गोंदकर यांचे अभिप्रायानुसार प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांचेकडून पुर्तता करुन घेता येईल. तसेच जमीनीचे दर निश्चित करून घेण्यासाठी श्री.कैलास गोविंदराव कोते यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चेकामी बोलाविता येईल.

तरी उपरोक्त जमीनीचे दर निश्चित करुन जमीनी खरेदी करण्याच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्रींच्या समाधी शताब्दी महोत्सवामध्ये श्री.कैलास गोविंदराव कोते व इतर यांच्या प्रस्तावित जमीनीचा संस्थानला विविध प्रकल्प राबविणेसाठी निश्चितच फायदा होईल. याकरीता कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी व उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांनी सदरहू जमीनीचा रेडीरेकनर दर तसेच सध्याचा बाजारभाव यामधील सरासरीचा दर निश्चित करुन त्याचा अहवाल सभेसमोर सादर करावा.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४** **शांतिनिवास इमारतीचे तळमजल्यावरील पश्चिम बाजुकडील पुरुष व महिला प्रसाधनगृहाचे नुतनीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावनाः-** मंदिर परिसरातील शांतीनिवास इमारतीचे तळमजल्यावर पश्चिम बाजूस महिला व पुरुषांकरीता प्रसाधनगृहाची व्यवस्था आहे. सततच्या वापरामुळे सदरहू प्रसाधनगृहाचे आतील रंगकाम, दरवाजे, युरिनल भांडे, संडास भांडे दरवाजे व खिडक्या इ. खराब झालेले आहे. त्यामुळे सदरहू टॉयलेट ब्लॉकचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे.

**प्रस्तावः-** सदरहू टॉयलेट ब्लॉकचे नूतनीकरण करणेकामी भिंतीचा डॅडो व फ्लोअरींगची सिरॅमिक टाईल्स बदलणे, दरवाजे फ्रेम व शटर बदलणे, रंगकाम करणे इ. कामे करावी लागणार आहेत. याकामी सोबतचे अंदाजपत्रकानुसार महिला व पुरुष प्रसाधनगृहाचे नूतनीकरण करणेसाठी अहदमनगर जिल्हा दरसुची २०१६-२०१७ मधील दरानुसार अंदाजे रु७,६४,१६०/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. तरी सदर खर्चास व सदर काम करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई – निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शांतिनिवास इमारतीचे तळमजल्यावरील पश्चिम बाजुकडील पुरुष व महिला प्रसाधनगृहाचे नुतनीकरण करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५** **जय गुरु साई फाऊंडेशन, यांना सहस्त्र ज्योती लिंगार्चन पूजा कार्यक्रम व पालखी मिरवणूक कार्यक्रमाचे परवाणगीबाबत.**

**प्रस्ताव-** जय गुरु साई फाऊंडेशन्स, हैद्राबाद यांनी दि.०४/१०/२०१६चे पत्रान्वये दि.२३ ते २५ डिसेंबर, २०१६ अखेर सदर संस्थेमार्फत ३००-५०० साईभक्त शिर्डी येथे येणार असून भजन कार्यक्रम, सहस्त्र लिंगार्चन, दिपोत्सव, पालखी मिरवणूक, सत्यनारायण पूजा, मंगलकर्यालय असे कार्यक्रम करणेबाबत परवानगी मागितली आहे.

**प्रस्ताव-** सदर परवानगी पैकी खालीलप्रमाणे परवानगीकामी मा.व्यव्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे-

१. संस्थानचे हद्दीमध्ये सहस्त्र ज्योती लिंगार्चन पूजा कार्यक्रम व दिपोत्सव कार्यक्रम करणेस परवानगी मागितली आहे.

**२.** जय गुरु साई फाऊंडेशन्स, हैद्राबाद यांचेमार्फत श्रीसाईबाबांची पालखी मिरवणूक द्वारकामाई पासुन चावडी व पुढे पालखी रोड -आओसाई हॉटेल- महानगरपालिका रोड- हायवे- पीआरओ ऑफीस/ दर्शन रांग-१६ गुंठे- मारुती मंदिर येथे पालखी बाबत परवानगी मागितली आहे.

**विभागाचा अभिप्राय-**

१. संस्थानचे हद्दीमध्ये संस्थानचे व्यतिरीक्त इतर कोणत्याही संस्थेस वैयक्तीक कारणास्तव पूजा करणेबाबत परवानगी देण्याची पद्धत नाही. अशा पद्धतीने परवानगी दिल्यास इतर साई मंदिरे अथवा संस्था अशाच पद्धतीने कार्यक्रमाचे आयोजन करुन संस्थानकडे परवानगी मागतील. तसेच सदरचा कार्यक्रम संस्थानमार्फत अयोजित केला आहे असे दर्शनार्थी साईभक्तांना गैरसमज निर्माण होऊ शकतो. त्यामुळे मंदिर परिसरात सहस्त्र लिंगार्चन हा पूजेचा कार्यक्रम करणेस परवानगी न देता जय गुरु साई फाऊंडेशन्स, हैद्राबाद यांना संस्थानचे मंगलकार्यालय देण्यात आलेले आहे, तेथे नियोजित पूजेचा कार्यक्रम करणेस परवानगी देणेत यावे, असे नम्र मत आहे.

२. जय गुरु साई फाऊंडेशन्स, हैद्राबाद यांचेमार्फत श्रीसाईबाबांची पालखी मिरवणूक कार्यक्रमास परवानगी दिल्यास शिर्डीत इतर हजारो पालख्या वर्षभर येत असतात. अशा कार्यक्रमास दुस-या पालख्याही परवानगी मागण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही एक प्रथा पडेल व यामुळे संस्थान/ मंदिराच्या रुढी-परंपरांवर विपरीत परिणाम होतील, बंधने येतील. तसेच भक्तांच्या भावना दुखावल्या जातील, याचा विचार करता जय गुरु साई फाऊंडेशन्स, हैद्राबाद यांना पालखी मिरवणूकीस परवानगी देऊ नये, असे विधी विभागाने कळविले आहे. तरी त्याबाबत निर्णय व्हावा ही विनंती.

तरी जय गुरु साई फाऊंडेशन्स, हैद्राबाद यांना उपरोक्त कार्यक्रमाकरीता परवानगी द्यावी किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जय गुरु साई फाऊंडेशन्स, हैद्राबाद यांना सहस्त्र ज्योती लिंगार्चन पूजा कार्यक्रम करणेसाठी द्वारकामाई मंदिरासमोरील खुल्या नाटयगृहाची जागा उपलब्ध करुन देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०६** **राज्य कौशल्य विकास विभागांतर्गत अभ्यासक्रमाचे केंद्र औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम:-** सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम १७(२ड) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:-** संस्थानद्वारा १९८४ मध्ये केंद्रशासनाच्या रोजगार व श्रम मंत्रालयांतर्गत असलेल्या तत्कालीन डायरेक्टोरेट जनरल ऑफ एम्प्लायमेंट अण्ड ट्रेनिंग (DGET) विभागाच्या कार्यक्रमाअंतर्गत राज्य व केंद्र शासनाच्या मान्यतेने “कायमस्वरुपी विनाअनुदान” तत्वावर श्री साईबाबा औदयोगीक प्रशिक्षण संस्थेची स्थापना केली. ग्रामीण भागातील गरजु, गरीब कुटुंबातील तरुण, तरुणींना कौशल्याधारीत प्रशिक्षण देवून स्वत:च्या पायावर उभे करणे तसेच देशाच्या औदयोगिक क्षेत्राला तंत्रज्ञ मनुष्यबळाच्या उपलब्धतेमध्ये सहभाग अशा दुहेरी उदृशाने संस्थेची स्थापना झाली. सध्या या संस्थेमध्ये ११ व्यवसायांच्या २२ तुकडया कार्यरत असून सर्व तुकडयांना केंद्रशासनाच्या वरील डीजीईटी या विभागाची कायम संलग्नता आहे. २००१ ते २००७ या कालावधीत राज्याशासनामार्फत झालेल्या दर्जा निरीक्षणामध्ये राज्यातील अशासकिय आय.टी.आय मध्ये सतत आपल्या संस्थेने “अ” दर्जा राखला असुन तीन वेळा राज्यात सर्वप्रथम क्रमांक प्राप्त केलेला आहे.

संस्थेचे प्रशिक्षण दोन पाळयांमध्ये चालविण्यात येते. २००६ ते २०१६ या कालावधीत कौशल्य स्पर्धेमध्ये संस्थेचे १० प्रशिक्षणार्थी राज्यात सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. त्यापैकी ०२ प्रशिक्षणार्थी राष्ट्रीय पातळीवर पात्र, ०२ प्रशिक्षणार्थी देशात द्वितीय तर ०७ प्रशिक्षणार्थी देशात सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहे. त्याबरोबरच आपल्या औ.प्र.संस्थेने केंद्रशासनाचे अखिल भारतीय राष्ट्रीय पातळीवर सात सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार(Best Institute Award) जिंकले आहेत.

काळाची गरज ओळखुन माननीय पंतप्रधान भारत सरकार यांच्या नेतृत्वाखाली २०२२ पर्यंत ५०० दशलक्ष लोकांना कुशल बनविण्याचे उदिदष्ट ठरविण्यात आलेले आहे. माननीय पंतप्रधान महोदय यांनी ठरविलेल्या उदिष्टास अनुसरुन महाराष्ट्र शासनाने सुध्दा कौशल्य विकासाच्या खास कार्यक्रमासाठी २०२२ पर्यंत ४५ दशलक्ष व्यक्तींना रोजगारक्षम कुशल बनविण्याचे उदिदष्ट ठरविण्यात आले आहे. सदरचे उदिदष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने सोसायटी रजिस्ट्रेशन कायदा १८६० च्या अंतर्गत १५ फेब्रुवारी २०११ रोजी महाराष्ट्र स्टेट स्कील डेव्हलपमेंट सोसायटी (MSSDS) ची स्थापना केली महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव हे या सोसायटीचे अध्यक्ष राहणार असुन याबाबतच्या नियोजन, समन्वय, कार्यवाही व नियंत्रण

यासाठीची एकमेव प्रमुख संस्था म्हणुन कार्यरत आहे. राज्य शासनाच्या वेगवेगळया विभागाअंतर्गत असलेल्या कौशल्याबाबतच्या विकास योजना या सोसायटीच्या छताखाली एकत्रितपणे कार्य करतात.

MSSDS अंतर्गत खालील योजनांमधुन प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

- National Urban Livelihood Mission (NULM)
- Pramod Mahajan Kaushalya Udhyogkta V Abhiyan (PMKUVA)

या दोन्ही योजनांच्या अंतर्गत चालविण्या जाण्या-या अभ्यासक्रमांची यादी सोबत जोडली आहे. या पैकी खालील अभ्यासक्रम आपणांस चालू करता येतील.

| Sr. No. | Sector | MES Course code | Course | Min. Educational Qualification | Duration of Training Hours | Training Cost Category |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Production & Manufacturing | MAN - 701 | Turning | 8th | 600 | A |
| | | MAN - 703 | Milling | 8th | 600 | A |
| 2 | Information & Communication Technology | ICT -701 | Accounts Assistant Using Tally | 10th | 500 | A |
| | | ICT -702 | DTP and Print Publishing Assistant | 10th | 500 | A |
| | | ICT -703 | Computer Hardware Assistant | 10th | 500 | A |
| | | ICT -704 | Computer Network Assistant | 10th | 500 | A |
| 3 | Auto motive Repair | AUR - 702 | Basic Automotive Servicing 4 Wheeler | 5th | 500 | A |
| 4 | Electrical | ELE - 701 | Electrician Domestic | 8th | 600 | A |
| 5 | Febrication | FAB – 701 | Arc and Gas Welder | 8th | 700 | A |
| 6 | Refrigeration & Air Conditioning | REF -703 | Repair & Maintenance of Refrigerator | 8th | 500 | A |
| | | REF -706 | Repair & Maintenance of Window & Split A.C | 8th | 500 | A |

वरिल अभ्यासक्रमांना शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान खालीलप्रमाणे असेल.

Category A:- Rs. 27.50 per hour per trainee. This rate will be increased by Rs. 2.50 per trainee at the start of every Financial year.

सदर अभ्यासक्रम चालू करण्यासाठी सेंटर Application fee 1000/- Rs. प्रति सेंटर भरावा लागणार आहे. सेंटरचे निरिक्षणासाठी Rs.5000/- ही दोन Sector साठी Rs.10,000/- ही ०२ ते ०६ सेक्टरसाठी आणि Rs.15000/- ही ०६ सेक्टरच्या वर अभ्यासक्रम निवडल्यास भरावी लागणार आहे. निरीक्षण झाल्यानंतर प्रशिक्षण केंद्र म्हणून नोंदणीस निरीक्षण समितीच्या अहवालास अनुसरुन मान्यता मिळाल्यानंतर नोंदणी शुल्क (Empanelment fee) Rs.10,000/- (एका वेळेस) भरावे लागतील. त्याशिवाय दरवर्षी Service Subscription fee Rs.500/- भरावी लागेल.

वरील संदर्भिय मान्यतेनुसार आपल्या औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये MSSDS अंतर्गत अभ्यासकेंद्र सुरु करण्यासाठी त्यांच्या संकेतस्थळावर Empanel center ची नोंदणी Online पध्दतीने दि.२४/१०/२०१६ रोजी झाली असुन नोंदणी क्र.VTPId-CEMP3815 असा प्राप्त झाला आहे. संपुर्ण

अनुदा ान प्राप्त होण्यासाठी किमान ७५ % विदयार्थी जॉबवर लागणे किंवा स्वयंरोजगार करणे आवश्यक आहे तरच उर्वरीत अनुदान प्राप्त होईल. मात्र ७५ % विदयार्थ्यांना जॉब देण्याची जबाबदारी त्या-त्या संस्थेची असल्याने नोकरी व स्वयंरोजगार देणे किंवा त्यांच्यासाठी जॉब उपलब्ध होणे ही अंतीम अनुदान देण्यासाठीची अट असल्याने ही अट पुर्ण होण्याची शाश्वती जोखमीचे ठरणार आहे त्यामुळे सदरचे अभ्यासक्रम संस्थानद्वारा ग्रामिण भागातील गरीब, गरजु कुटुंबातील व्यक्तींसाठी संस्थानद्वारा स्वयंपुर्ण बनण्याची संधी उपलब्ध करुन देण्यासाठीच आहे. त्यामुळे त्यासाठी शासनाच्या नियमावलीच्या प्रक्रियेचे पालन होवू न शकल्यास त्यास त्या पोटी मिळणारे अनुदान मिळू न शकल्यास तो सर्व खर्च संस्थानद्वारा व्हावा तसेच अशा स्थितीत शासनाकडून अनुदान प्राप्त झालेच पाहिजे हे बंधन न ठेवता अभ्यासक्रम चालविण्याचा निर्णय व्हावा तथापी ७५% किंवा त्याहीपेक्षा अधिक यश प्राप्त करण्याचा प्रयत्न करता येईल.

सदरचे अभ्यासक्रम चालु करण्यासाठी प्रत्येक तुकडीची नोंदणी करण्यासाठी किमान विदयार्थी संख्या २० व कमाल ३० असेल प्रशिक्षण कालावधीमध्ये प्रशिक्षणासाठी उपस्थित राहणारे प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक यांची बायोमेट्रीक नोंद घेणे बंधनकारक असुन त्या यंत्रांची खरेदी करुन त्याची नोंद व मान्यता MSSDS यांचे कडून प्राप्त करुन घ्यावे लागेल.

सदर अभ्यासक्रमाचा शिकविण्याचा कालावधी संपल्यानंतर शासनाने ठरविलेल्या मुल्यांकन एजन्सी कडून मुल्यांकन होईल व शासनाकडून यशस्वी प्रशिक्षणार्थ्यांना प्रमाणपत्र प्राप्त होतील.

सदर केंद्र सुरु करणेसाठी सध्या औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये असलेल्या ट्रेडचे साहित्य व जागा वेळेचे नियोजन करुन वापरता येईल. तसेच प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षक हे आवश्यकतेनुसार आऊटसोर्स/ कंत्राटी पध्दतीने नेमता येतील. सदर अभ्यासक्रमाची उपयोगिता व यश पाहून नियमीत कर्मचारी भरणेबाबत धोरण ठरविता येईल.

वरील प्रस्तावीत अभ्यासक्रमाच्या अभ्यासक्रम प्रती केंद्रशासनाच्या Skill Development Initiative Scheme बाबतच्या संकेतस्थळावरुन Download केले असून सोबत ठेवल्या आहे.त्यामध्ये अभ्यासक्रमासाठी लागणारे साहित्य, जागा व प्रशिक्षकासाठीची अर्हता याची माहिती देण्यात आली आहे.त्यामध्ये साहित्याच्या / यंत्राच्या यादया नमुद करण्यात आलेल्या आहे. त्यानुसार काही साहीत्य खरेदी करावे लागेल. त्यासाठी अंदाजे खर्च रु.१० लाख अपेक्षित आहे.त्याला मान्यता असावी.

सदरचे अभ्यासक्रम कौशल्य विकास (Skill Development), UpSkill Development कौशल्यवर्धन आणि रिस्किलींग (पुनर्कौशल्य) यासाठी उपयुक्त ठरणार आहेत.

सदरची योजनेसाठी P.P.P. -(Public Private Partnership) तत्वाने M.O.U.करता येत असल्यास त्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यासाठीही मान्यता असावी.

सदरच्या अभ्यासक्रमाच्या माध्यमातुन आदिवासी भागातील गरजु आदीवासींना निवासी पध्दतीने शिर्डी येथे ठेवून प्रशिक्षण देवून स्वत:च्या पायावर उभे करण्याची संकल्पना मा.विश्वस्त महोदय (श्री प्रताप भोसले साहेब) यांनी व्यक्त केली आहे.सध्या आपल्या औ.प्र.संस्थेला वस्तीगृहाची सुविधा नाही त्या अनुषंगाने औ.प्र.संस्थेच्या नियमीत प्रशिक्षणार्थ्यांना व या योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणा-या प्रशिक्षणार्थ्यासाठी एक सुविधापुर्ण वस्तीगृह तयार करण्याबाबत निर्णय व्हावा त्यासाठी आवश्यक खर्च, जागा, प्लॅन इस्टिमेट इ.चा तपशिल बांधकाम विभागाकडून सादर करता येईल.

या योजनेतील लाभधारक प्रशिक्षणार्थ्यांचे वय १५ त ४५ या दरम्यान असावे लागणार आहे.या योजनेअंतर्गत संस्थानच्या विविध विभागात कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना संगणक प्रशिक्षण देण्यासाठी वर प्रस्तावित Information & Communication Technology सेक्टर मधील अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देता येईल मात्र सेवेत कार्यरत कर्मचा-यांना या योजनेअंतर्गत शासकिय अनुदान मिळण्याची शक्यता नाही असे या विभागाचे सह संचालक, अहमदनगर यांनी सांगितले आहे. परंतु अभ्यासक्रमाचा लाभ कर्मचा-यास व संस्थानला होणार असल्यामुळे सदर प्रशिक्षण देणे संयुक्तिक ठरणार आहे. आयटीआय संगणक लॅब स्वतंत्र प्रस्ताव करण्यास ठेवला आहे. तातडीने अभ्यासक्रम चालु करण्यासाठी इच्छुक साईभक्तांकडून देणगी रुपाने संगणक प्राप्त झाल्यास उपयुक्त ठरेल असे वाटते.

**मागणी :-** (१) औ.प्र.संस्थेमध्ये सध्या प्रशिक्षण घेत असलेले ४७२ प्रशिक्षणार्थी तसेच MSSDS या योजना सुरु केल्यानंतर या योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणा-या संभाव्य ३०० प्रशिक्षणार्थ्यांची संख्या विचारात घेवून त्यांचेसाठी वस्तीगृह तयार करण्याचा धोरणात्मक निर्णय होण्यास विनंती आहे.

(२) MSSDS योजनेअंतर्गत प्रस्तावित व आवश्यकतेनुसार यादीमधील अभ्यासक्रम सुरु करण्यास, त्यासाठी येणा-या खर्चास, आवश्यक कर्मचारी नियुक्तिस मान्यता असावी.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:-** प्रशासकीय मान्यतेनुसार कार्यवाहीकरता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ सुपष्ट मत:-** (१) औ.प्र.संस्थेमध्ये सध्या प्रशिक्षण घेत असलेले ४७२ प्रशिक्षणार्थी तसेच MSSDS या योजना सुरु केल्यानंतर या योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणा-या संभाव्य ३०० प्रशिक्षणार्थ्यांची संख्या विचारात घेवून त्यांचेसाठी वस्तीगृह तयार करण्याचा धोरणात्मक निर्णय होण्यास विनंती आहे.

(२) MSSDS योजनेअंतर्गत प्रस्तावित व आवश्यकतेनुसार यादीमधील अभ्यासक्रम सुरु करण्यास, त्यासाठी येणा-या खर्चास, आवश्यक कर्मचारी नियुक्तिस मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.९५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये राज्य कौशल्य विकास विभागांतर्गत अभ्यासक्रमाचे केंद्र सुरु करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **श्री. पारस जैन, शिर्डी यांना अदा करण्यात आलेल्या मानधनाच्या रकमेस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ चे सभेत निर्णय क्र.८४८ अन्वये साईभक्त स्थानिक गायक श्री. पारस जैन, शिर्डी यांचा जागतिक साईमंदिर संमेलनात दि.११.१२.२०१६ रोजी साईभजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा, श्री. पारस जैन, शिर्डी यांचे मानधनाबाबत त्यांच्याशी संपर्क करणेत येऊन चर्चा करावी, असे ठरलेले होते.

श्री. पारस जैन, शिर्डी यांचे दि.०५.१२.२०१६ रोजीच्या अर्जान्वये भजन संध्येच्या कार्यक्रमासाठी रु.५१,०००/- मात्र मानधनाची मागणी केली होती.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ चे सभेतील निर्णयानुसार दि.०७.१२.२०१६ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी श्री.औटी साहेब यांनी श्री. पारस जैन, शिर्डी यांचेशी साई भजन कार्यक्रम व मानधनाबाबत चर्चा केली असता त्यांनी रु.५१०००/- मानधनाची मागणी केली होती. तसेच याबाबत मा. श्री.सचिन तांबे, समिती सदस्य यांचेशी दि.०७.१२.२०१६ रोजी दुध्वनीवरुन चर्चा केली असता, त्यांनी पारस जैन, शिर्डी यांना साई भजन कार्यक्रमाचे मानधन रु.५१,०००/- देणेस संमती दिलेली आहे.

जागतीक साईमंदिर संमेलनात साईभक्त स्थानिक गायक श्री. पारस जैन, शिर्डी यांचा दि.११.१२.२०१६ रोजी सकाळी ८.३० ते १०.०० असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला, सदर कार्यक्रमाचे एकत्रित मानधन रु.५१,०००/- (अक्षरी रुपये एक्कावन्न हजार ) मात्र कार्यक्रमस्थळी त्यांना अदा करण्यात आले आहे.

तरी श्री.पारस जैन, शिर्डी यांना अदा करण्यात आलेल्या मानधनाची रक्कम रु.५१,०००/- (अक्षरी रुपये एक्कावन्न हजार ) मात्रचे खर्चास कार्योत्तर मंजूरीसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.९५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **शिर्डी महोत्सव- २०१६ मध्ये "सबका मालिक एक" या महानाट्याचे प्रयोगा ऐवजी कलाकारांचे कार्यक्रम आयोजीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ चे सभेत निर्णय क्र.८१३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय पारित झालेला आहे.

"दरवर्षाप्रमाणे याही वर्षी शिर्डी महोत्सव २०१६ साजरा करणेस मान्यता देण्यात आली. परंतु त्यासाठी रु.१५,५०,०००/- येणारा अंदाजित खर्च खुपच जास्त वाटतो, असे समितीचे मत झाले. याकरीता शिर्डी महोत्सव २०१६ मध्ये दि.३१.१२.२०१६ रोजी "सबका मालिक एक" या महानाट्याचे प्रयोग ठेवण्यात यावे," असे ठरले आहे.

त्यानुसार महानाट्याचे कार्यकारी निर्माता श्री.प्रशांत डांगे यांचेशी दि.१६.१२.२०१६ रोजी चर्चा केली असता त्यांनी सांगितले की,शिर्डी महोत्सवासाठी दिवस कमी राहिले असल्यामुळे सदर कार्यक्रम ठेवावयाचा नाही. याबाबत मा. कार्यकारी अधिकारी व मा.श्री. सचिन तांबे, समिती सदस्य यांचेशी चर्चा झाली आहे. तसेच प्र.अधीक्षक, आस्थापना विभाग यांनी दि.१६.१२.२०१६ रोजी मा.श्री. सचिन तांबे, समिती सदस्य यांचेशी प्रत्यक्ष याबाबत चर्चा केली आहे.

शिर्डी महोत्सव २०१६ मध्ये "सबका मालिक एक" या महानाटयाचे प्रयोगा ऐवजी खालील प्राप्त ८ कलाकारांतून विनामुल्य कार्यक्रम करणा-या कलाकाराचे कार्यक्रमाचे आयोजन करता येईल.

**अ) प्राप्त झालेल्या अर्जाचा तपशील खालीलप्रमाणे.**

| अ.न. | अर्ज दाखल तारीख | कलाकारांचे नाव व पत्ता | कार्यक्रम | कलाकार संख्या | मानधन अपेक्षा |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | ३१/१०/२०१६ | श्री पारस जैन व प्रविण महामुनी, शिर्डी ९८२२५४६८१७ | साई भजन संध्या | १० | विनामुल्य |
| ०२ | ०९/१०/२०१६ | पुनम खन्ना, दिल्ली ९८१००३४८७२ | साई भजनसंध्या | १० | विनामुल्य |
| ०३ | २०/११/२०१६ | श्री.अनिल कुमार मिस्कीन, हुबळी ९५३८२४३९९९ | एम शाम साई के नाम | १० ते १५ | विनामुल्य |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०४ | २५/११/२०१६ | श्री.सच्चिदानंद आप्पा, मुंबई ९८२०१४८६७८ | एक शाम साई के नाम भक्ती संगीताचा कार्यक्रम | २० ते २५ | विनामुल्य |
| ०५ | ०८/०९/२०१६ | श्री.अवघेश चन्दन भारव्दाज, लखनऊ ९४५१७६५२४४ | साईभजन संध्या | १५ | विनामुल्य |
| ०६ | ०७/१०/२०१६ | श्री. अनंत पांचाळ, मुंबई | साई गितांचा कार्यक्रम | १५ | रु.४५०००/- |
| ०७ | १४/११/२०१६ | श्री.आर.के. सक्सेना, नवीदिल्ली ०९८१११२६४३६ | साईभजन संध्या | १० | रु.२१०००/- |
| ०८ | ०७/११/२०१६ | श्री विजय साखरकर, मुंबई ९८२१३९३३२३ | बाबा मेलोडिज | ३५ | रु.२७०००/- |

**ब) मागील वर्षी २०१५ मध्ये खालीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले होते.**

| **अ.नं.** | **कलाकाराचे नाव व पत्ता** | **कार्यक्रम / वेळ** |
|---|---|---|
| १. | श्री.अवघेज चंदन भारव्दाज, लखनऊ | साई भजन संध्या सायं ६.०० ते ७.०० |
| २. | श्री. मोहन शर्मा | साई भजनसंध्या सायं ७.०० ते ०८.०० |
| ३. | श्री.अनिल कुमार, हुबळी | एक शाम साई के नाम रात्रौ.८.०० ते ०९.०० |
| ४. | पुनम खन्ना, दिल्ली | साई भजन संध्या सायं ९.०० ते १०.०० |
| ५. | विजय साखरकर, मुंबई | साई-स्वर नृत्योत्सव रात्रौ.१०.०० ते ११.०० |
| ६. | श्रावण बाळ, मुंबई | झाले तुझे दर्शन साई रात्रौ.११.०० ते १२.०० |

यावर्षी ३१ डिसेंबर २०१६ चे रात्रौ साजरा होणा-या शिर्डी महोत्सव कार्यक्रमासाठी उपरोक्त (**अ** मधील) अर्ज केलेल्या ०८ कलाकारातून विनामुल्य कार्यक्रम करणा-या ०५ कलाकारांची निवड करुन त्यांना सायं. ६.०० ते रात्रौ.१२.०० या वेळेत कार्यक्रम देता येईल.

निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी महोत्सव- २०१६ साजरा करणेकामी प्रस्तावात नमुद केलेल्या अ तक्त्यामधील अ.नं.१ ते ५ या विनामुल्य सेवा देणाऱ्या कलाकारांचे उपलब्ध वेळेत (सायंकाळी ०७ ते रात्रौ १२.०० वाजेपर्यंत) कार्यक्रम आयोजित करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **सचिव, शताब्दी महोत्सव समिती, शेवगांव यांना अखंड हरिनाम सप्ताह निमित्त तात्पुरत्या कालावधीकरीता फिरते शौचालय देणेबाबत.**

**प्रस्ताव-** सचिव, शताब्दी महोत्सव, शेवगाव यांनी, जा.क्र.०२/२०१६ दि.१४/१२/२०१६ चे पत्राने, "वारकरी शिक्षण संस्था, आळंदी" च्या शताब्दी महोत्सवी वर्षानिमीत्त शेवगाव येथे विश्वविक्रमी पसायदान व कृषी-विज्ञान प्रदर्शनासह भव्य दिव्य विना देणगी विना यानधन या तत्त्वावर आधारे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमास निवासी लोकांची संख्या जास्त असल्याने स्वच्छतेच्या दृष्टीने शौचालय आवश्यक आहेत.

आपल्या संस्थानच्या सामाजीक दृष्टीकोण लक्षात घेऊन आम्ही आपणाकडे दि.३० डिसेंबर २०१६ ते दि.०६ जानेवारी २०१७ या कालावधीसाठी आपल्याकडील २ फिरते शौचालय मिळावे या साठी विनंती करत आहोत. शताब्दी महोत्सवाची व्याप्ती लक्षातघेता आपण या विनंतीचा सकारात्मक विचार करावा ही नम्र विनंती", असे कळविलेले आहे.

श्री साईबाबा संस्थानचे वाहन विभागाकडे ०९ फिरते शौचालय आहेत. उपरोक्त मागणी तात्पुरत्या स्वरुपाची असलेने २ नग फिरते शौचालय वाहन विभागातुन घेवुन जाणे व मुदतीनंतर सुस्थितीत परत आणणे या अटीवर सचिव, शताब्दी महोत्सव, शेवगाव यांना उपलब्ध करुन देता येतील.

तरी उपरोक्त प्रमाणे शताब्दी महोत्सव, शेवगाव यांना दि.३०/१२/२०१६ ते दि.०६/०१/२०१७ पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात २ नग फिरते शौचालय देणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शताब्दी महोत्सव समिती, शेवगांव यांचे मागणीप्रमाणे अखंड हरिनाम सप्ताहाचे कार्यक्रमासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी दि.३०/१२/२०१६ ते दि.०६/०१/२०१७ या कालावधीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात २ नग फिरते शौचालय देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१०** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष निमित्ताने ऑक्टोंबर- २०१७ ते ऑक्टोंबर- २०१८ (विजयादशमी) अखेर या कालावधीत प्रत्येक गुरुवारी समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी व गुरुस्थान या ठिकाणी दर्शनी भागात फुलांची सजावट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा समाधी महाशताब्दी वर्ष ऑक्टोंबर 2017 ते ऑक्टोंबर 2018 (विजयादशमी) अखेर या कालावधी साजरा करण्यात येणार आहे. श्री साईबाबा समाधी महाशताब्दी वर्षानिमित्त ऑक्टोंबर 2017 ते ऑक्टोंबर 2018 (विजयादशमी) अखेर या कालावधीत प्रत्येक गुरुवारी समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी दर्शनी भागात फुलांची सजावट करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

दि.14/07/2016 रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्रं.58 व निर्णय क्रं.443 अन्वये, श्री साईबाबा समाधी महाशताब्दी महोत्सव सुरु होण्यास बराचसा कालावधी असल्यामुळे ऑक्टोंबर 2017 ते ऑक्टोंबर 2018 या कालावधीत प्रत्येक गुरुवारी समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी दर्शनी भागात फुल सजावट करणेची सेवा घेणेकामी तात्काळ संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, देणगीदार साईभक्तांना आवाहन करणेत यावे व श्री साईबाबा महाशताब्दी महोत्सव सुरु होण्यापुर्वी जे दिवस बुक झालेल्या नाहीत, अशा दिवशी संस्थानमार्फत फुलांची सजावट करणेसाठी येणाऱ्या अपेक्षीत खर्चाचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा असे ठरले आहे.

त्यानुसार माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे तसेच बांधकाम विभागामार्फत संस्थान परिसरात फलक लावुन दानशुर साईभक्तांना आवाहन करण्यात आलेले आहे

संस्थानचे लेखाशाखा विभागामार्फत महाशताब्दी या नावाने एक स्वतंत्र खाते (अकाऊंट) उघडण्यात आलेले असुन साईभक्तांमार्फत महाशताब्दी निमित्त फुलसजावट करणेकामी येणारी देणगी स्वरुपात रक्कम सदर खात्यात जमा करण्यात येत आहे. सदर खात्यात जमा होणाऱ्या रक्कमेतुन श्री साईबाबा समाधी महाशताब्दी निमित्त ऑक्टोंबर 2017 ते ऑक्टोंबर 2018 (विजयादशमी) अखेर या कालावधीत येणाऱ्या प्रत्येक गुरुवारी (अंदाजे 56 गुरुवार) समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी दर्शनी भागात फुलांची सजावट करावयाची आहे. तसेच महाशताब्दी महोत्सव सुरु होणेपुर्वी जे दिवस बुक झालेले नाहीत अशा दिवशी संस्थानमार्फत फुलांची सजावट करावयाची आहे.

श्री साईबाबा समाधी महाशताब्दी निमित्त प्रत्येक गुरुवारी फुलांची सजावट करणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन तसेच "इ" निवीदा शासनाच्या वेबसाईट वर प्रसिध्द करुन निवीदा मागविता येईल. प्राप्त होणाऱ्या निवीदेत ज्या फुलसजावट करणाऱ्या कारागीरांचा फुलसजावटीचा दर न्युनत्तम असेल त्यांचेकडुन श्री साईबाबा समाधी महाशताब्दी निमित्त ऑक्टोंबर 2017 ते ऑक्टोंबर 2018 (विजयादशमी) अखेर या कालावधीत येणाऱ्या प्रत्येक गुरुवारी (अंदाजे 56 गुरुवार) फुलांची सजावट करुन घेता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष निमित्ताने ऑक्टोंबर- २०१७ ते ऑक्टोंबर- २०१८ (विजयादशमी) अखेर या कालावधीत प्रत्येक गुरुवारी समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी व गुरुस्थान या ठिकाणी दर्शनी भागात फुलांची सजावट करणेकामी फुलसजावट करणाऱ्या कारागीरांकडून विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु देणगीदार साईभक्तांनी आरक्षीत केलेले गुरुवार त्यामधून वगळणे यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.११** **संस्थान परिसरातील धोकादायक झाडांची छाटणी केलेल्या कामास कार्योत्तर मंजुरीमिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.14/08/2016 रोजी संस्थानचे जुने साईप्रसाद इमारत परिसरात निलगीरीच्या झाडाची फांदी अचानक मोडुन खाली पडल्याने चार साईभक्तांना किरकोळ इजा झालेली होती. सदर निलगीरीच्या झाडाची फांदी ही हिरवीगार असुन ती जोराचा वारा आल्याने मोडुन खाली पडलेली होती. सदर फांदी एकदम हिरवीगारअसल्याने ती पडण्याची कोणतीही शक्यता नव्हती. तरी हे सर्व अचानक घडल्यामुळे तातडीने विभागाचे कर्मचारी बोलवुन फांदीची कटींग करुन घेण्यात आलेली होती.

दि.14/08/2016 रोजी रविवारची गर्दी असल्यामुळे श्री बिपीनदादा कोल्हे-विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचा संस्थान परिसरात राऊंड चालु असताना ही घटना घडली. त्यावेळी त्यांनी

संस्थान परिसरातील साईभक्तांच्या संर्पकात असणारी सर्व धोकादायक झाडांची छाटणी तात्काळ करुन परत घटना घडणार नाही याची दक्षता घ्यावी असे सुचविलेले होते.

त्यामुळे दि.18/08/2016 रोजीच्या मंजुर टिपणी अन्वये, मागविलेल्या दरपत्रकानुसार श्री विजय एकनाथ सदाफळ, रा.वाकडी यांचेकडुन प्रति टन रु1,000/- (एक हजार) मात्र दराने मंदिर परिसरातील धोकादायक झाडांची छाटणी करुन सरपण घेऊन जाणेकामी मान्यता घेण्यात आलेली होती. श्री सदाफळ यांनी प्रति टन रु.1,000/- (एक हजार) मात्र दराने मंदिर परिसरातील धोकादायक झाडांची छाटणी करणेच्या कामाची मजुरी जास्त होत असल्याने व ते परवडत नसल्यामुळे त्यांनी पुढील काम करण्यास नाकार दिलेला आहे. त्यामुळे पुढील कोटेशन धारकांना विचारणा केली असता त्यांनी सरपणाच्या किंमतीपेक्षा मजुरी जादा होत असल्यामुळे त्यांनी ही काम करण्यास नाकार दिला.

त्यानंतर इतर वखारवाल्यांशी संपर्क साधला असता आवक नं.10587 दि. 12/09/2016 अन्वये, अन्सार लाकुड सप्लायर्स ॲन्ड क्रेन सर्व्हीसेस, बाभळेश्वर यांनी मागील दराप्रमाणे म्हणजे प्रति टन रु.1,000/- मात्र दराने मंदिर परिसरातील धोकादायक झाडे छाटणी करुन सरपण घेऊन जाणार असलेबाबत कळविलेले होते. त्यानुसार दि.13/09/2016 रोजीच्या मा. कार्यकारी अधिकारी यांच्या मंजुर टिपणी अन्वये, त्यांना परवानगी देण्यात आलेली होती.

त्यानुसार संस्थानकडे धुणीसाठी मोठ्या प्रमाणात लाकडे उपलब्ध असल्याने तसेच झाडांची लवकरात लवकर छाटणी करणे गरजेचे असल्याने अन्सार लाकुड सप्लायर्स ॲन्ड क्रेन सर्व्हीसेस, बाभळेश्वर यांचेकडुन मंदिर परिसरात ज्या ठिकाणी भक्तांची गर्दी होते त्या ठिकाणी दत्त मंदिराजवळील झाड, लेंडीबागेतील रेन ट्रिचे झाड, गेट नं. 1 व इतर गेटच्या तसेच साईबाबा हॉस्पीटल जवळील गुलमोहर,रेन ट्रिची, जुने साईप्रसाद येथील निलगीरी व संस्थान परिसरातील भक्तनिवास व भक्तांच्या दर्शनलाईन शेडवरील अन्य धोकादायक झाडे छाटणीचे काम पुर्ण करुन घेण्यात आलेले आहे. सदर लाकडाचे राहाता बाजार समितीच्या काट्यावर वजन करण्यात आलेले आहे. त्यानुसार एकुण 104.320 टन (104 टन 320 किलो) लाकडाची विक्री करण्यात आलेली असुन त्यापासुन संस्थानला रु.1,04,320/- (एक लाख चार हजार तिनशे विस) मात्र रुपये मिळालेले आहे. तरी सदर रक्कमेचा लेखाशाखेत भरणा करण्यात आलेला आहे.

तरी सदरचा प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीसाठी सादर.

**निर्णय क्र.९५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरातील धोकादायक झाडांची छाटणी करणेकामी प्रस्तवात नमुद केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१२** **पत्रावळ चार कप्प्याची खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्रसादालयाचे वार्षिक मागणीप्रमाणे सन २०१६-१७ साठी पत्रावळ चार कप्प्याची – १५ लाख खरेदीकामी मे.खुशी एजन्सीज, नाशिक यांना जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/१२६५/२०१६ दिनांक ११.०६.२०१६ अन्वये रु.१.५० प्रती नग या दराने पुरवठा आदेश देण्यात आला होता.

जुन-२०१६ ते नोव्हेंबर-२०१६ अखेर खालीलप्रमाणे पत्रावळ खरेदी करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | महिना | चलन मागणी नग | पुरविलेली पत्रावळ नग | येणे बाकी पत्रावळ नग |
|---|---|---|---|---|
| १ | जुन-२०१६ | ५,००,००० | १,६०,००० | - |
| २ | जुलै-२०१६ | १०,००,००० | ८,००,००० | - |
| ३ | ऑगस्ट-२०१६ | - | ८०,००० | ४,६०,००० |
| ४ | सप्टेंबर-२०१६ | - | - | - |
| ५ | ऑक्टोबर-२०१६ | - | - | - |
| ६ | नोव्हेंबर-२०१६ | - | - | ४,६०,००० |

प्रसादालय विभागाने डिसेंबर-२०१६ महिन्यामध्ये ९,४०,००० नग पत्रावळींची मागणी केली आहे. तथापि सन २०१६-१७ पुरवठा आदेशातील मागणी संपलेली आहे. परंतु वरीलप्रमाणे ४,६०,००० नग पत्रावळ मे.खुशी एजन्सीज, नाशिक यांचेकडून येणे बाकी आहे ती पत्रावळ या महिन्यात मागवून घेता येईल. तसेच संस्थान व मे.खुशी एजन्सीज, नाशिक यांचेमध्ये करारनामा झालेला आहे. त्यातील अट क्र.८ अशी आहे.

अट क्र.८– प्रसंगी निविदा कालावधीत व तद्नंतरही पुढील वर्षाची ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत नमुद केलेल्या मालापेक्षा २५% इतका जादा माल मंजुर दरानेच पुरविणे पार्टी नं.२ यांचेवर बंधनकारक राहील

वरील अटी-शर्तीनुसार एकुण पुरवठा आदेशाच्या १५ लाख मागणीच्या २५% म्हणजेच ३,७५,००० नग पत्रावळ चार कप्प्याची प्रती नग रु.१.५० या मागील दराने मे.खुशी एजन्सीज, नाशिक यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणारे ५,६२,५००/- (रु. पाच लाख बासष्ट हजार पाचशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदर विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयामध्ये आवश्यक असलेल्या चार कप्प्यांच्या पत्रावळ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे करारनाम्याच्या अटी/शर्तीवर मे.खुशी एजन्सीज, नाशिक यांचेकडून मागील मंजुर दराने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **साई मंदिर संमेलनासाठी केलेल्या किराणामाल खरेदीचे कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक ११.१२.२०१६ चे कार्यक्रमासाठी किराणामालाचे कोटेशन ११ कोटेशनधारकांकडून मागविणेत आले होते. तसेच याबाबत संस्थानचे संकेतस्थळावर कोटेशन पत्र प्रसिद्ध करण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०५ कोटेशन्स प्राप्त झाली होती.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव |
|---|---|
| १. | मे.के.एल.चुग अॅन्ड कंपनी, राहाता |
| २. | मे.यशोदा सुपर मार्केट, श्रीरामपूर |
| ३. | मे.पुष्कर ट्रेडर्स, शिर्डी |
| ४. | मे.कर्डीले सुपर मार्केट, राहाता |
| ५. | मे.साईसुख सुपर मार्केट, शिर्डी |

सदर कोटेशन्स उघडणेकामी मा.उपसमिती सभेची टिपणी सादर करण्यात आली होती. तथापि सध्या उपसमिती सभा होणार नसल्यामुळे, दिनांक ०७.११.२०१६ रोजीचे स्थानिक उपसमिती सभेतील निर्णय क्र.३० (८) नुसार सदरचे कोटेशन्स एक विशेष बाब म्हणून मा.श्री.सचिन तांबे, स्थानिक विश्वस्त यांचेसमोर उघडण्यात आली आहेत.

सदर कोटेशनचा तुलनात्मक तक्ता सादर केला आहे. यातील ३६ Items खरेदी करणेकामी खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**अ.** तुलनात्मक तक्त्यातील अ.नं.१,३,४,५,७,८,१०, १२,१३,१४,१५, १७,१८,१९,२०, २२,२३,२४,२५, २८, २९, ३०,३२ व ३६ या २४ Items साठी न्युनतम दरधारक यांना पुरवठा आदेश देणेस,

**आ.** तुलनात्मक तक्त्यातील अ.नं.२ बासमती तांदुळसाठी, बासमती तांदुळाचे पाच नमुने प्रसादालय विभागाकडे गुणवत्तेनुसार अभिप्राय देण्यासाठी पाठविले होते. त्यास अनुसरुन खरेदी विभागाने दिलेल्या लेखी पत्राचे पाठपोट पानावर प्रसादालयाने गुणानुक्रमानुसार क्र.१ वर मे.यशोदा सुपर मार्केट, श्रीरामपुर यांची शिफारस केली आहे व त्यांचे नमुन्यातून काही तांदुळ काढून सर्व नमुना पाकिटे खरेदी विभागाकडे परत पाठविले आहेत.

मे.यशोदा सुपर मार्केट, श्रीरामपुर यांचे बासमती तांदुळाचे दर प्रती किलो रु.९०/- मात्र आहेत. या दराने तांदुळ खरेदीकामी रक्कम रु.३६,०००/- (रुपये छत्तीस हजार) मात्र खर्च येईल.

तरी प्रसादालय विभागाकडील शिफारशीनुसार मे.यशोदा सुपर मार्केट, श्रीरामपुर यांना पुरवठा आदेश देणेस,

**इ.** तुलनात्मक तक्त्यातील अ.नं.६,९,११,१६ व २६ या ०५ Items साठी समान दर आलेले आहेत. यामध्ये मालाची तातडीची गरज लक्षात घेता वेळेवर पुरवठा होण्याच्या दृष्टीने स्थानिक कोटेशनधारकांना प्राधान्य देऊन त्यानुसार अ.नं.६ पिस्ता (कतरन)- मे.के.एल.चुग अॅण्ड कंपनी, राहाता, अ.नं.९ प्रविण चटपट मसाला, अ.नं.११ अंबारी चटपट मसाला व अ.नं.२६ निरमा पावडर मे.पुष्कर ट्रेडर्स, शिर्डी, अ.नं.१६ सफेद मिरी पावडर- मे.साई सुख सुपर मार्केट, शिर्डी यांना पुरवठा आदेश देणेस,

**ई.** तुलनात्मक तक्त्यातील अ.नं.२१ टमाटर सॉससाठी न्युनतम दर रु.४०/- प्रती किलो रॉयल लोणी ब्रॅण्डसाठी व वरुण कंपनीचे ब्रॅण्डसाठी प्रती किलो रु.५०/- आलेले आहेत. तथापि याबाबत आचारी यांचेशी संपर्क केला असता त्यांनी प्रविण कंपनीचे सॉस घेणेबाबत सुचना केलेली आहे. त्यानेसार प्रविण कंपनीचा टोमॅटो सॉस रु. ११०/- प्रती किलो दराने खरेदी करणेस,

**उ.** तुलनात्मक तक्त्यातील अ.नं.२७ मिरची पावडर कोटेशन मागणी पत्रामध्ये बालाजी कंपनीची मागविण्यात आली होती, तथापि न्युनतम दर रु.१८०/- प्रतीकिलो पुष्प या कंपनीचे प्राप्त झालेले आहेत व बालाजी कंपनीची मिरची पावडरसाठी दर रु.१९०/- प्रती किलो दर प्राप्त आहेत. आचाऱ्यांना बालाजी कंपनीची मिरची पावडर आवश्यक असल्यामुळे मे.यशोदा सुपर मार्केट, श्रीरामपुर यांचेशी दरांबाबत संपर्क साधला असता, ते सदर मिरची पावडर न्यूनतम दर रु.१८०/- प्रती किलोने पुरविणेस तयार आहेत, त्यांना पुरवठा आदेश देणेस,

**ऊ.** तुलनात्मक तक्त्यातील अ.नं.३१,३३,३४,३५ यामध्ये मे. कर्डीले सुपर मार्केट, राहाता यांचे दर न्युनतम आहेत. परंतू हे दर जनता कंपनीचे रंगासाठी आहेत, त्यामुळे त्यांचे दराचा विचार करता येणार नाही. आचारी यांनी बुश कंपनीचे रंग घेण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार अ.नं.३१,३३,३४,३५ साठी

उर्वरीत चार निविदाधारकांपैकी प्रत्येक आयटेमसाठी दोन निविदा धारकांचे दर समान आहेत. यामध्ये मालाची तातडीची गरज लक्षात घेता वेळेवर पुरवठा होण्याच्या दृष्टीने स्थानिक कोटेशनधारकांना प्राधान्य देऊन त्यानुसार मे. पुष्कर ट्रेडर्स, शिर्डी यांना पुरवठा आदेश देणेस,

**ऋ.** मालाची तातडीची गरज असल्यामुळे कोटेशन पत्रातील अ.नं.९ व १० ची अट शिथिल करुन पुरवठा आदेश देणेस,

**ॡ.** अ ते ऋ नुसार खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देणेस व येणारे रक्कम रु.१,०५,३३४/- मात्रचे एकुण खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेस,

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नांव | पुरवठा आदेश रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | मे.के.एल.चुग ॲण्ड कंपनी, राहाता | २८,७६४/- |
| २ | मे.पुष्कर ट्रेडर्स, शिर्डी | २४,३२५/- |
| ३ | मे.कर्डीले सुपर मार्केट, राहाता | ९,०९०/- |
| ४ | मे.साई सुख सुपर मार्केट, शिर्डी | २,०५५/- |
| ५ | मे.यशोदा सुपर मार्केट, श्रीरामपुर | ४१,१००/- |
| | **एकुण रक्कम रुपये** | **१,०५,३३४/-** |

वरील **"अ", ते "ॡ",** मध्ये मध्ये नमुद केलेप्रमाणे करावयाचे कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर.

**निर्णय क्र.९५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई मंदिर संमेलनासाठी किराणामाल खरेदीकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस व त्याकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **साई मंदिर संमेलनासाठी केलेल्या म्हशीचे दुध व पनीर खरेदीचे कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक ११.१२.२०१६ चे कार्यक्रमासाठी म्हशीचे दूध व पनीर खरेदीकामी कोटेशनधारकांकडून मागविणेत आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०५ कोटेशन्स प्राप्त झाली होती.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | ब्रॅण्ड |
|---|---|---|
| १. | मे.श्री स्वामी समर्थ डिस्ट्रिब्युटर्स, तिसगांव | राजहंस |
| २. | मे.के.के.मिल्क, सावळीविहीर | केके मिल्क |
| ३. | मे.प्रभात डेअरी प्रा.लि., टिळकनगर | प्रभात |
| ४. | मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगांव | गोदावरी |
| ५. | मे.ओम गुरुदेव एजन्सीज, शिर्डी | अमुल |

सदर कोटेशन्स उघडणेकामी मा.उपसमिती सभेची टिपणी सादर करण्यात आली होती. तथापि सध्या उपसमिती सभा होणार नसल्यामुळे, दिनांक ०७.११.२०१६ रोजीचे स्थानिक उपसमिती सभेतील निर्णय क्र.३० (८) नुसार सदरचे कोटेशन्स एक विशेष बाब म्हणून मा.श्री.सचिन तांबे, स्थानिक विश्वस्त यांचेसमोर उघडण्यात आली आहेत.

सदर कोटेशनचा तुलनात्मक तक्ता सादर केला आहे. म्हशीचे दूध व पनीर खरेदी करणेकामी खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**अ.** तुलनात्मक तक्त्यातील अ.नं.१ म्हशीचे दूधासाठी मे.प्रभात डेअरी प्रा.लि., टिळकनगर यांचे दर न्युनतम आहेत. त्यास अनुसरुन १३०० लिटर म्हशीचे दूध खरेदीकामी प्रती लिटर रु.४२/- प्रमाणे एकूण रक्कम रु.५४,६००/- (रुपये चोपन्न हजार सहाशे) मात्र खर्च येईल. त्याप्रमाणे मे.प्रभात डेअरी प्रा.लि., टिळकनगर यांना एक लीटरचे पॅकिंग पिशवीमध्ये पुरविणेकामी पुरवठा आदेश देणेस,

**आ.** तुलनात्मक तक्त्यातील अ.नं.२ पनीरसाठी, पनीरचे पाच नमुना पाकिटे प्रसादालय विभागाकडे गुणवत्तेनुसार अभिप्राय देण्यासाठी पाठविले होते. त्यास अनुसरुन खरेदी विभागाने दिलेल्या लेखी पत्राचे पाठपोट पानावर प्रसादालयाने गुणानुक्रमानुसार क्र.१ वर मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगांव यांची शिफारस केली आहे व पनीरचे सर्व नमुने खरेदी विभागाकडे परत केले आहेत.

मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगांव यांचे पनीरचे दर प्रती किलो रु.२५०/- मात्र आहेत. या दराने पनीर ८० किलो खरेदीकामी एकुण रक्कम रु.२०,०००/- (रुपये वीस हजार) मात्र खर्च येईल.

तरी प्रसादालय विभागाकडील शिफारशीनुसार मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगांव यांना पुरवठा आदेश देणेस,

**इ.** वरील अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे रक्कम रु.५४,६००/- + आ मध्ये नमूद केल्याप्रमाणे रक्कम रु.२०,०००/- असे मिळून एकुण रक्कम रु.७४,६००/- (रुपये चौ-याहत्तर हजार सहाशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस व सोबत सादर केलेल्या दोन्हीही पुरवठा आदेशांवर स्वाक्षरी होणेस,

वरील **"अ" "आ" व "इ"** मध्ये नमुद केलेप्रमाणे करावयाचे कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर.

**निर्णय क्र.९५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई मंदिर संमेलनासाठी म्हशीचे दुध व पनीर खरेदीकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस व त्याकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **संस्थानचे रुग्णालयात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत परिचारक/ परिचारीका यांचे नेमणूक व मानधनाबाबत.**

**प्रस्ताव-** दि. २५/०६/२००८ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीस अनुसरुन आलेल्या पात्र अर्जदारांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या. सदर मुलाखतीच्या अहवालाबाबत दि. १८/१०/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन, बिंदु नामावलीनुसार प्रवर्गातील पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्याने मुलाखतीत पात्र ठरलेल्या उमेदवारांना ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक देणेबाबत निर्णय घेणेत आला होता. त्यानुसार त्यांना ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात नेमणूका देण्यात आलेल्या आहेत. त्यानंतरही मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार आजतागायत वेळोवेळी ११ महिने कालावधीसाठी नेमणूका देणेत आलेल्या आहेत. तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि. २८/०८/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६६६ नुसार सदर परिचारक/ परिचारीका तसेच कंत्राटदारामार्फत कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या व नव्याने घेण्यात येणा-या परिचारक/ परिचारीका यांना प्रतिमहा रु.११,०००/- वेतन देण्यात येत आहे.

मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.१६/०२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६७ नुसार खालील परिचारक/ परिचारीका यांना पुढील ११ महिन्याचे कालावधीसाठी नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. तसेच त्यांना कायम कर्मचा-यांप्रमाणेच फक्त अर्जित रजा देण्यात येत आहेत. त्यानुसार त्यांची ११ महिने कालावधीची तात्पुरती नेमणूक माहे जानेवारी २०१६ ते माहे जुलै २०१६ चे दरम्यान संपुष्टात येत आहे.

| अ.नं. | नाव | हजर तारीख | ११ महिने मुदत संपुष्टत येत असलेची तारीख |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ०१. | कु. मनिषा स्टिफन आवारे | १३/०२/२०१६ | १२/०१/२०१७ |
| ०२. | कु. आशुमती संपत सदाफुले | १५/०२/२०१६ | १४/०१/२०१७ |
| ०३. | श्रीमती वैशाली भगवान महागडे | १५/०२/२०१६ | १४/०१/२०१७ |
| ०४. | कु. कांचन विनायक शिंदे | १९/०२/२०१६ | १८/०१/२०१७ |
| ०५. | श्री. आशिष शरद सुर्यवंशी | १९/०२/२०१६ | १८/०१/२०१७ |
| ०६. | सौ. आशा रमेश जगताप | १२/०३/२०१६ | ११/०२/२०१७ |
| ०७. | कु. प्रतिमा रामचंद्र कोळगे | १४/०३/२०१६ | १३/०२/२०१७ |
| ०८. | श्री. राहुल प्रकाश ओहोळ | २३/०३/२०१६ | २२/०२/२०१७ |
| ०९. | कु. प्राजक्ता दिपक जाधव | १६/०५/२०१६ | १५/०४/२०१७ |
| १०. | श्रीमती कावेरी सुदाम म्हस्के | २५/०५/२०१६ | २४/०४/२०१७ |
| ११. | सौ. रुथ निलेश श्रीवास्तव | ०५/०६/२०१६ | ०४/०५/२०१७ |
| १२. | कु. कविता योसेफ पंडीत | १५/०८/२०१६ | १४/०७/२०१७ |

प्र. वैद्यकीय अधिक्षक व प्र. वैद्यकीय संचालक यांनी "उपरोक्त नमुद केलेले परिचारक / परिचारीका यांचे काम समाधानकारक असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करतात. त्यांचेबाबत काहीही प्रकरण चालु अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही" असा अहवाल दिलेला आहे.

तरी, उपरोक्त तक्त्यातील अ.नं. ०१ ते १२ परिचारक / परिचारीका यांना त्यांचे नावासमोर स्तंभ क्र. ०४ मध्ये दर्शविलेल्या तारखेनंतर पुढील ११ महिने कालावधीसाठी अथवा आरक्षित वर्गासाठी उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात नेमणूका देणेकामी मान्यता असावी.

मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.९६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे रुग्णालयात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या प्रस्तावित परिचारक/ परिचारीका यांची मुदत संपुष्टातयेत असलेच्या दिनांकापासुन पुढे ११**

**महिने कालावधीसाठी अथवा आरक्षित वर्गासाठी उमेदवार उपलब्ध होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात नेमणूका देण्यात याव्या, असे ठरले.**

**तसेच संस्थान रुग्णालयामधील परिचारीका/ परिचारक यांची रिक्त पदे मुलाखतीद्वारे कंत्राटी पध्दतीने भरणेत यावीत, अशा सुचना केल्या.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **सन २०१६- १७ आर्थिक वर्षासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अंतर्गत लेखापरिक्षक यांनी दि.०१ एप्रिल, २०१६ ते दि.३० जुन, २०१६ अखेरचा संस्थान तिमाही अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल अवलोकनार्थ सादर.**

**प्रस्ताव-** मा.त्रिसदस्यीय समितीच्या.दि.१९.०५.२०१६ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.३१० अन्वये न्युनतम फी मागणी करणा-या लेखापरिक्षण संस्थेस अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता व पुढील आदेश होईपर्यत नियुक्ती आदेश देण्यास व त्यांनी असमर्थता दर्शविल्यास त्यानंतरच्या न्युनतम फी मागणी करणा-या लेखापरिक्षण संस्थेस नियुक्ती आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन संदर्भ क्र.०२ अन्वये, मे.एम.ए.पी.एस.व्ही अॅन्ड असोसिएटस. चार्टर्ड अकौटंटस, नासिक यांना सन २०१६-१७ या कालवधीकरिता संस्थान व हॉस्पिटल विभागासाठी अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून रक्कम रु.५७,०००/-मात्र प्रति वर्षी इतक्या फी वर नेमणुक आदेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार त्यांनी संस्थान व हॉस्पिटल विभागाकडील दि.०१ एप्रिल,२०१६ ते दि.३० जून,२०१६ अखेर पर्यंतचे लेखापरिक्षण करुन त्याचा तिमाही लेखापरिक्षण अहवाल मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचेकडे सादर केलेला आहे.

सदर अहवालातील त्रुटी, संबधीत विभागांना पाठविण्यात येऊन, त्याबाबतचा दोष-दुरुस्ती अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

तरी अंतर्गत लेखापरिक्षक मे.एम.ए.पी.एस.व्ही अॅन्ड असोसिएटस. चार्टर्ड अकौटंटस नासिक. यांनी संस्थानला दिलेला दि.०१ एप्रिल,२०१६ ते दि.३० जून,२०१६ या कालावधीचा संस्थान व हॉस्पिटल विभागाकडील अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल अवलोकनार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.९६१** **यावर सविस्तर चचा्र होऊन, अंतर्गत लेखापरिक्षक मे.एम.ए.पी.एस.व्ही अॅन्ड असोसिएटस. चार्टर्ड अकौटंटस नाशिक यांनी दिलेल्या दि.०१ एप्रिल, २०१६ ते दि.३० जुन, २०१६ या कालावधीतील संस्थान व हॉस्पिटल यांच्या अंतर्गत लेखापरिक्षण अहवालाचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **अध्यक्ष, सदगुरु श्री गंगागीरीजी महाराज संस्थान, सरला बेट, ता. श्रीरामपुर यांना ज्ञानेश्वरी पारायण निमित्त तात्पुरत्या कालावधी करीता फिरते शौचालय देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अध्यक्ष, सदगुरु श्री गंगागिरीजी महाराज संस्थान, सरला बेट, ता.श्रीरामपुर यांनी दि.२०/१२/२०१६ चे पत्राने, "लाखो भावीकांचे श्रध्दा स्थान असलेले सदगुरु श्री गंगागिरीजी महाराज संस्थान (ट्रस्ट) सरलाबेट येथे सदगुरु श्रीयोगीराज गंगागिरीजी महाराज यांची ११४ वी पुण्यतिथी सालाबाद प्रमाणे दि.२२/१२/२०१६ ते दि.२९/१२/२०१६ या कालावधीत ज्ञानेश्वरी पारायण व किर्तन सोहळयासाठी भावीक जमतात तरी प्रतः विधीसाठी भावीकांची गैरसोय व प्रदुषण होऊ नये या साठी आपल्या नगर पालिकेकडून संस्थानसाठी दोन मोबाईल संडास व्हॅन मिळाव्यात ही विनंती" असे कळविलेले आहे.

श्री साईबाबा संस्थानचे वाहन विभागाकडे ०९ फिरते शौचालय आहेत. उपरोक्त मागणी तात्पुरत्या स्वरुपाची असलेने २ नग फिरते शौचालय वाहन विभागातुन घेवुन जाणे व मुदतीनंतर सुस्थितीत परत आणणे या अटीवर अध्यक्ष, सदगुरु श्री गंगागिरीजी महाराज संस्थान, सरला बेट, ता.श्रीरामपुर यांना उपलब्ध करुन देता येतील.

तरी उपरोक्त प्रमाणे अध्यक्ष, सदगुरु श्री गंगागिरीजी महाराज संस्थान, सरला बेट, ता.श्रीरामपुर यांना दि.२२/१२/२०१६ ते दि.२९/१२/२०१६ पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात २ नग फिरते शौचालय देणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे पुढील निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अध्यक्ष, सदगुरु श्री गंगागिरीजी महाराज संस्थान, सरला बेट, ता.श्रीरामपुर यांचे मागणीप्रमाणे श्रीयोगीराज गंगागिरीजी महाराज यांच्या ११४ व्या पुण्यतिथी कार्यक्रमासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी दि.२२/१२/२०१६ ते दि.२९/१२/२०१६ या कालावधीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात २ नग फिरते शौचालय देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **श्री साईबाबा संस्थान रुग्णालयामार्फत शिबीरांचे आयोजनाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.विश्वस्त श्री भाऊसाहेबजी वाकचौरे, श्री सचिनजी तांबे व श्री प्रतापराव भोसले यांनी दि०७/११/२०१६ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये भेट दिली होती. यावेळी मा.विश्वस्त श्री भाऊसाहेबजी वाकचौरे यांनी श्री साईबाबा संस्थान रुग्णालयामार्फत विविध ठिकाणी महिन्यातुन किमान दोन शिबीरांचे आयोजन करणेबाबत सुचना केलेली आहे. यावेळेस मा.विश्वस्त श्री प्रतापराव भोसले यांनी दि.२२/०१/२०१७ रोजी वळद-उंबरगाव, ता.श्रीरामपुर येथे शिबीराचे आयोजन करणेस सुचना केलेली आहे.

तसेच मा.विश्वस्त श्री प्रतापराव भोसले यांनी दि.१५/१२/२०१६ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटल येथे भेट दिली. यावेळेस दि.२८/१२/२०१६ रोजी वैजापूर येथे शिबीर आयोजीत करणेबाबत सुचना केलेली आहे. विनायकराव पाटील महाविदयालय वैजापूर व विश्वास फाऊंडेशन यांच्या संयुक्त विदयमानाने कै.विनायकराव पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त दि.२८ डिसेंबर २०१६ रोजी विनायकराव पाटील महाविदयालय वैजापूर येथे श्री साईबाबा संस्थान तर्फे सर्व रोग निदान शिबीर आयोजीत करण्यासंदर्भात त्यांचा विनंती अर्ज इकडील कार्यालयाकडे दि.१७/१२/२०१६ रोजी प्राप्त झाला आहे. शिबीरासाठी उपस्थितीत राहणा-या सर्व डॉक्टर व कर्मचा-यांची जेवनाची व शिबीराच्या प्रसिध्दीची व्यवस्था विश्वास फाऊंडेशन करणार आहे.

मागिल सहा महिन्यात अशाप्रकारचे चार शिबीरांचे आयोजन केले होते. सदर शिबीरांतील रुग्ण पुढील उपचाराकरीता संस्थान रुग्णालयात आले असता त्यांचे आजार व कागदपत्रांच्या आधारे संस्थान नियमानुसार अथवा राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेत पुढील उपचार/ शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत. परंतु काही रुग्णांचे आजार व कागदपत्रे संस्थान नियमानुसार सवलतीत अथवा राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेत बसत नसल्यास असे रुग्णही संपुर्ण मोफत उपचार/ शस्त्रक्रियांची मागणी करतात. तसेच अशा शिबीरांसाठी मोठ्या प्रमाणात औषधांचे मोफत वाटप करावे लागते अनेक औषधे भंडार विभागात उपलब्ध नसल्यास त्यांची तातडीने खरेदी करावी लागते. अनेक वेळा रुग्णालयात डॉक्टर व पॅरामेडीकल स्टाफची कमतरता भासते. यापुढेही अशा शिबीरांचे आयोजनासाठी शिबीरातील रुग्णांचे पुढील उपचार/ शस्त्रक्रियांच्या सवलती, औषधांची उपलब्धता, आवश्यक मनुष्यबळ याबबत तरतुद होणे गरजेचे वाटते. यांबाबत तरतुद झाल्यास प्रत्येक महिन्यास एका शिबीराचे आयोजन करता येईल. अशा शिबीरांच्या आयोजनाबाबत विविध ठिकाणच्या सामाजीक संघटना, संस्था संपर्क साधत असतात. त्यांचे संयुक्त विदयमानाने शिबीरे आयोजन करण्याबाबतही निच्छित धोरण ठरवणे गरजेचे वाटते.

तरी दर महिन्याला दोन शिबीरे आयोजीत करणेकरीता, शिबीरातील रुग्णांचे पुढील उपचार/ शस्त्रक्रियांच्या सवलती, औषधे, मनुष्यबळ यांबबत निर्णय होणेकामी तसेच मा.विश्वस्तांनी केलेल्या सुचनेप्रमाणे संबंधीत ठिकाणी शिबीर घेणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती समोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान रुग्णालयामार्फत विविध ठिकाणी, विविध वैद्यकिय शिबीरांचे आयोजन करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९** **औषधे / सर्जिकल साहित्य खरेदीबाबत .**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दि.०७/११/२०१६ रोजी मा. विश्वस्त, श्री.भाऊसाहेब वाकचौरे, श्री.सचिन तांबे, श्री.प्रतापराव भोसले यांनी भेट दिली असता त्यांनी श्री साईबाबा संस्थान रुग्णालयामध्ये दर महिन्याला किमान ०२ शिबिरे आयोजित करावेत अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

त्यानुसार, दर महिन्याला जनसंपर्क कार्यालयामार्फत ०२ शिबिरांचे आयोजन करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात आला आहे. परंतु, शिबीरासाठी येणा-या रुग्णांसाठी औषधे मोफत द्यावी लागतात. शिबीरासाठी लागणारे औषधे हे वार्षिक पुरवठा आदेशमध्ये नसल्यास किंवा वार्षिक पुरवठा आदेशामधील नग संख्या संपुष्टात आलेली असल्यास तातडीने खरेदी करावे लागणार आहे. परंतु, दिनांक ३०/१०/२०१५ रोजीचे शासनाचे नियमावलीनुसार ५ हजार पुढील वस्तू कोटेशन मागवून खरेदी करण्यात यावी अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

परंतु,रू. ५०००/- पेक्षा जास्त रक्कमेच्या खरेदीसाठी अंदाजे खर्चाकरीता ०३ कोटेशन मागवून अंदाजे खर्चाची रक्कम ठरवण्यात येते. त्यानंतर प्रथम खरेदी समिती सभेपुढे मान्यता घेण्यात येते. त्यानंतर पुरवठाधारकाला प्रशासकीय अधिका-याच्या स्वाक्षरीने कोटेशनचे मागणीपत्र पाठविण्यात येते. कोटेशनचे मागणी पत्र पाठविण्यापासून कोटेशन स्विकारण्याची अंतिम मुदत ही २-३ आठवडयांची ठेवण्यात येत असते. कोटेशन आल्यावर कोटेशन उघडण्याकामीचा प्रस्ताव खरेदी समिती सभेपुढे ठेवण्यात येते व खरेदी समितीपुढे कोटेशन उघडल्यानंतर तुलनात्मक तक्ता तयार करुन पुरवठा आदेशावर कार्यकारी अधिकारी यांची सही घेण्यात येऊन त्यानंतर पुरवठाधारकांना वैद्यकीय संचालक याचे स्वाक्षरीने पुरवठा आदेश देण्यात येतो.या संपूर्ण कालावधीसाठी कमीत-कमी २ ते ३ महिन्यांचा कालावधी लागतो. त्यामुळे शिबीरासाठी मटेरियल तातडीने उपलब्ध होऊ शकत नाही.

दि. १५/१२/२०१६ रोजी मा.विश्वस्त श्री.प्रताप भोसले यांचा श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये राऊंड झाला असता त्यांनी वैद्यकीय संचालक यांच्या कक्षेत दि. २८/१२/२०१६ रोजी वैजापुर येथे शिबीराचे आयोजन करावयाचे असल्यामुळे तेथे लागणारे औषधाचा तातडीने खरेदी करण्याचा प्रस्ताव दि. २२/१२/२०१६ रोजीच्या व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात यावा अशा सुचना दिलेल्या आहेत.

**विभागाचा अभिप्राय:-** दि. ३०/१०/२०१५ च्या शासन नियमावलीनुसार रू. ५०००/- च्या पुढील रक्कमेसाठी कोटेशन मागवून खरेदी करावी लागते. त्यासाठी २-५ महिन्यांचा कालावधी लागतो. त्याअन्वये औषध/ सर्जिकल साहित्य तातडीने खरेदी करता येऊ शकत नाही.

तरी वरीलप्रमाणे शिबीरांसाठी तातडीने औषधे/सर्जिकल साहित्य खरेदीबाबत योग्य तो निर्णय होण्याच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२८.१२.२०१६ रोजी वैजापुर येथे आयोजित करणेत येत असलेल्या वैद्यकिय शिबीरासाठी आवश्यक असलेली औषधे/ सर्जिकल साहित्य तातडीची बाब म्हणून वैद्यकिय संचालक यांच्या रु.२५,०००/- मात्र पर्यंतच्या अधिकारात खरेदी करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०** **शिर्डी महोत्सव व नाताळ सुट्यांचे कालावधीत मंडप, स्टेज, बॅरेकेटींग व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट – कलम (१) च्या खंड (ख) अन्वये "रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा– अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे'' या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

तसेच सदर कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे'' या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** दि.२५ डिसेंबर, २०१६ ते दि.०२ जानेवारी, २०१७ अखेर ०९ दिवस शैक्षणिक व इतर कार्यालयांना सुट्टया आहेत. या कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. दि.०१/०१/२०१७ रोजी शिर्डी महोत्सव साजरा करणेत येणार आहे. त्यासाठी साईनगर मैदान येथे स्टेज व इतर अनुषंगीक व्यवस्था इकडील विभागामार्फत करणेबाबत जा.नं. एसएसएस/ वशी-५/२०१६ दि.१२/१२/२०१६ रोजीचे आदेशाने कळविले आहे.

सदर कार्यक्रमासाठी तसेच दिपावली व नाताळ सुट्यांचे कालावधीत मंडप व इतर अनुषंगीक व्य वस्था करणेकामी येणारे अंदाजे रु.९,०९,५२३/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून करुन घेणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९/०९/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र.६४१ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. सदर मान्यतेनुसार याकामी ई-निविदा प्रक्रीया राबवून ई-निविदेचा लिफाफा क्र.०१ (Technical Bid) दि.२२/१०/२०१६ रोजी उघडणेत येऊन, पात्र ठेकेदारांचा लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) उघडणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. याबाबत मा. विश्वस्त, श्री. सचिन तांबे व मा. कार्यकारी अधिकारी यांचे समवेत झालेले चर्चेमध्ये दिपावली सुट्यांचे कालावधीत मंडप उभारणेची आवश्यकता नसलेबाबत चर्चा झाली. त्यानुसार सदर निविदा प्रक्रीया स्थगित ठेवणेत आली आहे.

परंतू आता, नाताळ गर्दीच्या अनुषंगाने उपरोक्त आदेशानुसार शिर्डी महोत्सव निमीत्ताने स्टेज व इतर अनुषंगीक व्यवस्थेची उभारणी करुन मागणी केली असल्याने, शिर्डी महोत्सवासाठी खालीलप्रमाणे स्टेज, स्वागत कमान तसेच नाताळ सुट्यांचे कालावधीत १६ आर. जागेमध्ये मंडप, प्रसाद भोजन व्यवस्थेसाठी बॅरेकेटींग व इतर अनुषंगीक व्यवस्था करुन घेता येईल.

| अ. नं. | तपशिल | परिमाण / एकक | कालावधी | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | सदरहू स्टेजवर सुमारे ४० ते ५० कलाकारांसाठी ३' -६'' उंचीचे स्टेज अंगल फ्रेममध्ये मजबुत बांधी तयार करुन स्टेजचे वरील बाजुने भक्कम असे प्लायवूड वापरुन व मजबूत सपोर्ट देऊन ३०'X२०' साईजचे स्टेज तयार करणे. तसेच सदरहू स्टेजचे वरील बाजूने ताडपत्री बांधून,आतिल बाजूने सुशोभित एकाच रंगाचे कापड बांधून, स्टेज फ्रेमचे चारही बाजुने सुशोभित एकाच रंगाचे कापड बांधणे, स्टेजचे पुढील भागासाठी सुशोभित एकाच रंगाचा सुमारे ३५' लांबीचा व १५' उंचीचा पडदा बसविणे. तसेच स्टेजचे बाजूस कलाकारांचे मेकअपसाठी २०'X१५' साईजच्या ०२ ग्रीन रुम जाड कापडामध्ये तयार करणे, स्टेजवर व | ६०० चौ. फुट | ३१/१२/२०१६ ते ३१/१२/२०१६ अखेर ०१ दिवस | ६३/- प्र. दि. प्र. चौ. फुट | ३७,८००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | साईभक्तांना बसणेकामी १०,००० चौ. फुट मॅटीन, १००० नग फायबर खुर्च्या पुरविणे व कार्यक्रमाचे वेळी व्यवस्थीत मांडणी करुन देणे इ. सह व्यवस्था. | | | | |
| २. | साईनगर मैदानाकडे जाणारा रस्त्यावर स्वागत कमान उभारणे. (२०'X१५') | ०१ नग | | ३०००/- प्र. नग प्र. दि. | ३,०००/- |
| ३. | नाताळ कालावधीमध्ये श्री साई प्रसादालयातील भोजन प्रतिक्षालय रेलींगला संरक्षक कठडे बांधणेकामी बांबुची४ फुटी उंचीची बॅरेकेडींग करणे तसेच व साईभक्तांचे दर्शन लाईन करीता बेरेकेडींग करणे. | ११०० र. फुट | दि.२५/१२/२०१६ ते दि.०२/०१/२०१७ अखेर ०९ दिवस | ६/- प्र. दि. प्र. र. फुट | ५९,४००/- |
| ४. | नाताळ सुट्टीचे कालावधीत साईभक्तांचे दर्शन व्यवस्थेसाठी १६ आर. जागेमध्ये मंडप उभारणी करणे. (४८'X१२५') | ६००० चौ. फुट | दि.२५/१२/२०१६ ते दि.०२/०१/२०१७ अखेर ०९ दिवस | १.२० प्र. दि. प्र. चौ. फुट | ६४,८००/- |
| | | | | **एकुण अपेक्षित खर्च रुपये.** | **१,६५,०००/-** |

वरीलप्रमाणे शिर्डी महोत्सव कार्यक्रमासाठी स्टेज व स्वागत कमान उभारणे तसेच नाताळ सुट्टीचे कालावधीत दर्शन रांगेसाठी १६ आर. जागेमध्ये मंडप, दर्शन रांगेसाठी व प्रसाद भोजन व्यवस्थेसाठी बॅरेकेडींग व इतर अनुषंगीक व्यवस्था करुन घेणेकामी येणारे अंदाजे रु.१,६५,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरहू कामी इकडील जा. नं.४९००/२०१६ दि.२०/१२/२०१६ रोजीचे कोटेशन मागणी पत्राने एकुण ०८ मंडप ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविणेत आले असून, खालील ठेकेदारांनी सिलबंद कोटेशन सादर केले आहेत.

| अ.नं. | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव | आवक नंबर / दिनांक |
|---|---|---|
| ०१. | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | १८४९४ / २१.१२.२०१६ |
| ०२. | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव | १८४९३ / २१.१२.२०१६ |
| ०३. | झुराळे मंडप डेकोरेटर्स, खैरी निमगांव | १८४९५ / २१.१२.२०१६ |
| ०४. | न्यु बालाजी मंडप, निमोण | १८४९२ / २१.१२.२०१६ |

**प्रस्ताव**:- तरी वरीलप्रमाणे शिर्डी महोत्सव कार्यक्रमासाठी स्टेज व स्वागत कमान उभारणे तसेच नाताळ सुट्टीचे कालावधीत दर्शन रांगेसाठी १६ आर. जागेमध्ये मंडप, दर्शन रांगेसाठी व प्रसाद भोजन व्यवस्थेसाठी बॅरेकेडींग व इतर अनुषंगीक व्यवस्था करुन घेणेकामी वरीलप्रमाणे प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन उघडून त्यावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९६५** **शिर्डी महोत्सव व नाताळ सुट्यांचे कालावधीत मंडप, स्टेज, बॅरेकेटींग व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेसमोर उघडणेत आले असता, त्यामध्ये अ.नं. ०३ चे ठेकेदार झुराळे मंडप डेकोरेटर्स, खैरी निमगांव यांनी सादर केलेल्या कोटेशन सोबत बयाना रक्कमेची पावती जोडलेली नसल्याने, त्यांना अपात्र ठरविणेत आले. उर्वरीत ०३ मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.**

| अ.नं. | कामाचा तपशिल / परिमाण / एकक | कालावधी | ठेकेदाराचे नांव | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव | | न्यु बालाजी मंडप, निमोण | | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | |
| | | | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम |
| ०१. | ३०'X२०' साईजचे स्टेज व इतर अनुषंगीक व्यवस्था (६०० चौ. फुट) | दि.३१/१२/२०१६ रोजी ०१ दिवस | ७०/- प्र. दि. प्र. चौ. फुट | ४२०००/- | ६५/- | ३९०००/- | **६०/-** | **३६०००/-** |
| ०२. | स्वागत कमान | | ३०००/- प्र. नग. | ३०००/- | २१००/- | २१००/- | **२०००/-** | **२०००/-** |
| ०३. | प्रसाद भोजन व दर्शन रांग व्यवस्थेसाठी बॅरेकेडींग व्यवस्था. (११०० र. फुट) | २४/१२/२०१६ ते ०२/०१/२०१७ अखेर ०९ दिवस | ४.४४४ प्र. दि. प्र. र. फुट | ४४०००/- | ३.३३३ | ३३०००/- | **३/-** | **२९७००/-** |
| ०४. | दर्शन रांगेसाठी ताडपत्रीचे छत असलेले एम. एस. पाईप कैच्याचे स्ट्रक्चर असलेला मंडप १६ आर. मध्ये ६००० चौ. फुट | | ०.७७७ प्र. दि. प्र. चौ. फुट | ४२०००/- | **०.७०** | **३७८००/-** | ०.९० | ४८६००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी महोत्सव व नाताळ सुट्यांचे कालावधीत मंडप स्टेज, बॅरेकेटींग व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधिताना कार्यादेश देणेत यावा. तसेच गर्दीचे कालावधीत वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजुर दराने करणेत यावी, असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१** **मा.विश्वस्तांच्या सुचनांबाबत**

**निर्णय क्र.९६६** **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या, त्या मान्य करण्यातआल्या.**

(०१) व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करण्यात येणारे प्रस्तावामध्ये त्याचा आशय थोडक्यात व मुद्देसुद असावा, आवश्यक असल्यास त्यांची सहपत्रे सोबत परिशिष्ठ म्हणून जोडण्यात यावीत. प्रस्तावामध्ये संस्थान अधिनियम, विनियम, शासन निर्णय यांच्या तरतूदीचा समावेश असावा. तसेच वेळोवेळी होणाऱ्या सभांमधील निर्णयांवर संबंधीत विभागांनी केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती, सदरहू कार्यवाही पुर्ण होईपर्यंत सभेसमोर सादर करणेत यावी. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सभाकामकाज विभाग/ सर्व विभागप्रमुख)

---

(०२) श्री.अभिजीत शिंदे, यांना शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेकामी तुर्त ११ महिने कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निश्चित केलेल्या भाडेदराप्रमाणे भाडे व मिटर रिडींगप्रमाणे विद्युत बील आकारणेत येऊन लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर प्रसादालयावरील हॉलची जागा उपलब्ध करुन देणेबाबत दि.३०.११.२०१६ रोजीचे सभेमध्ये निर्णय संमत झालेला आहे. श्री.अभिजित शिंदे, श्रीरामपुर यांनी आजचे सभेत येऊन, ते करत असलेल्या कामामुळे देशभरामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास पोहोचणार असलेबाबत माहिती दिली व सदरहू ठिकाणचे भाडे कमी करणेबाबत सभेस विनंती केली.

सभेने यावर चर्चा करुन, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेकामी श्री.अभिजीत शिंदे यांना लिव्ह ॲण्ड लायसेंन्स तत्वावर देण्यात येणाऱ्या हॉलचे रु.१०,०००/- मात्र मासिक भाडे, विद्युत बील वेगळे याप्रमाणे आकारणेत यावे. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ विधी अधिकारी)

---

(०३) शिर्डी बसस्थानकावर प्रवाशी/ साईभक्तांच्या सोयीसाठी नगरपंचायत शिर्डी मार्फत पाणी पुरवठा केला जात होता, आता तो बंद आहे, तो का बंद आहे याची चौकशी करुन बसस्थानकावर पुर्ववत पाणी पुरवठा सुरु करणेसाठी संबंधीत विभागाकडे पाठपुरावा करणेत यावा. (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

(०४) साईभक्तांच्या सुविधेकरीता चालु केलेले क्लोकरुम, मोबाईल लॉकर्स व चप्पल स्टँड दि.०१ जानेवारी, २०१७ पासुन मोफत करणेत यावे. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान/ संरक्षण विभागप्रमुख)

---

(०५) संस्थान परिसरामध्ये बनविणेत आलेली चप्पल स्टँड आकर्षक करणेत यावे व तेथे ठेवण्यात येणारी साईभक्तांची पादत्राने पॉलिश करुन देणेसाठी आवश्यक कार्यवाही करणेत यावी, याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख/ बांधकाम विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान/ कामगार अधिकारी)

---

(०६) सशुल्क दर्शन/ आरती व्ही.आय.पी. पास सर्वांसाठी विनाशिफारस सुरु केलेला असल्यामुळे जनसंपर्क कार्यालयामध्ये मोठया प्रमाणात भक्तांची गर्दी होताना दिसून येते. सदरहू गर्दी कमी करणेसाठी सशुल्क दर्शन/ आरती व्ही.आय.पी. पास वितरण काऊंटर्सची संख्या वाढविणेत यावी. (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

(०७) दर्शन रांगेतील साईभक्तांना Time base प्रणालीअंतर्गत देण्यात येणाऱ्या कुपन्सवर बाबांचा फोटो छापणेत येऊ नये, अशा सुचना साईभक्तांमधून येत आहेत. याकरीता सध्या छापणेत आलेले कुपन्स संपल्यानंतर नवीन कुपन्स छापतेवेळी त्यावर बाबांचा फोटो छापणेत येऊ नये. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

(०८) संस्थान संचलित शैक्षणिक संकुल अनुदानित करणेसाठी शासनाकडे पत्रव्यवहार करणेत यावा.

(कार्यवाही- प्रशासकीय अधिकारी, शैक्षणिक संकुल)

---

(०९) सध्याच्या व्यवस्थापन समितीचे कार्यकालामध्ये दि.०१ एप्रिल, २०१६ पासुन विशेष अंतर्गत लेखापरिक्षण सुरु करणेत यावे. तसेच संस्थानमधील सर्व काऊंटर्स कॅशलेस करणेसाठी त्या ठिकाणी स्वॅपींग मशिन्स बसविणेत येऊन, त्याचा अहवाल १५ दिवसाचे आत समिती सदस्यांना देण्यात यावा. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

(१०) ठिकठिकाणांहून पालखी घेऊन येणाऱ्या पदयात्रींच्या दर्शनासाठी वेगळे गेट सुरु करणेबाबत यापुर्वीच सुचना केलेली आहे. याबरोबरच पदयात्रींना Time Base प्रणालीचे कुपन्स घेण्यासाठीही वेगळी व्यवस्था करणेत यावी. यासाठी पालखी प्रमुखांकडून पदयात्रींची संख्या लेखी स्वरुपात घेण्यात यावी. तसेच समिती सदस्य श्री. सचिन तांबे यांनी पालखी मंडळांच्याप्रमुखांबरोबर बैठकीचे आयोजन करुन, त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात.

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

(११) रुग्णांच्या सोयीसाठी संस्थानकडे उपलब्ध नसलेली तातडीची/ जीवनावश्यक औषधे खरेदी करणेकामी वैद्यकिय संचालक यांना रु२५,०००/- मात्र पर्यंतच्या खर्चाचे अधिकार प्रदान करणेत आले.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

(१२) राज्यातील स्वयंसेवी रक्तपेढींची शिर्डी येथे बैठक आयोजित करणेत येऊन, त्यांना संस्थान परिसरामध्ये रक्त गोळा करणेसाठी दिवस ठरवून द्यावेत. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक)

---

वरील निर्णय क्र.९०५ ते ९६६ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर मा.सौ.अनिताताई विजयराव जगताप, सदस्या तथा नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत यांच्या नगराध्यक्षा या पदाच्या नेमणूकीचा कालावधी संपुष्टात आलेमुळे त्यांची आजची शेवटची सभा होती. व्यवस्थापन समिती सभेच्या वतीने त्यांचा शॉल, श्रीफळ देण्यात येऊन, सत्कार करणेत आला व रात्रौ ०७.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (कुंदनकुमार सोनवणे) | (सुरेश हावरे) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**